

# गाथा सप्तशती

♦ (मुळ ग्रंथ -**मार्कंडेय पुराण** (संस्कृत) ♦ मुळ कथा-**देवी महात्म्य** (सप्तशती संस्कृत) ♦ रचना - **गाथा सप्तशती** (प्राकृत )

♦**लेखन प्रेरणा** - सद्‌गुरू श्री अनिरुद्ध बापू (मुंबई)♦

♦ **प्राकृत रचना** - श्री रविंद्रसिंह भगवान पाठक

**सद्‌गुरु आज्ञा** : फाल्गुन शु ।। १शालिवाहन शके १९३९,
इसवी सन दि.१६/०२/२०१८.

## लेखन अवधी

फाल्गुन शु।। ७ शके १९३९ इसवी सन दि.२२/०२/२०१८ ते

फाल्गुन कृ।। ४ शके १९३९ इसवी सन दि.०५/०३/२०१८.

## अनुक्रमणिका




| | | | |
|---|---|---|---|
| ग्रंथाचे अध्ययन | ६ | अध्याय ७ | ७६ |
| पाठ विधी | ११ | अध्याय ८ | ७९ |
| देवी कवच | १६ | अध्याय ९ | ८४ |
| अर्गला स्तोत्र | २१ | अध्याय १० | ८८ |
| कीलक | २५ | अध्याय ११ | ९१ |
| तंत्रोक्त रात्रीसूक्तं | २८ | अध्याय १२ | ९९ |
| नवार्ण विधी | ३० | अध्याय १३ | १०३ |
| सप्तशती न्यास: | ३५ | नवार्ण विधी | १०६ |
| अध्याय १ | ३८ | तंत्रोक्त देवीसूक्तं | ११३ |
| अध्याय २ | ४५ | प्राधानिक रहस्य | ११६ |
| अध्याय ३ | ५० | वैकृतिक रहस्य | ११९ |
| अध्याय ४ | ५४ | मूर्ति रहस्य | १२३ |
| अध्याय ५ | ६३ | क्षमा प्रार्थना | १२६ |
| अध्याय ६ | ७४ | | |

# “तु आणि मी मिळून”

खरोखरच सद्गुरुच्या वचनाची प्रचितीच हा ग्रंथ आहे.

दि.१६/०२/२०१८ रोजी बापूंच्या घरी कौंटुबिक पूजनासाठी मी, अतुलसिंह महाजन गुरुजी आणि मंडळी गेलेलो होतो. घरातील वातावरण मंत्रमुग्ध-सकारात्मक-मन:सामर्थ्यवर्धक असते. हा नेहमीचा अनुभव आजही होता. अशाच वातावरणात पूजनविधी पार पडले. सर्वसाधारणपणे बहुतांश वेळा बापूंची भेट किंवा दर्शन या निमित्ताने होतच असते, मात्र त्यांची साधना किंवा अन्य कार्यक्रम असल्यास होऊ शकत नाही. योगायोगाने यादिवशी भेट झाली. नेहमीप्रमाणेच खेळीमेळीने बापू बोलत होते. त्याच वातावरणात बोलताबोलता बापूंनी सहज सुचविले की,“श्रद्धावानांना कळेल अशा भाषेत सोप्या पद्धतीने तुम्हाला सप्तशतीवर लेखन करायचयं” आणि नकळत आम्ही दोघांनीही सकारात्मक मान तुकविली ही एक सद्गुरुंचीच लीला...

कार्य किती महान व अवघड आहे याची जराही चिंता वाटली नाही. मनाला खूप आल्हाददायक वाटत होते. सर्वसाधारणपणे एक आठवडा उलटून गेला. दि.२१/०२/२०१८ची रात्र २२ तारखेच्या ब्रह्ममुहुर्तावर उठण्यासाठी संकेत देऊन गेली. त्याप्रमाणे उठून स्नानादि कर्म आटोपुन देवघरात बसलो. एक अद्‌भूत शक्ती हे आचरण सहज करुन घेत होती (माझा विश्वास आहे की, तो अनिरुद्धच हे सर्व करून घेत होता.) त्यामुळे मनाला प्रसन्न वाटत होते. देवघरात

भूजपत्र ठेवलेलेच असते. लाल शाईचा पेन घेऊन बसलो. नित्यदेवपूजन झाले. कुलदेवतादी सद्गुरुंसहित सर्वांना सहाय्यार्थ बोलावणं केलं. जीवनात पूर्वी कधीही न अनुभवलेलं वातावरण तयार झालं होतं. लेखणीचे टोक भुजपत्रावर टेकवले आणि विनाविलंब या ग्रंथ लेखनाला प्रारंभ झाला.

पहिली ओवी तयार झाली तोपर्यंत ठरलेलं नव्हतं की लेखन पद्यात की गद्यात करायचयं...

सद्गुरुंच्या कृपेशिवाय ज्याची सुतराम शक्यताच नाही याची जाणीव होतीच. त्यालाच म्हटलं तुझं कार्य आहे, मला फक्त निमित्त बनवलसं-काय आणि कसं ते तुच करुन घे!

त्या हाकेला धाऊन बापुंनी शक्तीरुपात हे कार्य करवून घेतले हा माझा दृढ विश्वास आहे.

दि. ५/०३/२०१८ रोजी हा ग्रंथ ओवीत गुंफुन तयार झाला. लेखनी बनुन कार्यपूर्तीचा प्रयत्न केला आहे. मात्र यातील प्रत्येक अक्षर सद्गुरु श्री अनिरुद्ध यांची शक्ती असून हा ग्रंथ ती जगत्जननी आहे. मी केवळ निमित्त मात्र... छापील प्रत अजुन बाजारात उपलब्ध नाही, छपाई ाादि तांत्रिक बाबींची पूर्तता होईल तोवर साधकांना उपयुक्त ठरेल म्हणुन ऑनलाईन प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे.

**-ग्रंथकर्ता:- श्री रविंद्रसिंह भगवान पाठक**

**।। हरि ॐ।। श्रीराम ।। अंबज्ञ ।। नाथसंविध् ।।**

# ग्रंथाचे अध्ययन :

अध्ययनासाठी कोटीगुणांचा अनंतकाळ प्रशस्त असतो. शास्त्रांमध्ये उपनीत (अनुग्रहित)अशा सर्वांस अध्ययनाचा अधिकार उल्लेखित केलेला आहे.

उपनयनासाठी विप्र-क्षत्रिय-वैश्य या तीनही वर्णांस अनुमति दर्शविलेली आहे. जे उचित काळी उपनयन करत नाहीत त्यांची क्षुद्रामध्ये गणना केली जाते.

परमेश्वरीय चिंतनासाठी विशेष काळाची जरी आवश्यकता नसली तरी सफलतेसाठी उचित काळ (मुहूर्त) घेण्याची आवश्यकता असते. कारण त्यावेळी नैसर्गिक अनाहत चक्रामधील वातावरणाचा प्रत्येक जीवा-शिवाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध येत असतो. हे सत्य नाकारण्यात काहीच महानता मानता येणार नाही. 'पाषाणातील अनावश्यक भाग काढून टाकला की मुर्ती शिल्लक रहाते' या सद्विचाराप्रमाणेच 'अशुभ काळ वर्ज्य केला की उरलेला सर्वकाळ योग्य' असे मानणे गैर असेल असे वाटत नाही.

म्हणून येथे निषिद्ध काळ व आचरणांचा उल्लेख घेण्याचा उहापोह करण्याची चेष्टा केलेली आहे. तेवढा काळ सोडला तर कोणत्याही काळी अध्ययन निषिद्ध नाही.

### अध्ययनासाठी वर्ज्य काळ:

√ १,४,३० .या तिथी व त्यांच्या पुर्व रात्रीला कदापिही अध्ययन करू नये.

- √ कर्क-मकर-मेष या संक्रांतिचा काळ, बोधिनी एकादशी, मन्वादि तिथी व युगादि तिथीच्या दिवशी.
- √ आषाढ, कार्तिक आणि फाल्गुन पौर्णीमा व ऋतुचा शेवटचा दिवस.
- √ शिष्य, ऋत्विक, गुरूबंधु, स्वशाखेचा वैदिक(श्रोत्रिय) मृत असता तीन दिवस.
- √ श्राद्ध भोजन, उत्सवातील भोजन केल्यास.
- √ अध्ययनार्थी दोघांमधुन उंदीर, कुत्रा, साप, मांजर गेले असता
- √ इंद्रध्वज चढवणे व उतरवणे याकाळी (भाद्रपद शु. १ २).
- √ संध्याकाळी मेघ गर्जना किंवा उल्कापात झाला असता.
- √ रात्रीचे ग्रहण असता तीन रात्र व दिवसा ग्रहण असता तीन दिवस.

**तात्कालिक वर्ज्य काळ(पठण चालू असताना.)**

- √ कुत्रा कोल्हा-गाढव-घुबड-आर्त(दु:खित) प्राणी यांचा आवाज ऐकल्यावर तसेच वेळूचे वाद्याचा आवाज ऐकल्यावर.
- √ सूतक-शव-शूद्र-श्मशान किंवा पतित जवळ असताना.
- √ भोजनानंतर हात ओले आहेत तोपर्यंत.
- √ वीज चमकणे-मेघ गर्जना होणे-जोराचा पाऊस येणे-अति वारा सुटणे किंवा धुळ उडत असताना, संधीकाळत धुके असताना, मनामध्ये भिती निर्माण झाली असताना.

- √ दुर्गंध आल्यावर, धावताना तसेच शिष्ट(अति विद्वान) आला असताना.
- √ विवाद-कलह-दोन सेनेमधील युद्धकाळ, जेवणानंतर पोटात अजीर्ण झाले असेल तर.
- √ भोकर-मोह-कवठ या वृक्षाखाली.
- √ झोपून-पायाची आढी घालून, मांस भक्षण करून तसेच सूतकातील अन्न भक्षण करून.
- √ पितृपक्ष- आचार्य-उपाध्याय, आचार्य पत्नी किंवा पुत्र -शिष्य मृत असता.
- √ आग लागुन गाय ब्राह्मण मृत असता तीन दिवस अहोरात्र.
- √ विवाह, देवादिकाची प्रतिष्ठा, व्रताचा उद्यापन काळ यांच्या समाप्ती पर्यंत.

**सप्तशती ग्रंथाचे फलित :**

**शनैस्तु जप्यमानेऽस्मिन्। स्तोत्रै संपत्तिरुचकै :।**

**भवत्येव समग्रापि तत : प्रारभ्यमेव तत्।**

मनुष्याला ऐश्वर्य,सौभाग्य, आरोग्य तसेच सर्व प्रकारची संपदा प्राप्त होऊन शत्रूनाश व मोक्षप्राप्ती साठी या पाठाला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

**पाठभेद :**

विद्वानांच्या मतमतांतरातुन पाठभेद जरूर दिसून येऊ शकतात पण त्यामागचा भाव मात्र एकसारखाच आहे ही वस्तुस्थिती. मात्र

मार्कंडेय ऋषिंनी रचलेल्या या ग्रंथाच्या प्रकाशनातुन झालेल्या त्रुटींमुळे मूळ पद-छंद यांना बाधक वाटतात. त्यामुळे मिळणाऱ्या स्पंदनात न्यूनता येऊ शकते. यासाठी मुळ ग्रंथांचा(मार्कंडपुराणाचा) आधार घेणे उचित राहील.

**प्राकृत देवी महात्म्य पठणाविषयी थोडक्यात:**

पाठ पठण करताना देवीकवच-अर्गला-कीलक-रात्रीसूक्त व विशेष म्हणून देवी अथर्वशीर्ष- न्यास विधी सहीत नवार्ण मंत्राचे अनुष्ठान व न्यास विधीसहीत प्रथम-मध्यम-उत्तर(उत्तम) या तीनही चरित्रांचे पठण, तन्त्रोक्त देवी सूक्त पठण, उत्तरन्यास विधीसहीत प्राधानिक रहस्य, वैकृतिक रहस्य आणि मुर्ती रहस्य या षडंगासहित पठण करून मातेस क्षमा प्रार्थना करावी. हा क्रम सांगितलेला आहे. यातही तोच क्रम आहे.

प्राकृत देवीमहात्म्य ग्रंथकारांनी पारायण पद्धतीने पाठ वाचण्याची पद्धती दिलेली आहे. पण त्यांनीही तिला गौण स्थान दिलेलं आहे.

अडचणींच्या प्रसंगी तो क्रम घेणे क्रमप्राप्त ठरेल मात्र नियमीत पठणासाठी उपरोक्त क्रम घेणेच सार्थ फलदायी ठरेल.

पाठ करताना व पाठ कर्त्याचे लक्षण शास्त्रांत पुढील प्रमाणे वर्णिलेले आहेत.

**माधुर्यं अक्षरव्यक्ति: पदछेदस्तु सुस्वर: ।**

**धैर्यं लयसमर्थं च षडेते पाठका गुणा: ।।**

माधुर्य, अक्षर-पदच्छेद-सुस्वर-धैर्यशीलता व लय समर्थता या गुणांनी युक्त वाचक पाठ कर्ता जाणावा.

**गीती शीघ्री शिरः कम्पी तथा लिखित पाठकाः।**

**अनर्थज्ञोऽल्प कंठश्च षडेते पाठकाधमाः ।।**

घाईने वाचन करणे, वाचताना मान हालविणे, स्वतःच्या लेखणीतून स्वतः लिहीलेले पठण करणारा, अर्थ न जाणणारा, वाचताना अडखळणारा अर्थात अल्पकंठश्च असा वाचक पाठ वाचनासाठी गौण मानला आहे.

**एकेन वा मध्यमेन नैकनेतरयोरिह ।**

**चरितार्धं तु जपेत् जपन् छिद्रवाप्नुयात् ।।**

एकाग्र मनाने मध्यम स्वरात सतत  या ग्रंथाचे पठण करील त्याच्या सर्वकामना भगवती देवी सर्व कामना पूर्ण करील.

।। हरि ॐ ।।

**टीपः बदलत्या काळानुसार यापैकी शक्य तेवढे मियम पाळण्याचा जरुर प्रयत्न करावा. जर काही न्यूनअधिक रहात असेल किंवा कालानुरुप नैसर्गिक बदल करावे लागत असतील तर आई भगवतीला क्षमा मागावी. मात्र जाणुनबुजुन केलेली कोणतीही चुक क्षमेस पात्र नसते ही जाणीव ठेवावी.**

# पाठ विधी

साधकाने स्नान करुन शुद्ध जल, हळदी, कुंकु, अक्षता, चंदन, पुष्पं (सुट्टीफुलं, गजरा/वेणी/हार जे उपलब्ध असेल ते),धूप(अगरबत्ती),शुद्ध तुपाचा दिवा,वस्त्रासहित ग्रंथ, नैवेद्य(खडीसाखर/साखर/दुधसाखर/खीर...)फळं (सुपारी/ऋतुफळ),चौरंग/पाट, गाथा सप्तशती ग्रंथ घेऊन सर्व तयारी करुन स्वस्थ व शांत मनाने स्वच्छ व शुद्ध आसनावर पुर्वाभिमुख बसावे.

आपले व ग्रंथाचे आसन सुव्यवस्थित मांडुन ग्रंथ उच्च आसनावर ठेवावा.

(ज्यांना नियमीत पाठ करायचा असेल त्यांनी देवासमोर बसून करावा अर्थात देवघरात ही मांडणी तयारच असते त्यामुळे अन्य व्यवस्था करण्याची आवश्यकता भासणार नाही.)

कपाळाला भस्म /चंदन / कुंकू लावून लाऊन शिखा(शेंडी) बांधावी.

भगिनींनी केस मोकळे सोडून बसू नये.

त्यानंतर पुढील चार मंत्रांनी आचमन करावे.

(संध्यापळीने डाव्या हाताने उजव्या हातावर जल घेऊन प्राशन करणे. व हस्त शुद्धीसाठी समोर ठेवलेल्या ताह्मणांत एक वेळेला जल सोडणे.) (पुजनात मानस उपचार हा अत्यंत श्रेष्ठ मानला जातो. ज्यावेळी कोणतीही साधन सामग्री नसेल त्यावेळी देवी भगवतीची प्रतिमा मनात आणुन सर्व उपचार आई जगदंबेला मनाने समर्पित करावेत.)

**आचमनाचे मंत्र :**

**ॐ ऐं आत्मतत्वं शोधयामि नम: स्वाहा। ॐ ह्रीं विद्यातत्वं शोधयामि नम: स्वाहा।**

**ॐ क्लीं शिवतत्वं शोधयामि नम: स्वाहा। ॐ ऐं ह्रीं क्लीं सर्वतत्वं शोधयामि नम: स्वाहा।**

यानंतर प्राणायाम करुन (अनुलोम-विलोम किंवा अन्य कोणताही) श्रीगणेश आदि देवता, गुरुजन, वयाने मानाने ज्येष्ठ मंडळींना नमस्कार करावा.

**अपवित्रं पवित्रो वा सर्व अवस्थां गतोऽपि वा ।**
**य: स्मरेत पुंडरिकाक्षं सबाह्य अभ्यंतरं शुचि:।।**

हा मंत्र म्हणुन पुजा सामग्री, आजुबाजुला व आपल्या शरीरावर तुळसी किंवा फुलाने जल शिंपडावे.

अनामिकेत (देवाला गंध लावतो ते बोट) दर्भाचे पवित्र उपलब्ध असल्यास घालावे अथवा धातुची अंगठी घालावी.

श्रीगणेश-विष्णु-शिव-देवी-सुर्याची स्तुती करावी. आपण ज्या भावनेने सप्तशतीचा पाठ करणार आहोत त्याचा संकल्प करावा. (उजव्या हातामध्ये जल-गंध-अक्षता-पुष्प-दक्षिणा घ्यावे. पुढील प्रमाणे संकल्प मंत्राचा उच्चार करावा.)

**संकल्प :**

**तिथी विष्णु: वार विष्णु: नक्षत्र विष्णु: योग विष्णु: करणं विष्णु: सर्वं विष्णुमयं जगत् ।।**

(पंचांग उक्त संकल्प करणे शक्य असल्यास जरुर करावा. त्यासाठी पंचांगाचे ज्ञान असणे आवश्यक असते.)

आपले गोत्र (गोत्र माहिती नसल्यास आपल्या गुरुंचे अथवा आचार्य/गुरुजींचे गोत्र उच्चारण करावे.)-वेद-शाखा-प्रवर-स्वत:चे चालू **नांव-जन्मनांव** (माहिती असल्यास किंवा चालू नांवापेक्षा वेगळे असल्यास) **यापैकी जी माहिती उपलब्ध असेल त्याचे उच्चारण करावे.**

**नंतर पुढे बोलावे :- मम, आत्मन:, श्रुती-स्मृती, पुराण उक्त, पुण्यफल प्राप्तीअर्थं, सपुत्र-स्त्री-बांधवस्य श्री नवदुर्गा अनुग्रहतो ग्रहकृत, राजकृत सर्वविध पीडा निवृत्तिपूर्वकं, नैरुज्य दीर्घआयु: पुष्टि-धन-धान्य समृद्धि अर्थं, श्री नवदुर्गा प्रसादेन सर्व आपत्ती निवृत्ति, सर्वअभिष्ट फलप्राप्ती, धर्म-अर्थ-काम-मोक्ष-भक्ती-मर्यादा पुरुषार्थ सिद्धिद्वारा श्रीमहाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती प्रीत्यर्थं शापोद्धार पुरस्सरं कवच-अर्गला-कीलक पाठ, तंत्रोक्त रात्रीसूक्तपाठ-न्यास विधी सहित नवार्णमंत्र जप, सप्तशती न्यास-ध्यान सहित, चरित्रसंबंधी न्यास-ध्यान पूर्वकं मार्कण्डेय उवाच। सुर्याचा पुत्र सावर्णि नामे। या आरंभापासून ... मनु जन्म घेतील।। क्लीं ॐ।। इथपर्यंत प्राकृत सप्तशती पाठ त्यानंतर न्यास विधीसहित नवार्णमंत्र जपं, तंत्रोक्त देवीसूक्त पाठं, रहस्यत्रयं पठनं शापोद्धार आदि करितो/करिते।** असे बोलून हातातील जल ताम्हणात सोडावे.(हे जल जमीनीवर सोडू नये.)

संकल्पानंतर देवी ध्यानमंत्राने ग्रंथाची पुजा करावी.

ग्रंथ पुजनाचा मंत्र - **देवी माते तुला नमस्कार असो। महादेवी शिवाला नमस्कार असो।**
**प्रकृति आणि भद्राला नमन असो। आम्ही नेमे जगदंबेला नमितो।।**

योनीमुद्रा किंवा दंडवत नमस्कार करावा.

ग्रंथ ठेवण्यासाठी मांडलेल्या आसनावर हाताने स्पर्श करुन **ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुडायै विच्चे** हा मंत्र म्हणावा.

(याला आधार शक्ति स्थापना असे म्हणतात. )

**शापोद्धार मंत्र -**

**ॐ ह्रीं क्लीं श्रीं क्रां क्रीं चंडिकादेव्यै शापनाशानुग्रह कुरु कुरु स्वाहा ।**

या मंत्राचा पाठ सुरु करण्यापुर्वी व पाठ वाचन पुर्ण झाल्यानंतर ७ वेळेस जप करावा.(या मंत्राला शापोद्धार मंत्र असे म्हणतात.)

**उत्कीलनं मंत्र :-**पाठाच्या सुरुवातीला आणि शेवटी **उत्कीलन** मंत्राचा २१ वेळा जप केला जातो.

**ॐ श्रीं क्ली ह्रीं सप्तशती चंडिके उत्कीलनं कुरु कुरु स्वाहा ।**

पाठाच्या सुरुवातीला **मृतसंजीवनी** मंत्राचा ७ वेळा जप केला जातो.

**मृतसंजीवनी मंत्र : ॐ ह्रीं ह्रीं वं वं ऐं ऐं मृतसंजीवनी विद्ये मृतमुत्थोपयोत्थापय क्रीं ह्रीं ह्रीं वं स्वाहा ।**

मारिच कल्पानुसार सप्तशती शापविमोचनचा मंत्र पुढील प्रमाणे-

**ॐ श्रीं श्रीं क्लीं हूं ॐ ऐं क्षोभय मोहय उत्कीलय उत्कीलय उत्कीलय ठं ठं ।**

हा मंत्र फक्त पाठ वाचनापुर्वी १०८ वेळा म्हणावा.

(यानंतर अंतरमातृका-बहिर्मातृका आदि न्यास करण्याचे विधान आहे. मात्र हे न्यास प्रचलित पाठ पद्धतीत तुलनेने खुपच कमी प्रमाणात केले जातात. त्यामुळे या ग्रंथात प्रचलित पाठ पद्धतीला अनुसरुन न्यास विधी समाविष्ट केलेले आहेत.)

**ग्रंथाचे पुजन करुन षड्अंगाने (सहा अंगाने) सप्तशतिचा पाठ केला जातो.**

**ते अंग पुढीलप्रमाणे :- कवच-अर्गला-कीलक आणि तिनही रहस्य**

यात काही ठिकाणी पाठभेद दिसून येतो. चिदंबर संहितेमध्ये प्रथम अर्गला-कीलक व नंतर कवच वाचण्याचा क्रम पहायला मिळतो. परंतु योग रत्नावलीमध्ये पाठाचा क्रम याहूनही भिन्न दिलेला आहे. त्यात कवचाला **बीज -शक्ति - कीलकाचे** उच्चारण होते. त्याच पद्धतीने येथे कवच **बीजरुप**-अर्गला **शक्तीरुप** शेवटी कीलक या क्रमाचे अनुसरण केलेले आहे.

# देवी कवच

**संकल्प : चंडिकवचाचे ऋषि ब्रह्माजी असुन व्याकरणाच्या अनुष्टुप छंदामध्ये या कवचाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. चामुंडा देवता या कवचाची अधिष्ठात्री देवी आहे. अंग न्यासोक्त मातर हे बीज असुन दिग्बंध्देवता तत्व तथा श्री जगदंबा देवीच्या प्रीत्यर्थ सप्तशती पाठाच्या अंगभूत कवचाचा जप करतो असे बोलून ताह्मणात जल सोडावे.**

**।।ॐ नमश्चंडिकायै।।**

**मार्कंडेय उवाच :-**

या संसारी परम गोपनीय। मानवाचे कराया रक्षण। अत्यंत सुलभ साधन। पितामह मजसी कथन करा ।।१।।

ब्रह्मोवाच!

असे आहे एक साधन। प्राणी मात्रा दुर्लभ जाण। ऐका महामुनी चित्त लावून। परम गोपनीय कवचास।।२।।

नवदुर्गा नामे जी प्रचलित। जिचे नऊ स्वरुप विख्यात। शैलपुत्री प्रथम ख्यात। दुसरी ब्रह्मचारिणी जाणावी।।३।।

चंद्रघंटा-कुष्मांडा वदती। स्कंदमाता-कात्यायनी इति। कालरात्री-महागौरी ख्याती। सिद्धीदात्री प्रसिद्ध ती पुराणी।।४।।

त्रासिले ज्यासि अग्निभये। शत्रु वा रणभुमी द्वये। घोर संकटे ग्रासियेले। टळूनी जाई अमंगल ।।५।।

युद्धभुमी वा समरांगणी। हरेल विपत्ती त्याचक्षणी। शरण जाईल जो जो कोणी। भगवती कृपे तरेल।।६।।
दु:ख-शोक-भय नासेल। विपत्ती आपदा दैन्य हरेल। संकटी मुक्ती मिळेल। टळुनी जाई अशुभ ते।।७।।
जो कोणी भाविकभक्त। देवी भगवतीशी नित्य स्मरत। चिंतन करी दिनरात। अभ्युदय पावे निश्चये।।८।।
चामुण्डेचे वाहन प्रेत। रेड्यावरी वाराही रत। ऐन्द्रीचा गज ऐरावत। वैष्णवी राहे गरूडावरी।।९।।
माहेश्वरी वृषभावर आरूढ। मयुरावरी कौमारी रुढ। कमलावर लक्ष्मी दृढ। विष्णु पत्नी विराजली।।१०।।
वृषभारूढी माहेश्वरीने। श्वेत वस्त्रं परिधानिले। अलंकारी विभूषित हंसासने। ब्राह्मी देवी विराजली।।११।।
ऐशा योगशक्ती संपन्न। सकल माता व्युत्पन्न। नाना स्वरूप अनवछिन्न। भुषणे-आभूषणे विराजित।।१२।।
शंख-चक्र-गदाशक्ति। हल मुसल आयुध हाती। क्रोधरुपे रथारुढ ती। भक्त रक्षणाकारणे ।।१३।।
खेटक तोमर परशु पाश। कुंत त्रिशूल शारंग वेश। उत्तम आयुध धारणावेश। दुष्टाचा संहार करण्या ती।।१४।।
दैत्य देहनाशिनी। भक्त अभयदायिनी। देवादिदेव कल्याणी। सकारण शस्त्रंधारिणी तु।।१५।।
महारौद्ररुपधारिणी तुज नमो। महाघोर पराक्रमी तुज नमो। महाबलदायिनी-महोत्साही नमो। नमो माते महाभयविनाशिनी।।१६।।
पुर्वेशी तु ऐंद्री। अग्नेयेला अग्निदेवता। दक्षिणेशी तु वाराही। नैऋत्येशी नैऋति।।१७।।
पश्चिमेला वारुणी तु। वायव्येशी मृगवाहीनी तु। उत्तरे कौमारी तु। ईशान्ये शुलधारिणी।।१८।।

उर्ध्वदिशे ब्रह्माणी तु। अध: वैष्णवी स्वरूपे तु। नाना रुपे अवतरूनी तु। रक्षण माझे कर जगदंबे।।१९।।
येणेची परी शवधारिणी। चामुंडेश्वरी दशदिशा स्वामिनी। अग्रे जया विजया पृष्टेनी। रक्षण माझे कर जगदंबे।।२०।।
अजिता तु वामभागी । अपराजिता सव्यभागी। उद्योतिनी शिखाभागी। रक्षण माझे कर जगदंबे।।२१।।
ललाटे रक्षी मालाधारीनी। भुवया रक्षी यशस्वीनी। नासिके रक्षी यमघण्टीणी। भुवयांमध्ये त्रिनेत्रा।।२२।।
नेत्रमध्य रक्षी शंखिनी। रक्षी कर्ण द्वारवासिनी। रक्षी कालिका कपोलिनी। कर्णमुलभागे तु शांकरी।।२३।।
नासिका अन सुगंध सम। ऊर्ध्व ओष्ठ सकृत विषम। चर्चिका रक्षी मातुल। अधोष्ठे अमृत सरस्वती।।२४।।
दन्त रक्षी कौमारी तु। कण्ठ रक्षी चण्डिका तु। स्वर रक्षी चित्रघंटा तु। महामाये टाळू रक्षी गे।।२५।।
स्वरयंत्र कामाक्षी रक्षी। वाचा सर्वमंगली रक्षी। ग्रीवा भद्रकाली रक्षी । पार्श्वभागे धनुर्धरी।।२६।।
नीलग्रीवा कण्ठ बाह्येती। कंठांतरे नलकुबरी ती। खड्गिनी रक्षी स्कंदाती। रक्षणा लागी येई गं।।२७।।
हस्तांशी दण्डिणी रक्षी । अंगुलां अम्बिका रक्षी । शुलेश्वरी नखां रक्षी । कुक्षी रक्षी कुलेश्वरी।।२८।।
स्तन रक्षी महादेवी। मन: शोकविनाशिनी देवी । ह्रदया रक्षी ललितादेवी । उदरे रक्षी शुलधारिणी।।२९।।
नाभि रक्षी कामिनी ती। गुह्य रक्षी गुह्येश्वरी ती। पुतना- कामिका लिंगेति । गुदे रक्षी महिषवाहिनी।।३०।।
कटीभाग रक्षी भगवती। जानु रक्षी विन्ध्यवासिनीती। सकल कामना प्रदाती। जंघा रक्षी महाबला।।३१।।

गुल्फे रक्षण करी नारसिंही। पादपृष्ठासी तैजसी पाही। श्रीदेवी रक्षी पाद अंगुलीही। तथा पादाध तलवासिनी।।३२।।
नखे दंष्ट्राकरालीनी। विक्राळ स्वरुप धारिणी। केशाशी उर्ध्वकेशिनी। रोमे कौबेरी त्वचे वागीश्वरी।।३३।।
रक्त-मज्जा वसा मांस। रक्षी पार्वती अस्थिस। कालरात्रि आतड्यांस। पित्त रक्षी मुकुटेश्वरी।।३४।।
कमलदले सप्तचक्र स्वामीनी। कफाशी देवी चुडामणी। नखदाह रक्षी नखज्वालीनी। अभेद्या तारक सर्वसंधीसी।।३५।।
शुक्राचे रक्षण करो ब्रह्माणी। छाया रक्षो छत्रेश्वरी नि। रक्षण करो धर्मधारिणी। अहंकार मन बुद्धीचे।।३६।।
प्राण अपान व्यान उदान। समान हे वायुचे लक्षण। वज्रहस्ता करो रक्षण। प्राणे अधिष्ठी कल्याणशोभना।।३७।।
रस-रुप-गंध-शब्द । स्पर्शादि सकल विषयवाद। योगीनी तोडी हा प्रमाद। सत्व-रज तमे नारायणी।।३८।।
आयुष्य रक्षी वाराही। धर्मा रक्षी वैष्णवी ही। यश किर्ती लक्ष्मी धनही। विद्येसी रक्षी माये चक्रिणी।।३९।।
गोत्र रक्षा इंद्राणी करो। पशूं रक्षा चण्डिका करो । पुत्र रक्षा महालक्ष्मी करो । भार्येसी रक्षी गे भैरवी।।४०।।
माझ्या मार्गाची सुपथा। रक्षा करो क्षेमकरी तथा। महालक्ष्मी राजद्वार पथा। विजयादेवी सर्वत्र दे विजय।।४१।।
देवी माते विनंती तुजला। जरी अनावधाने उल्लेख राहीला। ते रक्षणा उचित वाटे तुजला। रक्षी जयंती पापनाशिनी।।४२।।
मनुष्य आपल्या जीवनी। उचित ते अपेक्षी मनी । या कवचाची कास धरोनी। यात्रा नित्य करावी।।४३।।
या कवचाने सुरक्षित होईल। जिथ जिथ मनुष्य जाईल। तिथ धन लाभ विजयेल। पावेल संपुर्ण सिद्धी ।।४४।।

या कवचाचा पाठ करील। मनुष्य निर्भय होईल। अपमृत्युही त्याचा टळेल। कवचाच्या पुण्यप्रभावाने।।४५।।
जो भक्ती श्रद्धायुक्त अंत:करणे। त्रिकाल करील याचे पठणे। दैवी कला प्राप्त होईजाणे। अपराजित होईल त्रैलोकी।।४६।।
व्याधी समुळ जातील। प्राणीदंशादि सकल। विषं नाश पावतील। सत्य सत्य त्रिवाचा।।४७।।
अभिचार जारण मारण व्याधी। क्रिया मंत्र यंत्र तंत्रादि। कवच ह्रदयी धरणे आधी। बाधा न बाधे जाना।।४८।।
पृथ्वीवरील ग्रामदैवत। आकाशीचे विशेष दैवत। जलसंबंधी गण प्रकटत। आणीक लक्षणे वर्णीतो।।४९।।
जन्मापासूनी कुलदेवता, माला। डाकिनी शाकिनी सकला। ग्रहभूत पिशाच्च यक्ष गंधर्वाला। वर्णू कोठवरी कित्येक।।५०।।
ब्रह्मराक्षस वेताल नांव। कूष्मांड आणिक भैरव। आदि अनिष्टकारक देव। दुर जाती कवच प्रभावे।।५१।।
राजद्वारे मिळेल मानसन्मान। तेजाचे होईल वर्धन। होईल यश संपादन। कीर्ति वाढेल भूमंडळी।।५२।।
या कवचाचे पठण करता। किर्ती पसरेल सर्व जगता। सुयश वृद्धी मिळेल सर्वथा। माना हे सत्य वचनची।।५३।।
या कवचाचे पठण करून। करी सप्तशती पाठ पठण। जोवर भू वन पर्वत कानन। तोवरी नांदेल वंश त्याचा।।५४।।
देहाचे अंत:कालापर्यंत शरणे। भगवती महामाया प्रसादपूर्णे । नित्य पावेल परमपद पुर्णे। देवादिकांशीही दुर्लभ जे।।५५।।
दिव्य रूप धारन करोनी। कल्याणमय शिवानंद मिळोनी। शिव सहयोगे आनंद पावूनी। आनंदलोक पावेल।।५६।।

**इंति देव्या: कवचं संपुर्णम् ।**

# अर्गलास्तोत्र

**विनियोग :-या अर्गला स्तोत्रमंत्राचे ऋषि विष्णुजी असुन व्याकरणाच्या अनुष्टुप छंदामध्ये या श्लोकांची निर्मिती झाली आहे. श्री महालक्ष्मी देवता या स्तोत्रमंत्राची अधिष्ठात्री देवी आहे.**

**संकल्प : श्री जगदंबा देवीच्या प्रित्यर्थ सप्तशति पाठाच्या अंगभूत अर्गला स्तोत्राच्या जपाचा विनियोग** करितो असे बोलुन जल सोडावे.

**।। ॐ नमश्चंडिकायै ।। मार्कंडेय उवाच :-**

**नमन माझे जयंती मंगला। काली भद्रकाली कपालीनीला ।**
**दुर्गा क्षमा शिवा धात्रीला। आणि स्वाहा स्वधा देवींना।।१ ।।**
**चामुंडा अन प्राणी पिडाहारिणी। देवी कालरात्री सर्वत्र व्यापिनी।**
**तुमचा जयजयकार असो। तुमचा जयजयकार असो।।२ ।।**
**मधु आणि कैटभ दानवमारिणी। नमन तुते ब्रह्मावरप्रदायिनी ।**
**माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।३ ।।**
**महिषासुर दानवनाशिनी। भक्ता नित सुखदाईनी ।**
**माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।४ ।।**

रक्तबीज दानवनाशिनी। चंडमुंड दानवनाशिनी ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।५।।
शुंभ आणि निशुंभमर्दिनी। धुम्रलोचन दानवमर्दिनी ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।६।।
सकल भक्त चरणा भजती। माये तुच सर्वसौभाग्यदायिनी ती ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।७।।
तुझे चरित्र अचिंत्य देवी। तुच शत्रु विनाशक देवी।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।८।।
माये तु पाप ताप दुरित हारक। भक्तीने तवचरणी नतमस्तक ।
माये तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।९।।
तुझे स्मरण करिता जाण। सकल व्याधी करिशी निवारण ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१०।।
या संसारी राहूनी प्राणी। तव भक्ती करिती प्रेमानी ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।११।।

मला तु सौभाग्य दे आरोग्य दे। सुखाचे शिखर परमसुख दे ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१२।।
जो कोणी माझा द्वेष करी। त्यांचा नाश माझे बलवर्धन करी ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१३।।
माते माझे कल्याण कर। माते तु संपत्ती प्रदानकर ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१४।।
तुझ्याचरणी देव आणि दानवं। नतमस्तक होती विनय भावं ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१५।।
तुझ्या भक्तांशी करी विद्वान। तसेच करी यशवान-लक्ष्मीवान ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१६।।
प्रचंड दैत्यांचा करी दर्प दालन। असा असे तुझा किर्तीमान ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१७।।
चतुर्मुख ब्रह्माजी गाती गुणाशी। तुच चार भुजा धारण करिशी ।
माते तु मला रुप दे जय दे। यश दे काम क्रोधादिवर जय दे।।१८।।

अंबिके तुज श्रीकृष्ण स्तविती । नित्य निरंतर भक्ती करिती ।
माते तु मला रुप दे जय दे । यश दे काम क्रोधादिवर जय दे ।।१९।।
हिमालयाची कन्या पार्वती । तिचे पती शंकर तुज स्तविती ।
माते तु मला रुप दे जय दे । यश दे काम क्रोधादिवर जय दे ।।२०।।
शचीपती इंद्रदेव सद्भावे । पुजिती तुज सुस्वभावे ।
माते तु मला रुप दे जय दे । यश दे काम क्रोधादिवर जय दे ।।२१।।
प्रचंड बलशाली दानवगण । त्यांचे करिशी तु निर्दालन ।
माते तु मला रुप दे जय दे । यश दे काम क्रोधादिवर जय दे ।।२२।।
देवी अंबिका माये निजभक्ता । देई सदैव असिम आनंद आता ।
माते तु मला रुप दे जय दे । यश दे काम क्रोधादिवर जय दे ।।२३।।
मनाच्या इच्छेने चालणारी । पत्नी प्रदान कर माऊली ।
संसार सागरात तारणारी । उत्तम कुलोत्पन्न असावी ।। २४।।
या स्तोत्राचा पाठ करील । सप्तशती संख्या जपफळ ।
अभिष्ठ सांप्रत पावेल । तसेच पावेल विपुल संपत्ती ।। ॐ ।। २५ ।। इति देव्या अर्गलास्तोत्रम्

# कीलक

**संकल्प : कीलक मंत्राचे ऋषी शिवजी असुन अनुष्टुप छंदामध्ये या श्लोकांची निर्मिती झाली आहे. श्री महासरस्वती देवता या कीलकाची अधिष्ठात्री देवी आहे.**

**संकल्प: श्री जगदंबा देवीच्या प्रित्यर्थ सप्तशति पाठाच्या अंगभूत कीलक मंत्राचा जप करितो** असे बोलुन ताह्मणांत जल सोडावे.

**।। ॐ नमश्चंडिकायै ।।**

**मार्कंडेय उवाच!**

विशुद्ध ज्ञान असे ज्यांचे शरीर। तीन वेद ज्यांचे दिव्य त्रिनेत्र।
कल्याण हेतु अर्धचंद्र मुकुटधर। अशा शिवाला नमन असो।।१ ।।
मंत्राचे जे अभिकीलक। सप्तशति वा अन्य तारक।
मंत्र सिद्धी विघ्ननाशक। मंत्र साधना शापमोचक जे।।२ ।।
उच्चाटन सिद्धीकर्मदायक। सकल वस्तु प्रदायक।
ईष्ट मंत्र फलदायक। स्तोत्र मात्रे सिद्ध होती।।३ ।।

कार्यसिद्धीस न लगे मंत्र। कार्यसिद्धीस न लगे यंत्र।
औषधी वा अन्य तंत्र। विनायासे अभिचारक सिद्ध।।४।।
केवळ काही एवढेच नाही । संपुर्ण अभिष्ठ सिद्ध होई ।
लोकमनीची शंका निवारण होई। सप्तशती शुभ फलदायीच।।५।।
तदनंतर सप्तशती सिद्ध मंत्राते। सदाशिव झाले गुप्त करते।
सप्तशती पठण पुण्य अपरिमिते। अंत नसे या पुण्य संचया।।६।।
अन्य असे नियम परी। सहित सप्तशती पाठ करी।
कृष्ण चतुर्दशी-अष्टमीसी जरी। सर्वस्व अर्पूनी मनोभावे।।७।।
प्रसाद रुपे करी ग्रहण। करी भगवती कृपा पुर्ण।
अन्य नलगे साधन। शिवे कीलित स्तोत्र एकमेव।।८।।
या स्तोत्रात वर्णिलेल्या विधीने। सप्तशती स्पष्ट पाठ पठने ।
प्रतिदिन करिता नियमाने। सिद्ध सन्माने मिरवाल।।९।।
भय चिंता शोक नासेल। संसारी मार्ग सुगम सरल।
बाधा अपमृत्युही टळेल। मोक्ष पावेल निश्चये।।१०।।

यालागी किलकासी जानुन। परिहार उचित करुन।
संपन्नता सिद्धता समजुन। सप्तशती पाठ करावा।।११।।
स्त्रियाचे जे सौभाग्यपण। आदि असे दृष्टीगोचर।
तो सर्व देवीचाच कृपाप्रसाद। त्यायोगे नित्य पाठ करावा।।१२।।
मध्यम स्वराने या स्तोत्राचा। पाठ अल्प फलदायी साचा।
पाठ करिता उच्चस्वराचा। संपूर्ण फलप्राप्ती होतसे।।१३।।
जिच्या प्रसादे सर्व ऐश्वर्य संपत्ति। सौभाग्यारोग्य लाभे शत्रु नाशति। प
ारम मोक्षाची सिद्धी होती। तिची स्तुती का न करावी?।।ॐ।।

**इति देव्या: कीलकम्**

# तंत्रोक्त रात्रीसुक्त

ऐशा अनुपम शक्तीची। भगवती निद्रा देवीची। विष्णूप्रिया आदिमातेची। ब्रह्मदेव स्तुती करताती।।१ ।।

ब्रह्मोवाच।।

देवी तुच स्वाहा धरा। स्वधा तुच वषट्कारा। तुझेच स्वरुप सुस्वरा। जीवनदायिनी सुधा तुच ।।२ ।।

याही उपरी एक बिंदु। अर्धमात्रेचा संबंधु। उच्चारणातीत परी सबंधु। तोही तुच असशी पै ।।३ ।।

देवी तुच संध्यासावित्री। परम जननी अधिष्ठात्री। या विश्वाची पालन कर्ती। विश्व निर्मीती कारण।। ४।।

कल्पाचे अंत:काली। तु बनूनी महाकाली। ग्रास बनवूनी गिळी। समस्त सृष्टी एकसवे।।५ ।।

हे जगत्जननी माते। अवतार जगत् उत्पतीते। सृष्टी- स्थितीरूपा पालनाते। कल्पांती संहार धरी रुप।।७।।

महाविद्या महामाया तुच। महामेधा महास्मृती तुच। महामोहरूपा महासुरी तुच। त्रिगुणांची जननी प्रकृती।।८ ।।

भयंकर कालरात्री महारात्री ।तिसरी असे मोहरात्री।" श्री "ईश्वरी" ह्री "पात्री। तुच हो बोधस्वरूपा ।। ९।।

लज्जा पुष्टी तुष्टी तु। शांति क्षमा मिरवी तु ।खड्गीनी शुलीनी घोररूपा तु ।गदा चक्र शंख धनुषधारिणी।।१० ।।

बाण भुशुण्डी परिघ सर्वही। तुझे अस्त्रे अमोघ मही। सौम्यातील तु सौम्यही। पदार्थ सुंदर आणिक।।११ ।।

पर अपर त्याउपरी ।तुची एक परमेश्वरी। अन्य वस्तुरुप चराचरी। सत् असत् तूची तू।। १२।।

सर्वशक्ती तूची माये। जगत् सृष्टी पालन संहारे। स्तुती स्तवने वर्णन पाहे। कैसे म्यां करावे ।। १ ३ ।।

भगवंतासी निद्राधीन केले। जव कर्ताची निद्राधिन झाले। तव स्तुतीसी करण्या भले। अन्य कोण समर्थ।।१ ४ ।।

मला शिव विष्णूला। दिधले काया स्वरूपाला। तुझ्या स्तुती स्तवनाला। शक्ती कोणा असेल ।।१ ५ ।।

इति रात्रिसूक्तम् ।

# नवार्णविधि:

जपाला सुरुवात करताना हातात जल घेऊन खालील प्रकारे संकल्प करावा.

**संकल्प : ॐ अस्य श्रीनवार्ण मंत्रस्य ब्रह्मा विष्णु रुद्रा ऋषय:, गायत्री अनुष्ठुभ छंदांसि, श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वती देवता:, ऐं बीजम्, ह्रीं शक्ति:, क्लीं कीलकम् , श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वती प्रीत्यर्थे जपे विंनियोग:** असे बोलुन हातातील जल ताम्हणात सोडावे.

नंतर पुढे लिहील्याप्रमाणे प्रत्येक देवता आणि अवयवाचा उच्चार करुन उजव्या हाताच्या बोटांनी शरीराच्या विविध भागांना किंवा अवयवांना स्पर्श करून त्या त्या ठिकाणी देवता स्थापित कराव्यात. जसे की शिर,मुख,ह्रदय...

**ऋष्यादिन्यास:**

**ब्रह्मा विष्णु रुद्र ऋषिभ्यो नम: - शिरसी** (मस्तकाला हाताने स्पर्श करावा.)

**गायत्री अनुष्ठुभ छंदेभ्यो नम: - मुखे** ( मुखाला हाताने स्पर्श करावा.)

**महाकाली महालक्ष्मी महासरस्वती देवताभ्यो नम: - ह्रदि** (ह्रदयाला हाताने स्पर्श करावा.)

**ऐं बीजाय नम: -गुह्ये** (शरीराच्या मागील भागास डाव्या हाताने स्पर्श करावा.)

**ह्रीं शक्तये नम: - पादयो:** (दोन्ही पायांना हाताने स्पर्श करावा.)

**क्लीं कीलकाय नमः - नाभौ** (नाभिला हाताने स्पर्श करावा.)
**" ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडाये विच्चे " करं संशोध्य** (हाताची शुद्धी करावी.)

अशाप्रकारे ऋषिन्यास पुर्ण झाल्यावर पुढील क्रमाने न्यास करावेत.

**करन्यास :**
**ॐ ऐं अंगुष्ठाभ्यां नमः** (दोन्ही हाताच्या तर्जनीने आंगठ्याला स्पर्श करावा.)
**ॐ ह्रीं तर्जनीभ्यां नमः** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने तर्जनीला स्पर्श करावा.)
**ॐ क्लीं मध्यमाभ्यां नमः** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने मध्यमेला स्पर्श करावा.)
**ॐ चामुंडायै अनामिकाभ्यां नमः** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने अनामिकेला स्पर्श करावा.)
**ॐ विच्चे कनिष्ठिकाभ्यां नमः** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने कनिष्ठिकेला स्पर्श करावा.)
**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे करतल करपृष्ठाभ्यां नमः** (हातावर हाताने स्पर्श करावा.)

**हृदयादि न्यास :**
**ॐ ऐं हृदयाय नमः** (उजव्या हाताने हृदयाला स्पर्श करावा.)
**ॐ ह्री शिरसे स्वाहा** (उजव्या हाताने शिराला स्पर्श करावा.)

ॐ क्लीं शिखायै वषट् (उजव्या हाताने शेंडीला स्पर्श करावा.)
ॐ चामुंडायै कवचाय हुम् (डाव्या हाताने उजव्या व उजव्या हाताने डाव्या खांद्यास स्पर्श करावा.)
ॐ विच्चे कनिष्ठिकाभ्यां नम: (दोन्ही हाताच्या आंगठ्याने कनिष्ठिकेला स्पर्श करावा.)
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे करतल करपृष्टाभ्यां नम: (हातावर हाताने स्पर्श करावा.)

अक्षरन्यास:
ॐ ऐं नम: शिखायाम् (शेंडी)
ॐ ह्री नम: दक्षिण नेत्रे ( उजवा डोळा)
ॐ क्लीं नम: वामनेत्रे (डावा डोळा)
ॐ चां नम: दक्षिण कर्णे (उजवा कान)
ॐ मुं नम: वामकर्णे (डावा कान )
ॐ डां नम: दक्षिण नासापुटे (उजवी नाकपुडी )
ॐ यैं नम: वाम नासापुटे (डावी नाकपुडी )
ॐ विं नम: मुखे (तोंड)
ॐ च्चें नम: गुह्ये ( मागील गुह्यभागांस डाव्या हाताने स्पर्श करुन हात धुणे.)

मुलेन अष्टवारं व्यापकं कुर्यात् -

ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे या मंत्राने ८ वेळा दोन्ही हातांनी डोक्यापासुन पायापर्यंत स्पर्श करावा.

दिङ्न्यास:

ॐ ऐं प्राच्यै नम:, ॐ ऐं आग्नेय्यै नम: , ॐ ह्रीं दक्षिणायै नम:, ॐ ह्रीं नैर्ऋत्ये नम:, ॐ क्लीं प्रतिच्यै नम:, ॐ क्लीं वायव्यै नम:, ॐ चामुंडायै उदीच्यै नम:, ॐ चामुंडायै ऐशान्यै नम:, ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे उर्ध्वायै नम:, ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे भूम्यै नम: अशाप्रकारे दहा दिशांना न्यास विधीने देवता स्थापित कराव्यात.

ध्यानम्

खड्ग चक्र गदा बाण धनुष परिघ त्रिशूल धरुन।<br>
भुशुंडी शीर शंख धारण माथी तीन नेत्र भूषन।।<br>
अंगावरी दिव्याभूषन साजे कांती निलवरन ।<br>
दश पाद दश वदन ब्रह्मा जिचे करी स्तवन ।।१।।<br>
अक्षमाला परशु बाण वज्र पद्म धनुष धरुन ।<br>
कुंडिका दंड शक्ति खड्ग ढाल शंख घंटा घेऊन।।<br>
मधु पात्र शूल पाश चक्र कमल दिव्य आसन।<br>
महिषासूरा येई मारुन महालक्ष्मीचे करा भजन ।।२।।

**घंटा शूल हल शंख मुसल चक्र धनुष बाण।**
**शारदीय चंद्रकांती शोभा दिसते अती महान।।**
**गौरी रुपे प्रकटुन देई आधार लोकां तीन।**
**शुंभ दैत्य नाश करी सरस्वतीचे करा भजन ।।३।।**

असे ध्यान करुन

“ **ऐं अक्षमालिकायै नम:** ” या मंत्राने जपमाळेची पुजा करावी.

नंतर माळेची प्रार्थना करावी:-

**ॐ मां माले महामाये सर्वशक्ति स्वरूपिनी । चतुर्वर्ग: न्यत: तस्मान्मे सिद्धिदा भव ।।**

**ॐ अविध्नं कुरु माले त्वं ग्रहणामि दक्षिणे करे । जपकाले च सिद्ध्यर्थं प्रसीद मम सिद्धये ।।**

**ॐ अक्षमाला अधिपतये सुसिद्धिं देहि देहि सर्व मंत्रार्थ साधिनि साधय साधय सर्वसिद्धिं परिकल्पय परिकल्पय मे स्वाहा ।**

या ध्यानानंतर

“**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे** ”

या मंत्राचा १०८ / १००८ वेळेस जप करावा.

जप पुर्ण झाल्यानंतर

**गोपनीयातील गोपनीयाचे रक्षण। देवी सदैव करिशी जान।**
**मी केलेल्या जपा स्विकारुन। तवकृपेने होवो सिद्धी प्राप्त।।**

हा श्लोक म्हणून उजव्या हातातील जपमाळ देवीच्या डाव्या हाताला स्पर्श करावी.

**संकल्प : प्रथम मध्यम चरित्राचे ऋषि ब्रह्मा विष्णू महेश , देवता महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती , छंद गायत्री अनुष्ठुभ, नंदा शाकंभरी शक्ती, रक्तदंतिका दुर्गा भ्रामरी बीज. अग्नि-वायु-सुर्य तत्व, ऋग्वेद आणि सामवेद ध्यान, सकल कामना सिद्धि अर्थाने श्री महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती प्रित्यर्थ जप करतो(ते).** असे बोलून संकल्पाचे जल ताह्मणांत सोडावे. त्यानंतर पुढील श्लोकाने न्यास करावेत.

**सप्तशती न्यास:**

**महाविद्या महामाया तुच। महामेधा महास्मृती तुच।**
**महामोहरूपा महासुरी तुच। त्रिगुणांची जननी प्रकृती।।** अंगुष्ठाभ्यां नम:
**देवी आमुचे शुलाने रक्षण करी। अंबिके आमुचे खड्गे रक्षण करी।**
**घण्टा ध्वनी तथा धनुष्य टंकारी। रक्षण करी ओ जगदंबिके।।** तर्जनीभ्यां नम:

पुर्व पश्चिम दक्षिण दिशांनी। रक्षी मजसी माय भवानी।
उत्तरेला त्रिशूल फिरवूनी । रक्षण करी ओ जगदंबिके।। मध्यमाभ्यां नम:
तिन्ही लोके जे परम सुंदर। रूप विचरति अति भयंकर।
दोन्ही रूपांनी सत्वर। भूलोकीची रक्षा करी।। अनामिकाभ्यां नम:
खड्गीनी शुलीनी घोररूपीनी । गदा चक्र शंख धनुषधारिणी।
बाण भुशुण्डी परिघ या जनी । तुझे अस्त्रे अमोघ मही। कनिष्टिकाभ्यां नम:
सर्वस्वरूपा सर्वेश्वरी । शक्तिसंपन्न दिव्य दुर्गेश्वरी।
भयापासून रक्षा करी। नमस्कार करितो तुजलागी।। करतल करपृष्टाभ्यां नम:
महाविद्या महामाया तुच। महामेधा महास्मृती तुच।
महामोहरूपा महासुरी तुच। त्रिगुणांची जननी प्रकृती।। ह्रदयाय नम:
देवी आमुचे शुलाने रक्षण करी। अंबिके आमुचे खड्गे रक्षण करी।
घण्टा ध्वनी तथा धनुष्य टंकारी। रक्षण करी ओ जगदंबिके।। शिरसे स्वाहा
पुर्व पश्चिम दक्षिण दिशांनी। रक्षी मजसी माय भवानी।
उत्तरेला त्रिशूल फिरवूनी । रक्षण करी ओ जगदंबिके।। शिखायै वषट्
तिन्ही लोके जे परम सुंदर। रूप विचरति अति भयंकर।

दोन्ही रूपांनी सत्वर। भूलोकीची रक्षा करी।। कवचाय हुम्
खड्गीनी शुलीनी घोररूपीनी । गदा चक्र शंख धनुषधारिणी।
बाण भुशुण्डी परिघ या जनी । तुझे अस्त्रे अमोघ मही। नेत्रत्रयाय वौषट्
सर्वस्वरूपा सर्वेश्वरी । शक्तिसंपन्न दिव्य दुर्गेश्वरी।
भयापासून रक्षा करी। नमस्कार करितो तुजलागी।। अस्त्राय फट्

(हे प्रचलित न्यास विधी आहेत. ज्यांना विस्तारित न्यास करायचे असतील त्यांनी इतर ग्रंथाचा आधार घेऊन सारस्वत-मातृगण-षड्देवी-ब्रह्मादि-महालक्ष्म्यादि -बीजमंत्र-विलोमबीज-मंत्रव्याप्ति आदि न्यास करावेत.)

ध्यानम्

श्री-प्रभा विद्युत कांती त्रिनेत्रधारिणी दुर्गा शक्ति ।
चंद्रमुकुट शिरी सेवेसी कन्या अगणीत असती ।
चक्र गदा तलवार ढाल बाण धनुष पाश हाती ।
सिंहावरी बैसूनी दुर्गा दावी भयंकर रूप अती।

# अध्याय पहिला

**प्रसंग : मेधा ऋषींकडून सुरथ राजा आणि समाधिस भगवतीचा महिमा वर्णन तसेच मध-कैटभ वध**

**संकल्प : प्रथम चरित्राचे ऋषि ब्रह्मा, देवता महाकाली, छंद गायत्री, शक्ति नंदा, बीज रक्तदन्तिका,तत्व अग्नि,स्वरुप ऋग्वेद श्री महाकाली प्रित्यर्थ या पाठाचे पठण करितो** असे बोलुन ताम्हणांत जल सोडावे.

**ध्यानम् :-खड्ग चक्र गदा बाण धनुष परिघ त्रिशूल धरुन।**
**भुशंडी शीर शंख धारण माथी तीन नेत्र भूषन।।**
**अंगावरी दिव्याभूषन साजे कांती निलवरन ।**
**दश पाद दश वदन ब्रह्मा जिचे करी स्तवन ।।**

**।।ॐ नमश्चंडिकायै।।**

**ॐ ऐं मार्कंडेय उवाच ।।१।।**

सुर्याचा पुत्र सावर्णि नामे। क्रमे आठवा मनु जन्मे। तयाची उत्पत्ती कथा सुगमे। विस्तारुन सांगे ती अवधारा।।१।। भगवतीच्या कृपा आशीर्वादे। महामाया अनुग्रह लाभे । सुर्यपुत्र सावर्णि महानुभावे। कथा मन्वंतरस्वामीची श्रवण करा।।३।। स्वारोचिष मन्वंतरात। सुरथ नामे एक भुप । चैत्रवंशी उत्पन्न । भुमंडलाधिपती असे जो।।४।। पित्यासमान प्रजाजनाची।

सेवा निरंतर करी साची। शत्रू कोलाविध्वंसी नामेची। उत्पन्न झाला सांप्रतकाली ।।५।। सुरथाची दण्डनिती प्रबल। कोलाविध्वंसी शत्रू दुर्बल। उभयपक्षी युद्ध तुंबळ। सुरथ झाला परास्त।।६।। तेव्हापासून नृपवर केवल। राहिला राज्याधिकारी बनुन। शत्रुने पुनःआक्रमण। केले उर्वरीत राज्यावर ।।७।। सुरथाची दुर्बलता पाहून। शत्रुने लुटले अपार धन। आपलेच राहिले परके होऊन। सुरथ गर्तेत बुडाला।।८।। राजऐश्वर्य संपले। मानमान्यता सर्व बुडाले। भुपती मृगयेशी निघाले। आननकानन जंगलात।।९।। विप्रवर मेधा मुनीचा । हिंस्त्र पशु पक्षी प्राण्यांचा। आश्रम देखिला साचा। शिष्ये नांदती एकत्र ।।१०।। सुरथाच्या आगमनाचे स्वागत। ऋषींने केले यथोचित । नृपवर राहिला आश्रमात । ऋषी समवेत काहीकाळ ।।११।। चिंतेने व्याकुळला जीव। जो प्रजेसाठी वेची जीवप्राण। आज असह्य झाले जीवन। प्रजाजनाच्या प्रेमास्तव।।१२।। धर्म प्रजा उभय पाहे। रक्षण कैसे होत आहे। या विषयी चिंतीत राहे। सुरथ राजा आश्रमी ।।१३।। माझा प्रधान गज । कोण स्थिती काय काज । जाने कोणते भोग आज । भोगीत असेल ये वेळी ।।१४।। धन भोजनासाठी रयत। माझ्या मागे पुढे चालत । आज दुजाधिन झालीत । काय लोटला प्रसंग ।। १५।। राज्य दुसऱ्याधिन गेले। कष्टाने सर्व जमविलेले । दुराचाऱ्याने खजाण्या लुटिले। सतत मनी ऐसे वाटे।।१६।। एके दिवशी आश्रमी । एका वैश्याला पाहूनी । आपण कोन आला कोठुनी । प्रश्न ऐसा विचारिला ।।१७।। पुसिले दुःखाचे कारण । मनी का हो उद्विग्न । भय शोक तापे मन । कारण काय खिन्नतेचे ।।१८।। सुरथ राजाचे प्रेमळ वचन। ऐकून वैश्याने केले नमन। विनीत भावाने कथन । करू लागला आदरे ।।१९।। वैश्य उवाच।।२०।। दैवयोगे माझे जनन। झाले कुटुंबात सधन। समाधि असे नामाभिधान।

वैश्य कुलीन असे मी।।२१।। धनाचे पाई लोभाने। माझ्या दुष्ट स्त्री पुत्राने। घराबाहेर काढिले जाणे। धन-स्त्रीपुत्र वंचित असे मी।।२२।। माझ्याच विश्वासू बांधवांनी। माझेच धन घेऊनी । दुर केले मजलागुनी । दु:खी होउनी वनी आलो ।।२३।। या आश्रमात राहून। प्रार्थी त्यांचे क्षेमकुशल जान। गृहीची स्थिती अवलोकून। नाही जाणत स्त्री पुत्राशी।।२४।। स्त्री पुत्राचा सदाचार। वा ना जाणीला दुराचार। सोडून सकल विचार। निश्चिंत राहिलो आश्रमी।।२५।। राजोवाच ।।२६।। धनाच्या मोहे स्त्री पुत्रांनी। त्यागीले तुजशी अव्हेरोनी। ना ठेविला स्नेह तिळभरी। कृतघ्नतेचा परम बिंदु।।२७।। ऐसी घडोनी मात। दैवयोगे झाला घात। तरीही तुझे चित्तांत। त्यांचेप्रती आस्था का असे।।२८।। वै़श्य उवाच ।।२९।। आपण माझे विषयी भला। जो काही विचार केला। ठीक समजतो मी त्याला। वैश्य बोलला उत्तर।।३०।। परंतु काय असे बात। माझे मनी यत्किंचित। निष्ठुरता नाही येत। उदे केवळ स्नेहची।।३१।। धनाचे लोभापाईचं त्यांनी। पित्याचा स्नेह टाकुनी। पतीचे प्रेम अव्हेरुनी। अनुरागास दिली तिलांजली।।३२।। हे महामुने गुणहीन बंधूप्रती। माझ्या स्नेहा येई भरती। ऐसे कैसे घडुन येती। हे जाणण्या मी असमर्थची।।३३।। जरी त्याच्या स्वभावात। प्रेम मुळी नुरले आत। तरी निष्ठुरता किंचित। माझ्या मनी नयेचि।।३४।। मार्कण्डेय उवाच ।।३५।। हे ब्रह्मदेवा ऐका। त्यानंतरची पिठीका। सुरथ वैश्य निका। उभय पातले आश्रमी।।३६।। मुनीच्या सेवेत उपस्थित। नृप-वैश्य आले साथ। विनयपुर्वक आचरण करीत। यथायोग्य न्याय अपेक्षिती।। ३७।। तदनंतर यथाविधी। राजा आणि समाधि। वैश्यात वार्तालाप आधी। आरम्भ

करिते झाले।।३८।। राजोवाच।।३९।। हे भगवन् याविषयासी। मी बोलून आपणांसी। खातरजमा करावी काहीसी। द्यावे उत्तर समर्पक।। ४०।। ये समयी माझे चित्त। माझे नाही अंकीत। या घटनेचे दु:ख अपरिमित। अपार मानसी होतसे।।४१।। राज्य माझ्या हातुनी गेले। त्यात माझे मी पण प्रेमे भरले। अंग प्रत्यंग समर्पण केले। न उरले आता काहीच।।४२।। मुनिश्रेष्ठ मी हे जाणता। माझे नाही हे आता। अज्ञान भ्रांतीत पुरता। दु:ख होते हे काय।। ४३।। स्वजनानी त्यागीले इयेला। त्याप्रती ठेवी स्नेहभावाला। उभय भावना भावाला। दु:ख मनी होताहे।।४४।। प्रत्यक्ष दोष पाहूनी भला। परी न विषयाधिन गेला। माझे मनी भ्रमच वाढला। आसेस माझ्या पुरवावे।। ४५।। आम्ही दोघे समजदार। मोह वाढला असे फार। विवेक शून्य हा व्यवहार। मुढता येई दिसून।।४६।। ऋषिरुवाच।।४७।। महाभाग समजुन घ्यावे। विषय मार्गाचे ज्ञान वर्धावे। सकल जीव मात्रास ठावे। हेच सत्य गमक।।४८।। याप्रकारे सर्व विषयाचे। व्यवहार भिन्नभिन्न साचे। प्राणी दिवसा काही रात्रीचे। दिवसराती पाहती काही।। ४९।। मनुष्य प्राणी समजदार। जरी असेल सानथोर। ते समसमान नसणार। कधीच कल्पांतीही।।५०।। पशू पक्षी मृग वनचर। सकल असती समजदार। मनुष्य प्राणिही तद्नुसार। पशू पक्षा समानची।।५१।। तथा मनुष्याप्रमाणेच। जिनं पशू पक्षांच। सत्य स्थिती असेच। अन्य प्राय: समानची।।५२।। समज असूनी पक्षी देखा। स्वत: तृषार्त असुनी निका। पिलास अन्न प्रथमका। चोचीने चारिती सप्रेमे।। ५३।। मानव असुनी समजदार। लोभवशे आपला उपकार। केलेल्याचा बदला उपकार। परतफेडीसी अपेक्षितो।।५४।। तथापि

ही सांसारिक स्थिती। बनवून ठेवणारी भगवती। महामायेची मोहमय युक्ती। भ्रमीत ठेवी हे गुढ।।५५।। जगदीश्वराची योगनिद्रारूपीनी। भगवती महामाया स्वामीनी। जग या मायेची मोहीनी। आश्चर्य न मानी अती ।। ५६।। तीच आहे सृष्टीकर्ती। प्रसन्न होता मानवा मुक्ती। वरदान देई ती निश्चिती। माता भगवती प्रेमभावे।।५७।। तीच आहे पराविद्या। संसार बंधन मोक्षाद्या। देवी सनातनी ईश्वराद्या। जगत्जननी सर्वेश्वरी।।५८।। राजोवाच।।५९।। हे भगवन् आम्हा वर्तावे। महामाये विषयी सांगावे। ही देवी कोण आहे। कथावा साद्यंत ईतिहास।।६०।। अवताराचे कार्य काय। काय स्वरूप कोण ठाव। कार्यकारण क़ाय भाव। हे ब्रह्मण सांगावे।। ६१।। तिचे चरित्र काय कोणते। श्रेष्ठ ब्रह्मर्षे सांगावे ते। जे जे स्वरूप जैसे ते। व़र्णावे द्विजे सविस्तर।।६२।। ऋषिरुवाच ।।६३।। राजन् ऐकावं वचन। नित्यरूपाचे वास्तव जान। आहे जगी तिचे महिमान। सर्वत्र व्यापिली अंबिका।। ६४।। तिच्या प्राकट्य रुपा ऐक । जगी आहेत अनेकानेक। अवतार प्रकार हरयेक। वर्णन गोड ऐकावे।। ६५।। ती नित्यस्वरुप अजन्माहे। दैवीकार्यार्थ सिद्ध आहे। नाना रुपे प्रकट वाहे। या भुतली विचरत।।६६।। कल्पाचे अंत:कालात। भगवान विष्णू योगनिद्रेत। होते झाले निद्राश्रीत। शेषशाई शय्येवर।।६७।। त्यावेळी प्रसंग अद्भुत। श्री विष्णुच्या कर्णमलात। मधु कैटभ विख्यात। प्रकट झाले दानव ।।६८।। उभय दैत्य सिद्ध झाले। ब्रह्माचा वध करण्या भले। येऊनी निकट पातले। नाभिकमल स्थित ब्रह्माच्या।।६९।। श्री विष्णुसी निद्रिस्त पाहूनी। एकचित्त ब्रह्मा होऊनी। जागविण्या त्या भुतभावनी। निद्रास्तवन आरंभिल।।७०।। या विश्वाची जी अधीश्वरी। जगताशी

जी धारण करी। संसार पालन संहारी। तेज:स्वरूप विष्णुशक्ती।।७१।। ऐशा अनुपम शक्तीची । भगवती निद्रा देवीची । विष्णूप्रिया आदिमातेची । ब्रह्मदेव स्तुती करताती ।।७२।। ब्रह्मोवाच ।।७३।। देवी तुच स्वाहा धरा । स्वधा तुच वषट्कारा। तुझेच स्वरुप सु स्वरा। जीवनदायिनी सुधा तुच ।।७४।। नित्य प्रणव अक्षरे अकार । मकार आणिक उकार । तीन मात्रांचे साकार। तुच प्रकट स्वरूप गं ।।७५।। याही उपरी एक बिंदु । अर्धमात्रेचा संबंधु । उच्चारणातीत परी सबंधु। तोही तुच असशी पै ।।७६।। देवी तुच संध्यासावित्री । परम जननी अधिष्ठात्री । या विश्वाची पालन कर्ती । विश्व निर्मीती कारण ।। ७७।। कल्पाचे अंत:काली । तु बनूनी महाकाली । ग्रास बनवूनी गिळी । समस्त सृष्टी एकसवे ।।७८।। हे जगत्जननी माते। अवतार जगत् उत्पतीते । सृष्टी- स्थितीरूपा पालनाते। कल्पांती संहार धरी रुप।।७९।। महाविद्या महामाया तुच। महामेधा महास्मृती तुच। महामोहरूपा महासुरी तुच। त्रिगुणांची जननी प्रकृती ।।८०।। भयंकर कालरात्री महारात्री । तिसरी असे मोहरात्री ।“श्रीं”“ईश्वरी”“ह्रीं” पात्री। तुच हो बोधस्वरूपा ।। ८१।। लज्जा पुष्टी तुष्टी तु। शांति क्षमा मिरवी तु । खड्गीनी शुलीनी घोररूपा तु । गदा चक्र शंख धनुषधारिणी।।८२।। बाण भुशुण्डी परिघ सर्वही। तुझे अस्त्रे अमोघ मही। सौम्यातील तु सौम्यही। पदार्थ सुंदर आणिक।।८३।। पर अपर त्याउपरी। तुची एक परमेश्वरी। अन्य वस्तुरुप चराचरी। सत् असत् तूची तू।। ८४।। सर्वशक्ती तूची माये। जगत् सृष्टी पालन संहारे। स्तुती स्तवने वर्णन पाहे। कैसे म्यां करावे।। ८५।। भगवंतासी निद्राधीन केले। जव कर्ताची निद्राधिन झाले। तव स्तुतीसी

करण्या भले । अन्य कोण समर्थ।।८६।। मला शिव विष्णूला। दिधले काया स्वरूपाला। तुझ्या स्तुती स्तवनाला। शक्ती कोणा असेल ।।८७।। माये प्रार्थितो तुजला। मोहे मोहवी मधु-कैटभाला। जगदीश्वर भगवान विष्णुला। जागवी आता त्वरीत गे ।।८८।। ऋषिरुवाच ।।८९।। ऐशारिती ब्रह्माने विष्णुला। जागविले काजकार्याला। मधुकैटभासी मारण्याला। आळवी तामस निद्रा देवी।।९०।। नयन मुख आणिक हृदय। बाहूद्वय नासिकामय। अव्यक्तजन्मा वक्षस्थलमय। ब्रह्मासन्मुख तिष्टली।।९१।। योग निद्रामुक्त झाल्यावर। जगताचा स्वामी जनार्दन। ऊठे शेषशय्येवरुन। बैसले सत्वर सागरी।। ९२।। निद्रेतुन उठता झणी। असुरा देखे तत्क्षणी। खावया जाती धावोनी। क्रोधे ब्रह्मयांसी देखा ।।९४।। भगवान श्रीहरी ऊठोनी। युद्ध करीती बाहूंनी। पाच सहस्त्र वर्ष दोन्ही। उन्मत्त दानवा समवेत।। ९५।। महामाये मोहात टाकिले दानवा। तेव्हा दानव बोलीले विष्णूदेवा। आम्ही झालो प्रसन्न मागावा। वर मागाल तो देऊ।।९६।। श्री भगवानुवाच।।९७।। आपण माझ्यावर जरी। प्रसन्न असणार तरी। व्हा मरणा तयार सत्वरी। व्हावे अन्य वर नकोची।। ९८।। ऋषिरुवाच।।९९ ।। ऐशीया लीलेत फसता। समस्त जग न्याहाळू जाता। सर्व जलची दिसे भ्रांता। उपाय सुचला मानसी।।१००।। कमलनयनासि बोलीले। पाणी विरहीत स्थले। वध करीवो निश्चये। अती शुष्क भूमीवरी ।। १०१।। ऋषिरुवाच ।।१०२।। तथास्तु बोलले त्वरी। भगवान शंख चक्र गदाधारी। मस्तक घेऊनी जंघेमाझारी। चक्राने वध केलासे।।१०३।। महामाया प्रकट येणे रिती। झाली त्वरे ब्रह्माचे स्तुती। तिच्या प्रभावाचे पुढती । सविस्तर वर्णन करू की।।१०४ ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये मधुकैटवधो नाम प्राकृत प्रथमोऽध्याय ।।**

# अध्याय दुसरा

**प्रसंग:-देवांचे तेजाने देवीचा प्रसार आणि महिषासुर सेनेचा वध.**

**संकल्प: मध्यम चरित्राचे ऋषि विष्णु, देवता महालक्ष्मी, छंद उष्णिक , शक्ति शाकंभरी, बीज दुर्गा ,तत्व वायु,स्वरुप यजुर्वेद श्री महालक्ष्मी प्रित्यर्थ या पाठाचे पठण करितो** असे बोलुन ताह्मणांत जल सोडावे.

**अक्षमाला परशु बाण वज्र पद्म धनुष धरुन ।**
**कुंडिका दंड शक्ति खड्ग ढाल शंख घंटा घेऊन।।**
**मधु पात्र शूल पाश चक्र कमल दिव्य आसन।**
**महिषासूरा येई मारुन महालक्ष्मीचे करा भजन ।।**

ॐ ह्रीं ऋषिरुवाच ।।१ ।। पुर्वकाली देव दानवांत। युद्ध झाले संवत्सर शत। घनघोर ते अपरिमित । देवेंद्र नायक देवांचे ।।२ ।। असुर नायक महिषासुर। सेना त्याची बलवत्तर। उभय पक्षी संग्रामोत्तर । असूर इंद्रपद पावला।।३ ।। युद्धांते देव पराजित। ब्रह्मासी पुढे करीत। निघाले जावया सोबत। शिवविष्णु स्थानावरी ।। ४।। महिषासुर पराक्रमाचे कथन। पराजयाचे यथा निवेदन। सविस्तर केले वृत्तांकन। देवेश्वरा सन्निध।। ५ ।। सुर्य इंद्र अग्नि वायु जान। चंद्र यम आणि वरुण। महिषासुरे केले हरण । इंद्रपदी बैसला।। ६ ।। महिषासुराने देवा समस्त । घालविले करूनी परास्त। पृथ्वीवरी देव

इतस्त। मानवासम फिरु लागले।।७।। दैत्याची सर्व करनी । आपणांसी वर्तली कथुनी । आम्ही आलो चरणी। विचार करावा दैत्यवधाचा।।८।। ऐसे वचना ऐकोनी। शिव विष्णु घेती जानुनी। तप्त झाला क्रोधाग्नि । असंतोष जाहले उभय ते।।९।। कोपे दग्ध चक्रपाणी। मुख प्रसारिले वासोना। दिव्य तेज दावोनी। भव्य प्रकाश टाकिला।।१०।। इंद्रादि देव ब्रह्मा शंकर। अन्यही देवगण थोर। दिव्य तेज काढती सत्वर। सर्व तेज एकवटले।।११।। ते सर्वतेज पर्वतासमान। दिसू लागले जाज्वल्यमान। दशदिशा प्रकाशमान। सकल देव अवलोकिती।।१२।। तेज त्यांचे अतुल परी। दिसे तेज:पुंज नारी । दिसू लागले त्रिलोकामाझारी। प्रकट रुपे अपार।।१३।। मूख निर्माण शिव तेजाचे। केश प्रकट यमतेजाचे। श्रृंगार पुर्ण दिसे साचे। बाहू बनले श्री विष्णू।।१४।। चंद्र तेजे स्तन निर्माण। इंद्रतेजे कटी निर्माण। जंघा पिंढरी छान वरुण। नितंब पृथ्वी तेजाने।।१५।। ब्रह्म तेजाने द्वय चरणां। सूर्य तेजे अंगुले चरणांना। वसु तेजे अंगुले हस्तांना। कुबेर तेजे प्रकटे नासिका।।१६।। प्रजापतीची दंत निर्मीती। त्रिनेत्र अग्नि तेजे निर्मीती। प्रकट झाले एक संगती। कालमहिमा अगाध।।१७।। भुवया निर्मील्या संध्याने। कर्ण निर्मीले वायुने। अन्यान्य तेज न्यायाने। कल्याणमयी प्रकटली।।१८।। समस्त देवाच्या तेज:पुंजातुन। देवी प्रकटली महाबलवान। त्रस्त देवता समाधान। पावल्या ते वेळी।। १९।। त्रिशूलातून त्रिशूल शंकराने। चक्रातून चक्र श्रीविष्णूने। उत्पन्न करोनी लिलेने। भगवतीशी अर्पिले।।२०।। वरुणाने शंख दिला भेट। अग्निने शक्ती दिली थेट। वायुने दिले बाणासकट। दोन तीर स्वसामर्थ्ये।।२१।। वज्रातून वज्र उत्पन्न करी। प्रदान करी सहस्त्रनेत्रधारी । ऐरावताची घंटा काढुन त्वरी। इंद्र देई अविलंबे।।२२।। कालदण्डातुनी यम दे दण्ड। पाश वरुण स्फटिकमाला अखण्ड।

प्राप्त झाले माला दण्ड। ब्रह्मा अर्पी कमंडलू।।२३।। सुर्य तेजे रोम भार। काले अर्पिली ढाल तलवार । रोमे देवी अपरंपार। प्रभा फार फाकली।।२४।। क्षीरसमुद्रे उज्वल हार। अजीर्ण वस्त्रे दिधली अपार। दिव्य चुडामनी कुंडले सत्कार। सन्माने करी समुद्रदेव।।२५।। उज्वल अर्धचंद्र भुजे केयूर। चरणांशी निर्मल नूपुर। गळ्यात माला सुंदर। अंगुले रत्न मुद्रिका।।२६।। अतिदिव्य शोभिवंत। फरश विश्वकर्मा अर्पित। आयुध श्रृंगारे मिरवत। जगतजननी पहावी।।२७।। नाना प्रकारची अस्त्रे। आभूषणे आणिक शस्त्रे। अभेद्य कवच मात्रे। कमल पुष्पमाला अर्पिल्या।।२८।। सुंदर कमलपुष्प जलनिधीने। सिंह वाहन हिमालयाने। विविध रत्न समर्पणे। केले सप्रेमे भावपूर्ण।। २९।। अर्पी मधुपात्र थोर। धनाध्यक्ष तो कुबेर। शेष देई नागहार। शेषशाई वर्ते जो।।३०।। देवतां देती नानाप्रकार। अलंकार नि पुष्पहार। समस्त मिळोनी सत्वर। अस्त्रशस्त्राने सन्मानिती।।३१।। तदनंतर अट्टाहासे वारंवार। गर्जना घुमु लागली अपार। गर्जनेचा अति उच्चस्वर। मेघमंडळ डळमळले।।३२।। अत्यंत उच्चस्वराने देवीचा। सिंहनाद गगनी साचा। आकाशी गर्जला प्रतिध्वनीचा। कंप उठला समुद्रात।।३३।। पृथ्वी डोलू लागली। पर्वत हालू लागली। देववाणी प्रकट झाली। देवी तुझा जयजयकार असो।।३४।। विनम्रपणे महर्षींनी। गाईले देवीस्तव स्तवनांनी। वार्ता गेली दानवगणी। क्षोभग्रस्त झाले दैत्यगण।।३५।। कवच परिधानिले शरीरे। हाती घेवोनी हत्यारे। सुसज्जित दोन्ही करे। उठूनी उभे ठाकले।।३६।। महिषासुर क्रोधे भरला। आ: काय चालले उच्चारिला। सिंहनादाच्या दिशे धावला। असुरांच्या समवेत।।३७।। त्यांच्या चरणाचा अतीभार। पृथ्वी दबुन गेली अपार।

माथा मुकुट रेषा अपार। धनुष् टकारे क्षुब्ध होई।।३८।। सहस्त्र कर आच्छादून। दशदिशा टाकिल्या व्यापुन। दैत्य सेनेसी भिडून। युद्ध आरंभ जाहला।।३९।। महिषासुराचा सेना नायक। महाबली चिक्षुर नामक। अस्त्रं शस्त्रं घेऊनी व्यापक। सेना आली धाऊनी।।४०।। देवीशी युद्ध छेडिले। चतुरंग सेनेसहित लढले। साठसहस्त्र रथ आले। उदग्र नामक दैत्याचे।।४१।। एक करोड महाहनु। पाच करोड असिमा नामु। दैत्य उतरले रणांगणु। युद्ध करू लागले।।४२।। साठ लाखासहित बाष्कल। परिवार दानवही सकल। सेनेसहित युद्धभूमीत चपल। युद्धालागी पातले।।४३।। बिडाल नामक दैत्य। पाच अरब रथासहित। समरांगणी त्वरीत। युद्धालागी पातले।।४४।। त्याही व्यतिरिक्त महादैत्य। रथ हत्ती घोड्यासहित। युद्ध करण्या देवी सोबत। समरांगणी पातले।।४५।। स्वयं दैत्य महिषासुरही। कोटिकोटि सहस्त्र रथासहि। हत्ती घोड्यासह उभा राही। सेना घेऊनि पातला ।।४६।। तो येवोनी प्रत्यक्ष देवीशी। तोमर भिन्दिपाल शक्तिनिशी। मुसल खड्ग परशुपट्टिशी। प्रहार करु लागला।।४७।। काही शक्तिचा प्रहार करिती। काही पाशाचा उपयोग करिती। ऐसे नानारिती नानामती । युद्ध चालले तुंबळ।।४८।। खड्गप्रहार दैत्यांनी भला। देवीशी मारण्यां केला। देवीनेही केले प्रत्युतराला। दानवं केले गारद।।४९।। अस्त्रंशस्त्रांचा वर्षाव केला। छेदिले सकल शस्त्राला। थकवा तिच्या परिश्रमाला। लवलेश मात्र नसेची ।।५०।। देव आणिक ऋषि करीती। भगवती परमेश्वरीची स्तुती। अस्त्र शस्त्रांची वर्षा अती। देवी करी दानवांवरी।।५१।। देवीसिंह क्रोधे चाली। मान नि आयाळ हाली। असुर सेनेत झेपं घाली। वनातील वनव्यां सारिखा।।५२।। रणभूमीत निश्वा:स

अम्बिकेनी। सोडीले कितीतरी अगणितांनी। गण प्रकटत तितुकेनी। शस्त्रांचा सामना करण्याशी।।५३।। ढोल वाद्यांचा गजर। गण करिती अपार। त्रिशुल-शक्तिचा वापर। करुनी मारिले महादैत्या।।५४।। कित्येका घंटानादे भयंकर। मूर्च्छित केले जागेवर। निपचित पडले सत्वर। झाले भूमीवर गतप्राण।।५५।। कित्येका धरतीवर ओढोनी। कित्येका पाशे बांधुनी। कित्येकांशी तलवारीनी। यमसदनी धाडिले।।५६।। गदा मुसलाचा देऊनी मार। दानव लोळविले धरतीवर। कित्येक केले पृथ्वीवर ढेर। वमन करिती रक्ताचे।।५७।। ह्रदयावरी वार झेलून। तीक्ष्ण शुले दैत्यगण । मृत झाले ह्रदय फुटुन। प्राण वेचिले रणांगणी।।५८।। वर्षाव झाले बाणाचे। कंबर तुटले असुरांचे। भीषण युद्ध प्रसंगाचे। स्वरुप अती भयंकर।।५९।। देवपीडक दानवगण। होऊ लागले गतप्राण। कित्येक छिन्न विछिन्न। गळे कापून पडले ते।।६०।। कित्येक दैत्याचे मस्तक। शरीर विदीर्ण अनेक। पाय तुटले कित्येक। पृथ्वीवर पडलेले।।६१।। कित्येका अर्धभागे देवीने। कापिले मधोमधाने। तुकडे केले शस्त्राने। मोक्षद्वार दाविले।।६२।। कित्येक मस्तक कापले तरी। पुन्हा युद्ध करण्या परी। आयुधे घेऊनी करी। कित्येक नाचती वाद्यावर।।६३।। बिना शिराच्या हाती। खड्ग ऋष्टि शक्ति। कित्येक ललकारिती धावती। थांब थांब म्हणोनी।।६४।। जेथे झाले युद्ध घनघोर। तेथे लोटले रक्ताचे पूर। हत्ती घोड्याचे शरीर। दानवादि विखुरले महारणी ।।६५।। जगदंबेने असुर सेने। नष्ट केले एक क्षणे। तृण काष्टास अग्निने। भस्म करावे क्षणात ।।६६।। देवीसिंह गर्जना करित। दैत्याचे प्राण हरीत। मान हलवूनी जोरात। जैसे शरीरातून प्राण ओढी।।६७।। तेथे देवी गणांनी। ऐसे युद्ध समरांगणी। केले भूतभावनी। न भूतो भविष्य करणी ती।।६८।। देवीगण लढले दानवांसी। तेणे उभे राहूनी संतोषी। सकल देवगण आकाशी । हर्षे करिती पुष्पवृष्टी।।ॐ।।६९।। **इंति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये महिषासुरसैन्यवधो नाम प्राकृत द्वितीयोऽध्याय ।।**

# अध्याय तिसरा

**प्रसंग -सेनापती सहित महिषासुराचा वध**

**ध्यानम्**

**जगदंबे तव तनु कांती सुर्य किरणासम दिसे ।**
**लाल रंगाचे लुगडे गळ्यात मुंडमाळा असे ।**
**कमल जपमाला विद्या अभय वर मुद्रा ठसे ।**
**शिरी मुकुट विराजे कमलासनी भावे नमीतसे ।।**

ॐ ऋषिरुवाच।।१।।

दैत्य सेनेची व्यथा पाहूनी। सेनापती चिक्षूर क्रोधोनी। युद्ध करण्यासी वेगानी। अंबिकेसमीप पातला।।२।। रणभूमीत देवीमातेवर। बाणवर्षा करी असूर। ढग मेरुगिरी शिखरावर। जैसा बरसे पाणी।।३।। आपल्या प्रभावी बाणांनी। दैत्यास लक्ष करूनी। अश्वसारथी सहित मारूनी। टाकिले देवीने भूवरी।।४।। त्याचे ध्वज धनुष्यास। मोडिले एका यत्नास। बाणे लक्षी शरीरास। चाळणी केली जाण पां।।५।। धनुष रथ घोडे सारथी। सर्व नष्ट झाल्यावरती। ढाल तलवार घेऊनी हाती। असूर धावला देवीकडे।।६।। मारली धारदार तलवार। देवीसिंहाच्या माथ्यावर। देवीच्या डाव्या हातावर। घाव जोरदार

घातला ।।७।। देवीसी तलवार मारिता। तुटुन गेली त्वरिता। दानव नेत्रे रक्तभरिता । हाती त्रिशूल घेतला।।८।। चालविला देवी भद्रकालीवर। त्यातुन तेज निघाले प्रखर। आकाशातुन पडता सत्वर। सुर्यमंडला सम प्रभामयी।।९।। येता आपणाकडे शुल। देवीने सोडिला शुल। तोडीला दानवी शुल। चिक्षूरा धाडिले यमसदनी।।१०।। महापराक्रमी सेनापती। माय चिक्षूरा मारी ती। ते पाहूनी चिक्षुर ख्याती। युद्धालागी सरसावला।।११।। महिषासुराचा सेनापती पडला। पिडादायक चामर पातला। तयाने शक्तीचा प्रहार केला। माता निष्प्रभ करी हुंकारे।।१२।। शक्तीचे तुटुन ठिकरे। पडता तात्काळ चामरे। बाण चालविला त्वरे। तो जगदंबेने टाकिला तोडुनी।।१३।। इतक्यात देवीसिंह चढला। हत्तीच्या माथ्यावर भला। द्वंद्व करु लागला। दानवा समवेत द्वयभुजे।।१४।। दोघे लढता लढता। पृथ्वीवर पातले तत्वता। अत्यंत क्रोधे भरता। प्रहारे कष्टविती एकमेका।।१५।। तदनंतर सिंह अतिवेगाने। झेपला आकाश दिशेने। उतरता अधोदिशेने। चामराचे शिर उडविले।। १६।। उदग्र शिलाचा हाच प्रकार। वृक्षाचा खाता झाला मार। कराल दात बुक्के जर्जर। दोघे पडले धारातीर्थी।।१७।। क्रोधे भरल्या जगदंबेने। उद्धता ताडिले गदेने। वाष्कला भिन्दिपालाने। मारिले बाणे ताम्र अंदकाशी।।१८।। त्रिनेत्रधारी परमेश्वरी त्रिशूली। उग्रास्य उग्रवीर्य खाली। महाहनु नामक त्याकाली । मारुनी सर्व टाकीले।। १९।। तलवारीच्या घावाने विडाला। राक्षसाचे कापलं मस्तकाला। दुर्धर दुर्मुख दोघाला। यमसदनी धाडिले।।२०।। अशाप्रकारे सेनेचा संहार। रेड्या रुपे महिषासुर। गणांशी त्रास देण्या स्वार।पातला युद्धभूमीत।।२१।। कुणाला फुत्कारे मारी। कुणाला खुराने

मारी। कुणाला शेपटीने मारी। सिंगानी विदारुण टाकी तो।।२२।। कुणाला सिंहनादे मारी। कुणा फिरवून मारी। कुणा श्वास रोकुन मारी। धाराशायी केले असंख्य।।२३।। सेनेला ऐसिया रिती गण। सिंहाला मारण्या जान। लागला झपट करुन। क्रोधे भरली जगदंबा।।२४।। येरीकडे महिषासुर देखी। क्रोधे खोदी धरती निकी। उंच उंच पर्वत फेकी। गर्जना करी विक्राळ ।।२५।। त्याचे वेगे चक्कर देऊन। फुटे पृथ्वी क्षुब्ध होऊन। शेपटीला टकरावून। धरती बुडवू लागला।।२६।। विदीर्ण सिंगाच्या आघातानी। ढगाचे तुकडे होऊनी। श्वासाच्या प्रचंड वेगानी। प्रचंड पर्वत वर्षती।।२७।। अशाप्रकारे महादैत्याला। क्रोधे येता देखिला। त्याचा वध करण्याला। सिद्ध जाहली चंडिका।।२८।। पाश फेकुनी दैत्याला। महान असूर बांधिला। दैत्य त्यागी महिषरुपाला। बंदिस्त झाल्या संग्रामे।।२९।। तात्काल धरिले सिंह रुपाला। जगदंबा धावली कापण्याला। धरी खड्गधारी पुरुष रुपाला। वर्तलासे मायामोहे।।३०।। देवीने बाण वर्षीले। ढाल तलवारे छेदिले। दैत्ये रुप बदलिले। महान गजरुपे प्रकटला।। ३१।। आपल्या महान सोंडीने। विशाल सिंहा ओढीले। क्षणात सोंडिस कापिले। देवीने गर्जना करीत पै।।३२।। प्राणीया समवेत एक होऊन। दैत्य बदलवी स्वरुप जान। पुनश्च रेडा होऊन। करी त्रैलोकी व्याकुळता।।३३।। जगन्माता क्रोधे भरली। मधुपान करू लागली। नेत्रे रक्तरंगे भरली। हासु लागली जोरात।।३४।। बल पराक्रमाने उन्मत्त। राक्षस गर्जना गर्जत। शिंगाने उचली पर्वत। फेकू लागला चण्डिकेवरी।।३५।। देवी सोडी असंख्य बाणी। एकेक पर्वत चूर्ण करी जानी। लडखडत होती वाणी। मधूमदे मुख लाल झालेसे।।३६।। देव्युवाच।।३७।।

मुढ मी असे मधु पित। तोवर गर्जून घे आसमंतात। मृत्यु माझे हाती निश्चित। देवही गर्जना करतील।।३८।। ऋषिरुवाच ।।३९।। असे बोलूनी देवी ऊठली। दैत्यावरी चढून बसली। पाये अर्धी काया धरली । कंठे त्रिशूल रोविला।।४०।। पायाने दाबलेला तरी । अर्धभागे वाचण्याचा परी। प्रयत्न दानव करी। मातेने प्रभाव रोकिला।।४१।। अर्धे शरीर बाकी तरी। दानव युद्धाचा यत्न करी। मग देवीने झडकरी। मस्तक कापूनी पाडिले ।।४२।। सर्वत्र मातला हाहाकार। दैत्यसेना पळोनी पार। घाबरोनी गेली साचार। देव प्रसन्न जाहले।।४३।। दिव्य महर्षी समवेत। दुर्गादेवीचे स्तवन करीत। अप्सरा नृत्य करीत। गंधर्व गाऊ लागले।। ॐ।।४४।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये महिषासुरवधो नाम प्राकृत तृतीयोऽध्याय ।।**

# अध्याय चवथा

प्रसंग :- इंद्रादि देवतांद्वारे स्तुती

ध्यानम्

सिद्धीची ईच्छा कर्ता पुरुष जिची सेवा करी ।
जया नामक दुर्गा शामल मुर्तीचे ध्यान करी ।
शिरी तेज चंद्रमुकुट भय शत्रुसी प्रदान करी ।
शंख चक्र कृपान धारिणी दुर्गा भजा सत्वरी ।।

ॐ ऋषिरुवाच ।।१।।
देवीने पराक्रम करूनी। महिषासुरा मारिले।।
इंद्रादि देवे मान तुकवुनि। स्तवनासि आरंभिले ।।
त्यांच्या सुंदर तनुतुनी। रोमांच ऊठियेले ।।
अत्यंत हर्षे कवने रचुनी । आम्हासि संतोषिले ।। २ ।।
सकल देवांची शक्ती सुंदर । स्वरुपे वर्णियेली।।

निज शक्तीने जिने सकल । भूमी व्यापियेली ।।
देवऋषिंनी जी जगदंबा । स्वरूपीच पुजियेली ।।
अत्यंत हर्षे तिजला प्रार्थुनी । भावे नमियेली ।।३ ।।
अनुपम प्रभाव बलवर्णन जिचे । करु शकेना कुणी ।।
भगवंत अनंत ब्रह्मा शिव वा । त्याविण नसती कुणी ।।
अवतरली ती चण्डिका भगवती । या विश्वा रक्षणी ।।
तीच जगत जननी देवी असे । अशुभ भयनाशिनी ।।४ ।।
पुण्यात्म्या घरी लक्ष्मी । पाप्याघरी दरिद्ररुपीनी ।।
नराहृदयी बुद्धीरुपे स्थिर । राहे अंत:करणी ।।
सत्पुरुषी श्रद्धा कुलीन मानुषी । लज्जारुपे राहुनी ।।
ऐसी दुर्गा भगवती तिला । वंदितो सतत नमुनी ।।५ ।।
अचिंत्य स्वरूप असुरनाशिनी । ऐसी जगी वर्तिली ।।
अशुभनाशिनी महापराक्रमी । जनी जिला चर्चिली ।।
अद्भूत दैत्यनाशिनी युद्धे प्रकट । चरित्रा जै वर्णिली ।।

मातेचे वर्णन करण्या समर्थ ना मी। मती अती गुंगली ।।६ ।।
अवतरली त्रैगुणी भगवती या। जगत् कल्याणाकारणे ।।
त्रिदेवही न जानती महिमा हिचा। देई आश्रयाकारणे।।
समस्त जग आधीच असे अंश । जन्म हा निमित्ताकारणे ।।
सकला तु अव्याकृता परा प्रकृति । कार्य हे अशुभनाशने ।।७ ।।
यज्ञात सकल देव तृप्त होती। केवळ उच्चारणे ।।
स्वाहारुपी ध्याती तुजला। हे जगत् जनने ।।
स्वधारुपे अवतरली जगती । पितृतृप्ती कारणे ।।
स्वाहा स्वधा नामे नमिती जन । तुजला याकारणे।।८ ।।
मोक्ष प्राप्तिचे साधन तुच अचिंत्य। महाव्रत स्वरूपिनी ।।
जितेंद्रिय दोषरहित तत्वासी । सार वस्तुची मानुनी ।।
मोक्षाचे अभिलाषे ध्याती मुनीजन। तुजला अभ्यासुनी ।।
तुच परा विद्या भगवती। तुच जगत्जननी।।९ ।।

तुच शब्दस्वरूपा निर्मल वेदऋचा । मंत्रपाठ आधारीनी ।।
वेदत्रय भगवती प्रकटली आजिविका । धनधान्य निर्मुनी ।।
विश्वोत्पत्ती पालन करण्या अवतरे । माय ही विश्वमोहिनी ।
घोरपीडा नाशिनी माय सकलं । आपत् निवारिणी ।।१० ।।
देवीचं सर्व शस्त्राचे ज्ञान म्हणुनी । मेधा आराधिली ।।
दुर्गम भवसागरातुनी तारक शक्ती । दुर्गा नमियेली ।
आसक्ति ना मुळी निवास जिचा । विष्णु वक्ष:स्थली ।
देवी लक्ष्मी भगवती गौरी । चंद्रशेखरा वंदिली ।। ११ ।।
मंदस्मित हास्य सुशोभित वदनं । निर्मल चंद्रापरी ।।
उत्तम कनककांति मनोहर अती । कमनीय ईश्वरी ।।
ऐसी स्वरुपे सुंदर जरी तरी । महिषासुर क्रोधे भरी ।।
अहो आश्चर्य कितीतरी वार । देवीवरी तो करी ।।१२ ।।
देवीमुख ते क्रोधे दिसतसे । उदयोन्मुख चंद्रापरी ।।

भुवया तानुन जरी अधिक। विक्राळ झाल्या तरी ।।
प्राण महिषासुराचा न निघे यत्न । करता कितीतरी ।।
आश्चर्य क्रोधे भरल्या यमापुढे। जीवीत कैसा तरी ।।१३।।
माते तु हो प्रसन्न तव प्रसन्नते। होतो अभ्युदयं ।।
क्रोधाने भरता क्षणात करिशी । कुलांचाही क्षय ।।
अनुभवली ही ही गोष्ट समजला । मजला आशय ।।
महिषासुराची विशाल सेना । क्षणात पावे लय ।। १४।।
सदा अभ्युदय करणारी तु । प्रसन्न होशी ज्यावर ।।
सन्मान मिळूनी यश प्राप्तीही मिळे। मिळता तव हा वर ।
त्यांच्या धर्मा ग्लानी न चढे। हृष्ट पुष्ट स्त्री पुत्रा चीर।
राही सतत यांचे सवे धन्यता। धन्य मानी तो नर ।।१५।।
नित्य श्रद्धेने जो धर्माचरण करी । देवी माते।।
त्याचे पुण्यप्रभावे स्वर्गासी पावे। देवी माते।।

याच कारणे दृढ विश्वास मनी । देवी माते।।
मनोवांछिता निश्चये देसी । देवी माते।।१६।।
दुर्गा भगवतीशी नित्यस्मरता। प्राणीमात्राचे भय हरे।।
शांत मने चिंतन करता कल्याणमयी । बुद्धी देशी त्वरे ।
दारिद्र्य दु:ख भयासि हारी आई। सकलांचे उपकारे ।।
सदासर्वदा दयार्द्र राहसी। चित्ती तुला जो स्मरे।।१७।।
राक्षसासी मारता जरी मिळे । सुख या संसारी ।।
चिरकाल नरका राहूनी भले । नित्य पाप करी ।।
ऐसे क्षणी रणसंग्रामे मरूनी । जाई स्वर्गापुरी ।।
ऐसा हेतु धरूनी मनी। माये तू शत्रूवध करी।।१८।।
केवळ शस्त्राचे प्रहार का करी। माये शत्रूवरी ।।
समस्त असुरांशी दृष्टी मात्रे भस्म। का ना करी ।।
रहस्य असे ते शस्त्रे पवित्र करूनी। धाडी यमपुरी ।

ऐसा तव उत्तम अनुपम विचार। शत्रुचाही करी । १९।।
खड्गाची तेजप्रभा फाके। अति भयंकर ज्योतीतरी ।
त्रिशुला टोक असे जरी तरी । दानवाचे नेत्र न वारी ।
याला कारण एकच सुंदर । चंद्रासम कांती मुखावरी ।
त्याचे दर्शन करिता सतचित्। आनंद प्रदान करी ।। २०।।
दुष्टाचे वर्तन दूर करी चिंतने। अन्ये ना तुलना खरी।।
तव बल अपार असे पराक्रम। दैत्यांचा नाश करी ।।
ज्या बल पराक्रमे देव बलाचेही। वारण केले त्वरी ।।
ऐसा भाव प्रकट करी भगवती। असेल शत्रु तरी ।। २१।।
देवी वरदायिनी तुझ्या पराक्रमाच्या। ऐशा नाना कथा ।।
शत्रूला भय दाखवी भक्तां अभय। रूप दावी तथा ।।
ह्रदयी अपार कृपा असे तरीही दावी। युद्धे निष्ठुरता ।।
ऐशा लीला नाना त्रिलोक जगती। कोणी न दाविता ।। २२।।

**समस्त शत्रूचा नाश करूनी। त्रैलोक्य तुवा रक्षिले ।**
**शत्रूंचे मर्दन करूनी दिली सद्‌गती। स्वर्गासी धाडियले ।**
**उन्मत्त दैत्यापासुनी प्राप्त भया। दूर तुवा करविले ।**
**ऐशा देवी भगवतीला स्तवुनी। नमनेची आळविले ।।२३।।**

देवी आमुचे शुलाने रक्षण करी। अंबिके आमुचे खड्‌गे रक्षण करी। घण्टा ध्वनी तथा धनुष्य टंकारी। रक्षण करी ओ जगदंबिके।।२४।। पुर्व पश्चिम दक्षिण दिशांनी। रक्षी मजसी माय भवानी। उत्तरेला त्रिशूल फिरवूनी । रक्षण करी ओ जगदंबिके।।२५।। तिन्ही लोके जे परम सुंदर। रूप विचरति अति भयंकर। दोन्ही रूपांनी सत्वर। भूलोकाची रक्षा करी।।२६।। शोभे तव कर पल्लवात। खड्‌ग शुल गदास्त्रं असत। त्याचे द्वारे आमुची सतत। रक्षण करी ओ जगदंबिके।।२७।। ऋषिरुवाच ।।२८।। ऐशाप्रकारे सर्व देवतांनी। स्तुती केली कवनांनी। नन्दन वणीच्या गंध पुष्पांनी। दिव्य चंदने पुजिली।।२९।। सर्व देवता मिळाली। धूप दीप सुगंध निवेदिली। भावभक्तिपुर्वक अर्पिली। तव प्रसन्नवदने बोले दुर्गा।।३०।। देव्युवाच ।।३१।। हे समस्त देवता। तुम्ही मागु ईच्छिता। ते सर्व मागा आता। सत्वर प्रेमभावाने।।३२।। देवा ऊचु :।। ३३।। माते तु आम्हा सर्व दिले। जे जे होते ईच्छिलेले। आता काहीच न उरले। वरा मागण्या तवप्रती।।३४।। का की तु आमुच्या शत्रूशी। मारिले त्या महिषासुराशी। माहेश्वरी जरी यावरी देशी। काही वर आम्हातें।।३५।।

आम्ही ज्यावेळी करू स्मरण। तेव्हा तेव्हा देई दर्शन। आमुच्यावरील संकटे महान। दुर करी गं माहेश्वरी।।३६।। जो मनुष्य भक्तिभावाने। स्तुती करील स्तोत्राने। वित्त वैभव समृद्धी देणे। धन संपत्ती वर्धना वर देई।। ३७।। ऋषिरुवाच।।३८।। देवाने स्तविले भगवतीला। जगत् कल्याणी भद्रकालीला। तथास्तु बोलूनी वर दिला। अंतर्धान पावली हे राजन् ।।३९।। ऐक भूपालका एकचित्त। पुर्वकाली तिन्हीलोकांचे हित। प्रकटली देव दैवजात। ती कथा मी वर्णिली।।४०।। आता पुढे करी अवलोकन। दुष्ट दैत्यांचे करी हनन। शुंभ निशुंभ वध करुन। लोकांचे रक्षण करण्यासी।।४१।। देवी गौरी शरीराते धरी। प्रकट होवोनी जगतांतरी। तो प्रसंग श्रवण करी। यथावत प्रसंगा वर्णितो।। ४२।। ह्रीं ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये शक्रादिस्तुतीर्नाम प्राकृत चतुर्थोऽध्याय: ।।**

# पाचवा अध्याय

**प्रसंग : देवतांद्वारे देवीची स्तुती,चण्ड-मुण्डाच्या मुखातुन अंबिकेच्या रुपाची प्रशंसा ऐकूण शुंभाने तिच्याकडे दूत पाठविले आणि ते निराश होऊन परत आले.**

**संकल्प: उत्तर चरित्राचे ऋषि रुद्र, देवता महासरस्वती, छंद अनुष्टुप् , शक्ति भीमा, बीज भ्रामरी,तत्व सूर्य,स्वरुप सामवेद श्री महासरस्वती प्रित्यर्थ या पाठाचे पठण करितो** असे बोलुन ताम्हणांत जल सोडावे.

**ध्यानम्**

**घंटा शूल हल शंख मुसल चक्र धनुष बाण।**
**शारदीय चंद्रकांती शोभा दिसते अती महान।।**
**गौरी रुपे प्रकटुन देई आधार लोकां तीन।**
**शुंभ दैत्य नाश करी सरस्वतीचे करा भजन ।।**

ॐ क्लीं ऋषिरुवाच ।।१।। पुर्वी शुंभ निशुंभ असुर । घमंडी आपुल्या बलावर । इंद्राला हरविले दुस्तर। यज्ञभाग पळवी ते त्रिलोकीचे।।२।। सुर्य चंद्र यम कुबेर। वरुणांचा जो अधिकार। वापरू लागले असूर। दोघे अती बलाने।।३।। कार्य वायु आणि अग्निचे। ते करु लागले साचे। देवा राज्यभ्रष्टापमानुनी त्यांचे। स्वर्गातुनि हाकलिले ।।४।। असुरांसी युद्ध देव

हरता। स्तवन आरंभिले अपराजिता। पुर्वी लाभल्या वरा आता। उपयोगी आणू।।५।। ऐसा विचार केला मनी। देवीशी शरण जाता झणी। जातील विघ्न हरोणी। हाचि मार्ग सुकर।।६।। करावे आपत्ती काली स्मरण। दु:खं समस्त होतील हरण। ऐसे असे भगवती वचन। विष्णूमाये स्तवन आरंभिले।।७।। देवा ऊचु:।।८।। देवी माते तुला नमस्कार असो। महादेवी शिवाला नमस्कार असो। प्रकृति आणि भद्राला नमन असो। आम्ही नेमे जगदंबेला नमितो।।९।। देवी रौद्राला नमस्कार। नित्या गौरीस सतत नमस्कार। ज्योत्नामयी चंद्ररूपास नमस्कार। सुखस्वरुपास नमस्कार असो।।१०।। शरणागताचे कल्याण कर्ती। वृद्धी तथा सिद्धी कर्ती। दानवा लक्ष्मी नैऋती। राजा लक्ष्मी शर्वानीला नमस्कार।।११।। संकटा पार कर्ती दुर्गा। सकल साराचे सार दुर्गा। सर्वाचेकारण ख्याति दुर्गा। कृष्णा आणि धूम्राला नमस्कार।।१२।। सौम्य अत्यंत रौद्र रुपी दुर्गा। जगताची आधारभुत दुर्गा। कृतीदेवी माता जयदुर्गा। तिला वारंवार नमस्कार।। १३।। देवीस सर्व प्राणीमात्रांत। विष्णुमाया नामे जानत । तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो ।।१४।। देवीस सर्व प्राणीमात्रात । विष्णुमाया नामे जानत । तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।१५।। देवीस सर्व प्राणीमात्रात। विष्णुमाया नामे जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।१६।। देवी सर्व प्राणीमात्रात। चेतना म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।१७।। देवी सर्व प्राणीमात्रात। चेतना म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। १८।। देवी सर्व प्राणीमात्रात। चेतना म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो ।। १९।। देवी सर्व प्राणीमात्रात।

बुद्धी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो ।। २०।। देवी सर्व प्राणीमात्रात। बुद्धी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो ।।२१।। देवी सर्व प्राणीमात्रात। बुद्धी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो ।।२२।। देवी सर्व प्राणीमात्रात। निद्रा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो ।।२३।। देवी सर्व प्राणीमात्रात। निद्रा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२४।। देवी सर्व प्राणीमात्रात। निद्रा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२५।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षुधा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। २६।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षुधा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२७।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षुधा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२८।। देवी सर्व प्राणीमात्रात। छाया म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२९।। देवी सर्व प्राणीमात्रात। छाया म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३०।। देवी सर्व प्राणीमात्रात। छाया म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ३१।। देवी सर्व प्राणीमात्रात। शक्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो।।३२।। देवी सर्व प्राणीमात्रात। शक्ति

म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३३।। देवी सर्व प्राणीमात्रात। शक्ति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३४।। देवी सर्व प्राणीमात्रात। तृष्णा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३५।। देवी सर्व प्राणीमात्रात। तृष्णा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३६।। देवी सर्व प्राणीमात्रात। तृष्णा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३७।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षान्ति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३८।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षान्ति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।३९।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षान्ति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।४०।। देवी सर्व प्राणीमात्रात। जाति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४१।। देवी सर्व प्राणीमात्रात। जाति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।४२।। देवी सर्व प्राणीमात्रात। जाति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४३।। देवी सर्व प्राणीमात्रात। लज्जा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४४।। देवी सर्व प्राणीमात्रात। लज्जा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४५।। देवी सर्व प्राणीमात्रात। लज्जा

म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४६।। देवी सर्व प्राणीमात्रात। शांती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४७।। देवी सर्व प्राणीमात्रात। शांती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४८।। देवी सर्व प्राणीमात्रात। शांती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ४९।। देवी सर्व प्राणीमात्रात। श्रद्धा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ५०।। देवी सर्व प्राणीमात्रात। श्रद्धा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।५१।। देवी सर्व प्राणीमात्रात। श्रद्धा
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।५२।। देवी सर्व प्राणीमात्रात। कांति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।५३।। देवी सर्व प्राणीमात्रात। कांति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ५४।। देवी सर्व प्राणीमात्रात। कांति
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ५५।। देवी सर्व प्राणीमात्रात। लक्ष्मी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।५६।। देवी सर्व प्राणीमात्रात। लक्ष्मी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ५७।। देवी सर्व प्राणीमात्रात। लक्ष्मी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो।। ५८।। देवी सर्व प्राणीमात्रात। वृत्ती

म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ५९ ।। देवी सर्व प्राणीमात्रात। वृत्ती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो।। ६०।। देवी सर्व प्राणीमात्रात। वृत्ती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६१।। देवी सर्व प्राणीमात्रात। स्मृती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६२।। देवी सर्व प्राणीमात्रात। स्मृती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६३।। देवी सर्व प्राणीमात्रात। स्मृती
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६४।। देवी सर्व प्राणीमात्रात। दया
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६५।। देवी सर्व प्राणीमात्रात। दया
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ६६।। देवी सर्व प्राणीमात्रात। दया
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ६७ ।। देवी सर्व प्राणीमात्रात। तुष्टी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ६८।। देवी सर्व प्राणीमात्रात। तुष्टी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ६९।। देवी सर्व प्राणीमात्रात। तुष्टी
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ७०।। देवी सर्व प्राणीमात्रात। मातृ
म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।। ७१।। देवी सर्व प्राणीमात्रात। मातृ

म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७२।। देवी सर्व प्राणीमात्रात। मातृ म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७३।। देवी सर्व प्राणीमात्रात। भ्रान्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७४।। देवी सर्व प्राणीमात्रात। भ्रान्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७५।। देवी सर्व प्राणीमात्रात। भ्रान्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७६।। इंद्रियांची अधिष्ठाती। प्राणीमात्रात सदा वसति। व्याप्त असे सर्वाभूती। तिला वारंवार नमस्कार असो।।७७।। चैतन्यरूपाने या जगती। या जगता भरुन उरे ती। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७८।। चैतन्यरूपाने या जगती। या जगता भरुन उरे ती। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७९।। चैतन्यरूपाने या जगती। या जगता भरुन उरे ती । तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो।।८०।।

**अभीष्ट प्राप्त होता देवे जिला स्तविली।**
**देवराज इंद्रे बहुतदिनी जिला सेवियेली ।**
**ती कल्याणी साधनभूत ईश्वरी आपुली ।**
**कल्याण मंगल करुनी आपत् नाशियेली ।।८१।।**

**उदंड दैत्याने त्रासिले सर्व देवगण अती ।**
**त्रासले ते देवगण मती परमेश्वरी नमिती ।**
**विनम्र भक्तीने जे पुरुष जगदंबा स्मरिती ।**
**सकल विपत्तीचा नाश जगदंबा करी ती ।।८२ ।।**

ऋषिरुवाच ।।८३।।

ऐसी नृपाची रिती। करी बहुत देवी स्तुती। गंगा स्नाने पार्वती। पातली ते समयी।।८४।। आकर्णनयन भगवती। देवांशी करी प्रश्ना ती। कोणाची करता स्तुती। शिवादेवी ऐसे बोलती देव।।८५।। शुंभानी तितस्कारिलेले। युद्धे निशुंभे हरविलेले। एकत्र सर्व देव जमले। माझीच स्तुती गाताती।।८६।। पार्वतीच्या कोशातुनी शरीर। अंबिकेचे निर्मिले सत्वर। समस्त लोकां कारण। कौशीकी तिला म्हणताती।।८७।। कौशीकेचे होता अवतरण। पार्वतीचे काळे शरीर। झाले पहा सत्वर। ती कालिका नामे वर्तली।।८८।। तदनंतर शुंभ निशुंभाचे। आले भृत्य चण्ड मुंडाचे। परम मनोहर रुप अंबिकेचे। नयनाने पाहिले ते वेळी।।८९।। निशुंभालागी बोलिले वर्तमान। असे ती सुंदर स्त्री जान। मनोहर दिव्य कांतिमान। हिमालया प्रकाशी स्व-रुपे।।९०।। अशा रुपाते न देखिले कोणी। असुरेश्वर घ्यावे जाणोनी। ती कोण देवी म्हणोनी। निजसवे घ्यावे जी।।९१।। हिमालयी असे ती वसली। स्वरुपे दशदिशा प्रकाशिली। अंगांनी सुंदर पाहिली। जाणा नारी रत्नची।।९२।।

त्रैलोकी जे रत्ने असती। मणि हत्ती अश्व प्रयत्नांती । ती आपुल्याच घरी शोभती। अन्य ठाई न जाणा।।९३।। प्राण्यात रत्न ऐरावत। पारिजात असे वृक्षात। उच्चै:श्रवा अश्वजात। इंद्रापासुनी जिंकिलेले।।९४।। हंस असे ज्याचे वाहन। आंगणी शोभे ऐसे विमान। ब्रह्माजींपाशी होते जान। आता येथे असे की ।।९५।। महापद्म नामक निधी पावला। समुद्रे दिली किंजल्किनी माला। केशरानी सुशोभित कमला। न सुकते कदापि।।९६।। सुवर्ण वर्षा छत्र करी। प्रजापतीचा रथही परी। शोभतो आपुल्याच घरी। तो असे आपुलाची।। ९७।। दैत्येश्वरा मृत्युची उत्क्रांती। नामाची जी असे शक्ति। आपण आणिली प्रयुक्ती। ती असे आपुलीची ।।९८।। पाश शस्त्र वरुणाचे। सकल रत्न समुद्राचे। अधीन असती निशुंभाचे। अग्निने सेवे अर्पिले शुद्धवस्त्रं।।९९।। दैत्यराज रत्न सर्व येणेपरी। जरी एकत्र करविले तरी। स्त्रियांमध्ये रत्नरूप नारी। कल्याणमयी का न जिंकावी।। १००।। ऋषिरुवाच।। १०१।। चण्डमुंडांचे ऐकोणी वचन। शुंभाने धाडिले दूत बनवून। महादैत्य सुग्रीवा जान। निरोपाते घेवोनीया।।१०२।। माझ्या आज्ञेने जावोनी। तुवा करावी बोलणी। होवोनी प्रसन्न मनी । ती इकडे येईल।।१०३।। दैत्य आज्ञे निघाला दूत। पातला रमणीय प्रदेशात। चर्चा देवी दुतांसमवेत। मधुर वचने आरंभिली।। १०४।। दूत उवाच ।।१०५।। त्रिलोकीचा स्वामी दैत्यराज। त्यांचे पुरविण्यासी काज। धाडिलेसे मज आज। या कारणे पातलो मी।। १०६।। त्यांच्या आज्ञेचा मान। सर्व देवता राखिती जान। आलो असे निरोप घेऊन। तो श्रवण करावा।।१०७।। संपूर्ण त्रैलोक्य माझे आधीन। देवही न चाले माझे आज्ञेविण। यज्ञ भागाचा प्रत्येक कण। मीच

असे उपभोगीत।। १०८।। त्रैलोकीचे सकल रतन। इंद्राचे ऐरावत वाहन। हत्तीत रत्न असे जाण। तेही लुटीले असे मी।। १०९।। क्षीरसागर मंथनातुन। उच्चै:श्रवा अश्वरत्न। माझे पाय पकडून। मज देवांनी समर्पिले।।११०।। त्याशिवाय हे सुंदरी। जे नाग-गंधर्व देवाघरी। ते असे सकलं माझे पुरी। दिव्य वस्त्रं आभुषनासहित।।१११।। मानतो नारीरत्न देवी तुला। तु येई आमुच्या आश्रयाला। कारण रत्नाच्या उपभोगाला। केवळ अधिकारी आम्हीच।।११२।। चंचल कटाक्षावाली सुंदर। जा निशुंभाची सेवा कर। तो असे महापराक्रमी थोर। तु रत्नस्वरूपा कीं।।११३।। मला वरल्याने तुला मिळेल। तुलनारहित ऐश्वर्य सकलं। दुर कर वैचारिक खल। माझी पत्नी हो तु।। ११४।। ऋषिरुवाच ।। ११५।। दुताचे बोलणे ऐकून भगवती। कल्याणमयी दुर्गादेवी ती। मनात गंभीर झाली अती। मंदस्मित बोलली ।।११६।। देव्युवाच।।११७।। दुता तु सत्य कथिले असे। यात किंचितही मिथ्या नसे। त्रैलोकीचा शुंभ स्वामी असे। निशुंभ त्यासम पराक्रमी।।११८।। परंतु मी प्रतिज्ञा केली असे। त्याला मिथ्या करू कसे। माझे अल्पबुद्धी वाटतसे। प्रतिज्ञा तु ऐक माझी।। ११९।। जो संग्रामी मला जिंकील। माझ्या अभिमाना चूर्ण करील। जो अती बलवान असेल। तोच असेल स्वामी माझा ।।१२०।। यालागी शुंभ निशुंभानी यावे। संग्रामी मला जिंकावे। माझे पाणीग्रहण करावे। विलंबा काय कारण।।१२१।। दूत उवाच।।१२२।। तुला जडला घमंड फार। माझे समोर ऐसे शब्दोच्चार। तिन्ही ना कोणी पुरुष साचार। समोरी माझ्या राहे उभा।।१२३।। अन्य सारे कोणतेही देव। युद्धात पावतात हार। तु एकटी स्त्री चतुर। कैसी उभी युद्धासी।। १२४।। शुंभादि

दैत्यासमोर। इंद्रादि देवता चुर। कैसी करशील समोर। स्त्री असूनी युद्धासी।।१२५।। शरण जाई तु माझे मानी। शुंभनिशुंभाकडे जाऊनी। नातरी नेऊ पकडोनी। प्रतिष्ठा धुळीस मिळेल ।।१२६।। देव्युवाच।।१२७।। सत्य असे तुझे बोलणे। शुंभ निशुंभ बलवान जाणे। महापराक्रमी परी अनावधाने। मी प्रतिज्ञा करूनी बैसले।।१२८।। आल्या मार्गी जाई त्वरीत। मी जे तुज बोलिले परत। दैत्यराजाचा आदर करीत। सांगे वाटेल तैसे करावे।।१२९।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये देव्या दूतसंवादो नाम प्राकृत पंचमोऽध्यायः ।।**

# अध्याय सहावा

**प्रसंग :- धूम्रलोचन वध**

**।। ध्यानम् ।।**

**शेषाचे आसनी वसे सुंदर फणां वरी ।**
**त्रिनयनी अती शोभे चंद्रमुकुट शिरी ।**
**माला कुंभ कपाल कमल हाती धरी ।**
**भैरवांकीत पद्मावतीचे चिंतन करी ।।**

ॐ ऋषिरुवाच ।।१।। देवीचे म्हणने ऐकून। दूता झाले अमर्षन। दैत्यराजापाशी जाऊन। वार्ता समग्र कथियेली।।२।। दूताचे ऐकून वचन। उठला कोपित होऊन। बोले दैत्यराज क्रोधुन। सेनापतीस करी आज्ञा।।३।। धुम्रलोचन तु शीघ्र जाऊन। सेनेला सोबत घेऊन। दुष्टीनीचे केस पकडून। ओढुनी आन बलपूर्वक ।।४।। तिच्या रक्षणा जरी कोणी। देवता आली धावुनी। यक्ष गंधर्व देवता कोणी। अवश्य मारूनी टाकावे ।।५।। ऋषिरुवाच ।।६।। शुंभाने आज्ञा दिल्यावर। असुर सैन्य साठ हजार। घेऊन निघाला सत्वर। धुम्रलोचन लगबगीने।।७।। पोहोचताच हिमालयावर। युद्धाचा केला ललकार। चल तू शुंभनिशुंभाकडे सत्वर। बोले धूम्रलोचन देवीशी।।८।। ना जरी मर्जीने येणार। माझ्या स्वामीकडे साचार। तरी बळे ओढुन नेणार। घसीटत तुजला गं।।९।। देव्युवाच।।१०।। दैत्यराजाने पाठविले जरी। स्वत: असाल

बलवान तरी। अती विशाल सेना असे तरी। मला कसे नेता ते पाहू।।११।। ऋषिरुवाच ।।१२।। देवी बोलता ऐसे वचन। धावला धुम्रलोचन वेगान। अंबिकेने "हुं" ऐसे बोलुन। तात्काळ त्यासि भस्म केले।।१३।। त्यानंतर क्रोधे दोन्ही सेना। घनघोर युद्धासी जाना। सायक शक्ति फरश नाना । वर्षीत अपार एकमेकावरी।।१४।। त्यातच देवीचा सिंह क्रोधे। युद्धालागी उतरला मध्ये। अति भयंकर गर्जने कुदे। आयाळ डौलाने हालवित।।१५।। कित्येक दैत्येंना त्याने। मारिले आपुल्या पंजाने। कित्येका मारी जबड्याने। घायाळ करुनी ते वेळी।। १६।। सिंहाने आपल्या नखानं। मारिले पोट फाडून। कित्येकांचे मुंडके तोडून। धडापासून केले वेगळे ।।१७।। कित्येकाचे तोडी डोके हात। मग शानानं मान हालवित। उदरातील पिई रक्त। फोडूनीया ते वेळी।।१८।। क्रोधाने भरलेल्या देवीसिंहाने। त्या महाबली वाहनाने। क्षणातचि महाअसुर सेने। गारद केले तात्काळ।।१९।। शुंभाला जेव्हा कळाले। धुम्रलोचनाला मारिले। सिंहाने सेने संपविले। क्रोधे भरला असुर तो।।२०।। रागे ओठ कापु लागला। वेगे चंडमुंड दानवाला। आज्ञा करुनी धाडता झाला। युद्धालागी लवलाहे।।२१।। हे चंड हे मुंड। सेना घेऊनी प्रचंड। जा पकडा त्या उदंड। स्त्रियेसी आना ओढुनी।।२२।। जरी तिला आणण्या संदेह। वापरा अस्त्रं शस्त्रं नि:संदेह। असुर सेनेचा उहापोह। करुनी हत्या तिची करावी।।२३।। त्या दुष्टाची हत्यानंतर। सिंहाही मारावे सत्वर। अंबिकेशी बांधुनी सत्वर। घेवोनी यावे माघारी।।२४।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये शुंभनिशुंभसेनानी धुम्रलोचनवधोनाम प्राकृत षष्ठोऽध्याय: ।।**

# अध्याय सातवा

**प्रसंग :- चंड मुंडांचा वध**

**ध्यानम्**

**रत्नाचे सिंहासनी बसुनी ऐके स्वर राघुचा ।**
**शामवर्ण पदी कमल मुकुटावर चंद्र साचा।**
**कल्हार पुष्प माला गळा वीणा वाजी सुराचा।**
**हाती शंख वदनी मधु ललाटी टिळा कुंकवाचा।।**

ॐ ऋषिरुवाच।।१ ।।

शुंभ सेना निघाली आज्ञेने। चंडमुंडांसहित चतुरंगी सेने। अस्त्रशस्त्रादि सुसज्जितपणे। युद्धालागी निघाले।।२ ।। जाता गिरीराज हिमालयावर। त्या सुवर्णमयी शिखरावर। देखे देवी बैसली सिंहावर। मंद हास्य करताना।।३ ।। ते पाहूनी दैत्य सेना। योजिती देवी पकडण्या जाना। धनुष्य तलवार घेऊनी नाना। तिष्ठत तेथे देवीपासी।।४ ।। तेव्हा अंबिकेने अपार। क्रोध केला शत्रुवर। त्या क्रोधे भयंकर। शत्रुमुख झाले काळे।।५ ।। वाकडे कपाळ भुवया। प्रकटली तात्काल काया।

विक्राळमुखी काली माया। पाश तलवार घेऊनी।।६।। विचित्र खट्वांग हाती घेवोनी। चित्याच्या चर्माची साडी घालुनी। प्रकटे अस्थि कंकाल बनुनी। भयंकर दिसत होती ती।।७।। मुख अत्यंत विशाल जाना। लपलपीत जीभ रक्तनयना। दिसे भयंकर करी गर्जना। दशदिशा डळमळल्या ।।८।। मोठमोठ्या दैत्यांचा वध काली । अती वेगाने करती झाली। दैत्य सेनेवर तुटुन पडली। भक्षण करु लागली।।९।। आपल्या मागील राक्षसाते। अंकुशधारी महावत योध्याते। घण्टासहित कित्येक हत्तीते। मुखाने गिळू लागली।।१०।। याचप्रकारे घोडे रथी। सारथ्यासहित सैनिक रथी । मुखात टाकी महारथी। भयानक रूपे चावी ती।।११।। कोणाचे केस पकडी ती। कोणाचा गळा दाबी ती। कोणा पायाने कुचली ती। कित्येका छातीच्या धक्याने।।१२।। मोठे असुरांनी सोडलेले। शस्त्रं मुखात पकडीले। दातांनी चाऊन टाकिले। पीठ त्याचे केले की ।।१३।। बलवान आणिक दुरात्म्याते। कालीने खदेडून टाकिले ते। कित्येका चावुन खाल्ले ते। पळवून लाविले कित्येका।।१४।। तलवारीचे घाटी कित्येका। खट्वांगाने पिटी निका। कित्येका दाताचे टोका । कुचलुनि मारिले क्षणात।।१५।। ऐसिये रिती दानव सेना। काली सकल मारी जाना। क्रोध आला चंडमुंडाना। देवीसी मारण्या धावले।।१६।। महादैत्य मुंडाने भयंकर। बाणांचा वर्षाव सहस्त्रांवर। चक्र आदिनी घेरी सत्वर। रक्त नेत्रधारिनीला ।।१७।। ते चक्र देवीच्या मुखात। जाताना भास असे होत। सुर्यमंडल जाई उदरात। जैसे ढगाचिया लिलेने।।१८।। भयंकर गर्जना करी काली। रागे विकट अट्टहास्य केली। वदन करी अती विक्राळी। तेजप्रभा फाकली दातांची।।१९।। मोठी तलवार हाती घेऊनी। देवी "हं" उच्चार करोनी। चण्डावर गेली धावोनी। केसासी पकडुन मारिले।।२०।। चण्डाला मारले पाहून। वेगे

मुंड गेला धावून। देवीने रोषे भरुन। जमीनीवर लोळविला।। २१।। महापरक्रमी चण्ड। आणिक मारिला मुंड। हे पाहुणी दैत्यसेना प्रचंड। धावू लागलीसैरावैरा।।२२।। चंडमुंडाचे मस्तक घेवोनी। चंडिकेपासी जावोनी। प्रचंड अट्टहास करोनी। देवी बोलू लागली ।।२३।। चंडमुंड नामक महापशु दोन। तुजला भेट दिली जान। तुवा शुंभनिशुंभा मारुन। युद्धयज्ञ करावा।।२४।। ऋषिरुवाच ।।२५।। ज्यावेळी आणिले चंडमुडी। महादैत्या पाहून प्रचंडी। कल्याणमयी बोले चण्डी। आपल्या मधुर वाणीने।।२६।। हे देवी तु मजपाशी। चंडमुंडा आणिलेसी। चामुंडा नामे ख्यातिसी। पावशील या संसारी।। २७।। ॐ।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये चंड मुंड नाम प्राकृत सप्तमोऽध्याय: ।।**

# अध्याय आठवा

**प्रसंग :- रक्तबीज वध**

**ध्यानम्**

**अणिमादि सिद्धीमयी किरणे झाके ईश्वरी ।**
**भवानीचे अंकुश पाश बाण धनुष हो करी ।**
**नेत्रातुनी सतत प्रकटत वाही करुणा लहरी ।**
**देवी भवानीचे मज ध्यान लागो नित् अंतरी ।।**

ॐ ऋषिरुवाच।।१ ।। चंडमुंड दैत्य मारले गेले। दैत्य सेनेस संहारिले। ऐकोनी क्रोधे भरले। प्रतापी दैत्यराज शुंभ।।२ ।। त्वरे कामालागा उठोनी। कुच करावे समरांगणी। युद्धा जावे लगीनी । आज्ञा देई दैत्यराज।।३ ।। उदायुध नामे सेनापतीसी। आज्ञापिले जाण्या युद्धासी। सेनानायक चौऱ्यांशी। कंबु दैत्या समवेत जावे।।४ ।। पन्नास कोटीवीर्य कुलाचे। आणिक शत धूम्र कुलाचे। असुर सेनेसहित साचे । पुढे कुच करावे ।। ५ ।। मौर्य दौर्हद कालक । आणिक कालकेय एक। जावे युद्धा सकळीक। हीच माझी आज्ञा की।।६ ।। शासक भयानक असुरराज। शुंभे आज्ञापिले काज। सेना निघे घेऊनी साज।

शस्त्रंअस्त्रांचा समवेत।।७।। त्याच्या भयंकर सेनेते। चण्डिका नयनी पाहते। पृथ्वीवरी धनुष्य टणत्कारिते। ध्वनी गुंजला आकाशी।।८।। ऐक नृपवरा त्यानंतर। देवी सिंहाचा वाढला जोर। होई घंण्टानाद जोरदार। ध्वनी अती वाढलां।।९।। धनुष्ये चालिला टणत्कार। सिंहाचा आवेश फार। काली करी शब्द भयंकर। विजयीनी रुपे वर्तली।।१०।। तुंबळ नादाशी ऐकून। येऊनी दैत्ये सेनेनं। क्रोधे घेरीले चहूबाजुनं। काली आणिक चण्डिकेसी।।११।। नृपा आणखी ऐके बात। ब्रह्मा विष्णु इंद्र समस्त। कार्तिकेयादि शक्ति दैवत। साह्य झाली चण्डिकेसी।। १२।। पराक्रमी बलसंपन्न अत्यंत। प्रतिरुपची बनूनी राहत। त्या रुप देव समस्त। राहीली चण्डिकेपासी।।१३।। ज्या देवाचे जैसे रुप। वाहन वेशभूषणे मिरवत। तैसेचि साधन संपन्न उक्त। युद्धालागी पातले।।१४।। प्रथम हंसयुक्त विमानारूढ। कंमडलू नि अक्षसूत्र दृढ। ब्रह्माजींची शक्ति प्रौढ। ब्रह्माणी नामे प्रचलित ।।१५।। महादेवाची शक्ती वृषभावरुन। हाती त्रिशूल करी धारण। शिरी चंद्ररेखा करी नागकंकण। सिद्ध होऊनी पातली।।१६।। शक्तिरूपा कार्तिकेयाची। वर्ते जगदंबिका रूपेची। मयुरारुढ शक्ति राहे हातेचि। युद्धालागी पातली ।।१७।। विष्णु पत्नी भगवती। घेऊन शंख गदा चक्रेति। शार्ङ्गधनुष खड्ग सिद्ध ती। गरुडावर पातली।।१८।। अनुपम रूप यज्ञवाराहीचे। शक्तिरुप धरी श्रीहरीचे। वाराह रुप घेऊन साचे। उपस्थित झाली युद्धासी।।१९।। नारसिंही नृसिंहासमान। करोनी शरीर धारण। गळी केस झटकी जान। नक्षत्र तारे फिकेची।।२०।। इंद्राची शक्ती ऐरावती। बैसोनी घेई वज्र हाती। इंद्राचेच स्वरुपी ख्याती। इंद्रापरीच पातली ।।२१।। तदनंतर देवीशक्ती आधीन। महादेव वदे चण्डिके जान। माझे प्रसन्नते लागुन। संहार करी असुरांचा।।२२।। तेव्हा देवीच्या शरीरातुन। भयानक परम उग्र महान। ध्वनी

शेकडो गिधाडासमान। चण्डिका शक्ती प्रकटली ।।२३।। अपराजिता बोलती भावे। जटाधारी आपण जावे। दुत बनोनी समजवावे। शुंभ निशुंभ दानवांशी।।२४।। सांगा गर्विष्ठ राक्षसांसी। शुंभ-निशुंभ दोघांसी। युद्धासी आलेल्या अनुयायांसी। निरोपावे सत्वर।।२५।। दैत्यांनो राहू इच्छिता जीवीत। पाताळा परतावे त्वरीत। राज्य इंद्रासि परतवावे त्वरीत। यज्ञभाग देवाशी लोटवावे ।।२६।। जरी बलाचा गर्व कराल। युद्धाची अभिलाषा ठेवाल। योगीणी तृप्त होतील। तुमच्या मांसानी जाणा।।२७।। शिवासी देवी भगवतीने। दुत कार्या सोपिले। याच कारणे पडियेले। शिवदूती नाम पै ।।२८।। शिवा मुखीचे वचन ऐकता। क्रोधे भरले दानव तत्वता। समोरी कात्यायनीसी पाहता। तिच्याकडे धावले ।।२९।। बाणशक्ति वृष्टी अपार। दैत्यांनी करीती देवीवर। शस्त्रअस्त्रांचा वर्षाव फार। मृगाच्या पावसापरी।।३०।। देवीने सहज लिलेने। धनुष्याने शरसंधान साधिले। बाणशूल शक्ति तोडिले । फरसासहित सकल ते।।३१।। काली मग पुढे येऊन। शत्रूचे करी निर्दालन। खट्वांग हाती घेऊन। युद्धालागी सरसावली।।३२।। ज्या ज्या दिशे जाई ब्रह्माणी । कमंडलू जल छिडकोनी । शत्रुचा ओज आणि। नष्ट करी पराक्रमाशी ।।३३।। त्रिशूलासह माहेश्वरी। चक्रासह वैष्णवी थोरी। कार्तिकेयाची शक्ती पुरी। दैत्य संहारा आरंभिले।।३४।। इंद्रशक्ति वज्रप्रहाराने। न्हानिले दानव रक्ताने। पृथ्वीवर पाडिले शेकड्याने। प्रसंग अति भयंकर।।३५।। वाराही आपुल्या शक्तिनं। कित्येक दाढेच्या अग्रभागानं। कित्येका छाति फोडुनं। लोळविले भूमीवरी ।।३६।। नारसिंही नखाने देखा। मारूनी खाई कित्येका। सिंहनादे दशदिशे निका। गर्जुनी युद्धा पातली।।३७।।

कित्येक असूर भूमीवर। पडले अट्टहासे सत्वर। शिवदुतीने होती तत्पर। घासे गिळुनी संपविले।।३८।। याप्रकारे समस्त मातृशक्ती। युद्ध करिती नानायुक्ती। पळु लागले मृत्यु भिती। असूर रणांगणातुनी।।३९।। असूरा रणांगणातुन पळता पाही। युद्धालागी रक्तबीज लवलाही। धावत आला क्रोधे तोही। युद्ध करु लागला।।४०।। त्याच्या एक थेंब जर। पृथ्वीवर पडला तर। त्यातुन प्रकटे असुर । महादैत्य जन्मपावे।।४१।। हातामध्ये गदा घेऊन। इंद्रशक्तिशी करी युद्ध जान। ऐंद्रिने मारिले वज्रानं। रक्तबीज महासुरासी।।४२।। वज्राने होता घायाळ। रक्त वाहे भळभळ। त्या रक्तातुन सकळ। योद्धे झाले उत्पन्न ।।४३।। त्याच्या शरिरातुन जितुके पडती। रक्ताचे थेंब तितुके भूवरती । रक्तबीजासम पुरुष जन्मती। बलवान पराक्रमी ।।४४।। त्या रक्तातुन झालेले । उत्पन्न पुरुष भले। पुन्हा युद्ध करू लागले। मातृगणा संगेचि।।४५।। पुन्हा वज्राचे प्रहारानं। त्यांचे मस्तक फोडी जानं। पुन्हा वाहिलेल्या रक्तातुनं । पुरुष जन्मु लागले।।४६।। युद्धामध्ये वैष्णवी चक्राचा। रक्तबीजावर प्रहार साचा। ऐंद्रीने मार गदेचा। दैत्यसेनापतीसी कष्टिले।। ४७।। घायाळ वैष्णवीच्या चक्राने। रक्त सांडले जे जाने। पुन्हा त्याच आकाराने। दैत्ये पृथ्वी व्यापिली।।४८।। कौमारीच्या शक्तिने। वाराहीच्या खड्गाने। माहेश्वरीच्या त्रिशुलाने। रक्तबीजा केले घायाळ ।।४९।। महादैत्य क्रोधे भरी। घेऊनीया गदा करी। मातृशक्तीवर वार करी। प्रत्येकीला मत्सरे ।।५०।। शक्तिशूलाने मारल्याने। शरीर घावे भरल्याने। रक्त पृथ्वीवर सांडल्याने। असंख्य असूर जन्मले।।५१।। महादैत्यापासुन जन्मलेले। शेकडो असूर पसरले। संपुर्ण जगत् व्यापिले। भय निर्मीती देवांशी।।५२।।

देवांना उदास पाहून चण्डिका। कालीला बोलली ते ऐका। शीघ्र पसरवी गं मुखा। भयानक अती दारुन।।५३।। माझ्या शस्त्रंपातातुन। सांडे जे रक्त शरीरातुन। जन्मलेले दानवही जान। मुखाने भक्षावे।।५४।। येणेपरी महादैत्यासी सतत। राही प्रयासी रक्तबिंदू भक्षत। क्षीण होऊन उरु न देत। दानव न उरेचि।।५५।। भयंकर दैत्या भक्षित। दुजे उत्पन्न न होऊ देत। कालीसी चण्डिकाबोलत। त्रिशूले मारीला रक्तबीज।।५६।। कालीने ते सर्व रक्त। घेतले आपल्या मुखात। तेवढ्यात प्रहार करीत। तो देवी चंडिकेवरी।।५७।। त्या गदाघाताने पाही। चंडिकेसी इजा थोडीही। मुळीच झाली नाही। रक्तबीजाचेच रक्त सांडले।।५८।। दैत्याचे रक्त सांडताच। देवी प्राशी स्वमुखात। तेणे देवी मुखात। महादैत्य प्रकटले।।५९।। त्यांनाही देवी काली। चाटुन खाती झाली। रक्तबीजाचेही रक्त प्याली। थेंब ठेवी शिल्लक।।६०।। तदनंतर देवी रक्तबीजाते। चामुंडेने प्राशिले ज्याचे रक्ताते। वज्र बाण खड्ग ऋष्टिते। तात्काळ मारुनी टाकिले।।६१।। ऐक नृपा येणे रिती। दानव शस्त्रे घायाळ होती। रक्तहीन होऊनी पडती। पृथ्वीवरी दानव तेधवा।। ६२।। येणेरिती दानवांचे रक्तपान। करूनी साऱ्या मातृगण। करिती नृत्य गायन। रक्ताचे मदे करूनी।। ६३।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये रक्तबीजवधो प्राकृत अष्टमोऽध्याय: ।।**

**प्रसंग : निशुंभ वध**

# अध्याय नववा

**ध्यानम्**

**रक्त-पीत कनककांती अक्षमाला भुजाधरी ।**
**नयन तीन सुशोभित स्वरुप तिचे अर्धनारी ।**
**पाश अंकुश वरद मुद्रा अर्धचंद्र शिरावरी ।**
**निरंतर शरण जातो अर्धांबिके चरणावरी ।।**

ॐ राजोवाच ।।१ ।। रक्तबीज वध कथिला। कथिले समग्र कथेला। अद्भुत देवी चरित्राला। भगवन् तुम्ही वर्णिले।।२ ।। रक्तबीज मृत्युनंतर जान। शुंभनिशुंभे क्रोधीत होऊन। काय कर्म कैसे कथन। श्रवण करावे माते ।।३ ।। ऋषिरुवाच ।।४ ।। ऐक नृपा सविस्तर। रक्तबीजाला मारल्यावर। शुंभनिशुंभा क्रोध अनावर। त्याला सीमाच नसे की ।।५ ।। आपली विशाल सेना फार। युद्धात मारली गेल्यावर। रागे भरुनी देवीवर। धावला मुख्य सेनेसमवेत।।६ ।। त्याच्या चहूबाजूने जान। महाअसूर चालती जान। ओठ चावुन येती धाऊन। देवीशी मारण्यालागी।।७ ।। महापराक्रमी शुंभ सेनेसहित। मातृगणांशी युद्ध करीत। रागे आला चंडिकेपर्यंत। मारण्याच्या

उद्देशे ।।८ ।। तेव्हा देवीच्या बरोबर। शुंभनिशुंभाचे युद्ध घनघोर। बाण वर्षाव उभय असूर। करिती अती भयंकर ।।९ ।। युद्ध चालले घनघोर। देवी करिती प्रत्युत्तर। आलेले बाण केले चूर। दैत्यप्रमुखा केले जखमी।।१ ० ।। निशुंभे काढिली तलवार। आणि चमकती ढाल थोर। घेवोनी केला प्रहार। देवीसिंहाच्या मस्तकी।।१ १ ।। सिंहावर प्रहार झाला पाहूनी। क्षुरप्र नामक बाण घेवोनी। शुंभाची ढाल तलवार पाहोणी। तोडिली अष्टचंद्रे जडीत जी।१ २ ।। ढाल तलवार तुटल्यावर। शक्तीशी चालवी असुर। परंतु देवीसमोर आल्यावर। तिला दुभंगीले चक्रानी ।।१ ३ ।। आता निशुंभ क्रोधे तापला। देवीसी मारण्या उचली त्रिशूला। देवीने त्रिशूला बुक्का मारिला। चूर्ण केले क्षणात।।१ ४ ।। त्याने गदा फिरविली गरगरा। चंडिकेवरी चालविली त्वरा। देवीने त्रिशूले कापिली सत्वरा। भस्म करूनी टाकिली।।१ ५ ।। त्यानंतर दैत्यराज निशुंभाला। फरश घेवोनी येता पाहिला। सोडोनी त्वरे बाणसमुहाला। तो पाडिला धरणीवर।।१ ६ ।। महापराक्रमी निशुंभ बंधुवर। युद्धे धाराशायी झाल्यावर। शुंभाचा क्रोध अनावर। वधण्या निघाला अंबिकेशी।।१ ७ ।। सुशोभित अनुपम आयुधांनी। रथावर उत्तम बैसोनी। हस्ते आकाश झाकोनी। शोभा अनुपम पहातसे।। १ ८ ।। त्याला येताना पाहूनी। देवीने केला शंखध्वनी। धनुष्याची प्रत्यंचा ओढोनी । दुस्सह शब्द केलासे।।१ ९ ।। समस्त दैत्य तेजासी। नष्ट करी जो सहजेसी। ऐशा घंटा नादासी। दशदिशांत

केलासे।।२०।। सिंहानीही फोडली डरकाळी। गजराजाचा मद दुर करी भली। आकाश पृथ्वी डळमळी। दशदिशा व्यापिल्या ।।२१।। कालीने आकाशी झेप घेतली। पृथ्वीवर आघात करती झाली। भयंकर ध्वनी प्रतीत झाली। पहिले शब्द झाले शांत।।२२।। तत्पश्चात शिवदूतीने अमंगलजनक। अट्टाहास केला दैत्या सकळीक। ऐकुन दैत्य पळाले सकळीक। शुंभ तापला अतिक्रोधे।।२३।। देवीने दुरात्म्या केले लक्ष। थांब सांगी सर्वा समक्ष । देवीचा घेवोनी पक्ष । देव करिती जयजयकार ।।२४।। शुंभ सत्वर येवोनी तेथे। ज्वालायुक्त चालवी शक्तिते। पर्वतासमान अग्नि शक्तिते। देवीने दुर हटविले।।२५।। शुंभ सिंहनादे त्रिलोक गुंजती। वज्रपातासम शब्द फुटती । ते शब्दनादाशी जिंकती। ऐसा झाला प्रतिध्वनी।।२६।। शुंभ-देवी युद्ध तुंबळ। एकासी एक प्रबळ। आयुध करिती निष्फळ। तुकडे छिन्नविछिन्न।।२७।। क्रोधे भरूनी देवीने। शुंभा मारिले त्रिशूलाने। मुर्छीत पडलासे तेणे। पृथ्वीवरी तात्काळ।।२८ ।। पुन्हा सचेत झाला। युद्धालागी सरसावला। बाणाने देवी नि सिंहाला। घायाळ केले असे।।२९।। दैत्यराजाने केले त्वरीत। दहा हजार चक्र हस्त। आच्छादिली देवी ग्रस्त। चंडिका प्रहारे ती।।३०।। तेव्हा दुर्गमाचा नाशकर्ती। दानवावरी कोपे अती। कोपाने बाण सोडी ती। चक्रबाण तोडिले।।३१।। हे निशुंभ दैत्य

पाहुनी। चंडीका वध हेतु ठेवोनी। गदा हाती घेवोनी। अती वेगे धावला।।३ २ ।। तो येताच चंडिकेने। गदा कापिली तलवारीने। मग मारण्या त्रिशूलाने। दानव झाला उद्युक्त।।३ ३ ।। देवां पिडादायक जान। दानव आला त्रिशूल घेऊन। देवीने देखिता त्रिशुल मारून। छाती भेदिली तयाचि।।३ ४ ।। झाले शुलाने विदीर्ण ह्रदय। तेवी छातीतुन निघती द्वय। पुरुष महाबली महापराक्रमी होय। थांब थांब बोलिला।।३ ५ ।। त्या पुरुषांचे बोल ऐकूण। देवी हसू लागली निर्मन। खड्गाचा प्रहार करून। पृथ्वीवरी पाडिला।।३ ६ ।। त्यानंतर सिंहाने असुराची मान। लोचके तोडून खाई जान। आरंभिती काली शिवदुती भोजन। भयंकर दृश्य होते ते।।३ ७ ।। कित्येक दैत्य कौमारी शक्तिने। कित्येक ब्रह्माणी मंत्र जलाने। कित्येक महादैत्य निस्तेज जाने। रणातुन पळाले कित्येक।।३ ८ ।। घायाळ माहेश्वरीच्या त्रिशुले। छिन्नभिन्न धाराशायी झाले। वाराहीच्या वाराने सुटले। कित्येक धावत।।३ ९ ।। वैष्णवी देखील चक्राने। दानवाचे तुकडे जाने। ऐंद्रीच्या वज्राघाताने। प्राण सांडिले भूतली।।४ ० ।। काही असूर नष्ट झाले। काही रण सोडुन पळाले। कित्येक घास बनले। काली शिवदूती सिंहाचे।। ४ १ ।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये निशुंभवधो प्राकृत नवमोऽध्यायः ।।**

# अध्याय दहावा

**प्रसंग : शुंभ वध**

**ध्यानम्**

**शिवशक्ती भगवती चिंतीतो हृदयातुन ।**
**कांती परिमल ती तप्त कनकासमान।**
**करी धनुष अंकुश पाश शूल बाण ।**
**मनोहारी नयन सूर्य चंद्र अग्नि तीन ।।**

ॐ ऋषिरुवाच।।१ ।। हे नृपा प्राणप्रिय भावाचा। वध झाला निशुंभाचा। संहार सकल सेनेचा। ऐकुनी शुंभ क्रोध करी।।२ ।। दुष्ट दुर्गे बलाभिमानाने। खोट्या मोट्या घमंडाने। राही मोठ्या सन्मानाने। लढे अन्य स्त्री बलावर।।३ ।। देव्युवाच।।४ ।। अरे दुष्टा संसारी मी एकटीच। माझ्याशिवाय नसे कोणीच। ही सर्व रूपे माझीच। माझ्यात सामावलेली सदैव।।५ ।। तदनंतर ब्रह्माणी नि समस्त। देवी झाल्या एक स्वरूपात। लीन झाल्या त्या क्षणात। राहीली फक्त अंबिका।।६ ।। देव्युवाच।।७ ।। मी आपल्या ऐश्वर्य शक्तीने। विविध रूपे प्रकटे जाने। आता मी

एकटीच जाने। स्थिर हो तु आता।।८।। ऋषिरुवाच।।९।। तदनंतर देवी आणि शुंभात । देवता आणिक दानवात । युद्ध जाहले अपरिमित। पाहता पाहता त्या क्षणी।।१०।। बाणांची वर्षा भयंकर। शस्त्रं अस्त्रं बलवत्तर। दोघांचे युद्ध उत्तरोत्तर। भयानक ठरले लोकांसाठी ।।११।। ते वेळी देवी अंबिकेनी। दिव्य अस्त्रं सोडिलेनी। दैत्यराजे ते निवारोनी। सकल केले निस्तेज।।१२।। त्याचप्रमाणे शुंभानेही। दिव्य अस्त्रं चालविले पाही। अती हुंकारे परमेश्वरीनेही। नष्ट केले सहजलिले।।१३।। शेकडो बाण असुरांनी । आच्छादिले देवी वरुनी। त्यावर देवीने क्रोधुनी। टाकिला तोडुनि धनुष्य।।१४।। धनुष्य तुटल्यावर असुराने। शक्ति हाती घेतली जाने। परंतु शक्तीते चक्राने। देवीने केले निष्प्रभ ।।१५।। दैत्याचा स्वामी त्यावरी। ढाल शतचंद्र धारी। आणिक सतेज तलवारी। घेऊनी धावला देवीवर।।१६।। तो येताच चंडिकेने। प्रहारे तोडिले धनुष्याने। ढाल तळपे उज्वल किरणे। ती ही नष्ट केली पहा।।१७।। घोडे हत्ती सर्व मारिले। धनुष्य पहिलेच असे तोडीले। मुद्‌गर त्याने हाती घेतले। अंबिकेला मारण्यासी।।१८।। त्याला येताना पाहुन। बाणे मुद्‌गर कापला देवीन। बुक्का मारीत दैत्यराजन। येऊनी झपटला देवीसी।।१९।। दैत्ये मारिला छातीवर। बुक्का अति जबर। देवीनेही त्याच्या छातीवर। जोरदार चापट मारिली।।२०।। देवाच्या चापटीने असह्य। दैत्य कोसळला भूमीवर। पुन्हा ऊठुनी सत्वर। ऊभा राहिला युद्धासी।।

२१ ।। आकाशी छलांग लावून। देवीच्या ऊर्ध्व भागी जाऊन। तेव्हा चंडिका आकाशी जाऊन। युद्ध करी शुंभासंगे।।२२।। त्यावेळी दैत्य आणि चंडिका। आकाशी युद्ध करिती जे कां। सिद्ध मुनीं विस्मये कां ।टाकी ती युद्धनिती।।२३।। युद्ध खुप वेळपर्यंत। करी दैत्य शुंभा सोबत। उचलुनी भूमीसी पटकवत। वेगे त्यासी अंबिका।। २४।। जमीनीवर पटकल्यानंतर। वेगे उठला तो असूर। पुन्हा वध करण्या सत्वर। चंडिकेकडे धावला।।२५।। समस्त दैत्यांच्या राजाला। देवीने येताना देखिला। त्रिशूलाने छेदुन छातीला। पृथ्वीवर पाडिला।। २६।। झाला घायाळ देवी शुले। पशु पक्षी उडुन गेले। समुद्र द्वीप पर्वत पृथ्वीतले। कांपत पडला भूमीवर।।२७।। दुरात्म्याच्या मृत्युनंतर सन्न। संपुर्ण जग दिसे प्रसन्न। स्वस्थ आकाश प्रछन्न। स्वच्छ दिसू लागले।।२८।। होऊ घातलेले उत्पात लक्षण। उल्कापातादि अलक्षण। दैत्या मारता ते शांत होऊन। नदी स्थिर वाहू लागल्या।।२९।। शुंभाच्या मृत्युने त्यावेळे। देवांचे ह्रदय भरुन आले। गंधर्व गण गाया लागले। मधुर मधुर गीताते।। ३०।। काही गंधर्व वाजंत्री वाजिती। अप्सरा दिव्य नृत्य करिती। पवित्र वारे हळु वाहती। दिव्य सुर्यप्रभा फाकली।।३१ ।। अग्निशाळेतील विझलेली। आग आपोआप प्रज्वलली। दिशांतील भयंकर शब्दावली। शांत शांत जाहली ।।३२।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये शुंभवधो नाम प्राकृत दशमोऽध्याय: ।।**

# अध्याय अकरावा

**प्रसंग : देवतांद्वारा देवी स्तुती तथा देवीद्वारादेवांना वरदान**

**ध्यानम्**

**श्रीअंगा समान कांती साजे जैसा सुर्य प्रभातीचा ।**
**तीन नेत्र हास्य मुखा शोभे शशीकांत मुकुटीचा ।**
**हाती वरद पाश अंकुश अन् कर अभय मुद्रेचा ।**
**ध्यातो तुजला अभयदात्री दास भुवनेश्वरीचा ।।**

ॐ ऋषिरुवाच ।।१ ।।

शुंभासि मारुनि सुरे। तव स्तुती आरंभिली।।
सन्मानुनी अग्निसी। कात्यायनी स्तविली ।।
अभिष्ट फल पावता उठे। कांती मुखकमली।।
दशदिशांना प्रभा जगमग। कांती अती फाकली।।२ ।।

शरणागत भक्तांची करिसी। पिडा दूर स्वामीनी ।।
देवी आम्हावरी हो प्रसन्न। दुजे नसे गं कुणी ।।
विश्वेश्वरी रक्षा विश्वाची कर। विनवी तुला प्रार्थुनी ।
या जगताची जननी तु। जगदीश्वरी जगत्जननी।।३ ।।
या जगताचा आधार तुच। एकमात्र माय जननी।।
पृथ्वीरुपे तुच स्थिती बनुनी। सर्वाभूती व्यापुनी ।।
तुझ्या पराक्रमा वंदिती। सकल जन मनी नमुनी।।
मोहे करी तु तृप्त जला। मही तृप्ती करूनी।।४ ।।
तुच अनंतबल शक्ति। नि विश्वासी कारणभुत।।
माया रुपी मोहिले असे। या जगा चराचरात।।
तुच प्रसन्न होऊनी महीवरी। या सदा राही वर्तत।।
प्रसन्न झाल्यावरी तु गं। टाकी मोक्ष पदरात।।५ ।।

या जगती जितुक्या स्त्रिया-विद्या। तुझेच मुर्तीरूप।
प्रत्यक्ष दिसती भिन्न परी। अभिन्न तुझे स्वरूप।
सकल जगता व्यापुनी उरले। जगदंबा स्वरूप।
तव स्तुती कवन कैसे करी। वाणी न अनुरूप ।।६ ।।

सर्वाठायी तू व्यापिली। स्वर्ग मोक्षाची माऊली। या स्वरुपीच तुला पुंजिली। अन्य उक्ती नकोचि ।।७ ।। बुद्धीरूपे तु सर्वा ह्रदया। जना वससी तु सदया। स्वर्ग मोक्ष प्रदायिनी माया। नमन तुजला नारायणी।।८ ।। कला काष्ट आदि रूपांनी। सतत राहे परिवर्तनी। विश्वसंहारा तत्पर नारायणी। तुला नमस्कार असो।।९ ।। सर्व मंगलाचे तु मांगल्यासी। शिवा सर्वार्थ साधण्यासी। शरणागता गौरी त्र्यंबकासी। तुजला नमस्कार असो।।१ ० ।। सृष्टी स्थिती पालण्यासी। आणिक तिच्या संहारासी। सर्वगुणाधारी नारायणिसी। सदा नमस्कार असो।।१ १ ।। शरणागत आर्त दीनाचे। पिडाहरण होण्या साचे। उभी रक्षणा पिडीतांचे। त्या नारायणिला नमस्कार असो।। १ २ ।। हंसाचे विमानी बैसे ती। ब्रह्माणी रूप धरूणी ती। दर्भाचे जल प्रोक्षी ती। त्या नारायणिला नमस्कार असो।।१ ३ ।। त्रिशूल हाती चंद्र डोई। वृषभारूढ स्वछंदे वाही। सर्पासी धारण करी ही। नारायणि नमितो मी।।१ ४ ।। मयुर कुक्कट गोलाकारी। महाशक्ति

धारण करी। रूप धरी कौमारी। ती नारायणि नमितो मी।।१५।। शंख चक्र गदा धरी। शार्ङ्ग उत्तम आयुध करी। वैष्णवी शक्तिरुपा भूवरी। त्या नारायणिला नमस्कार असो ।।१६।। हाती भयानक महाचक्र धरी। धरती धरी दाढेवरी। वाराही रूप धरी। ती नारायणी नमितो मी।।१७।। दैत्य वधा नृसिंहरुपे। अवतरली तु क्रुरस्वरुपे। त्रिभुवना रक्षी स्वस्वरुपे। नारायणि तुजसी नमितो मी ।।१८।। मस्तकी किरीट वज्र हाती। धारण करिशी इंद्रशक्ती। वृत्रासुराचे प्राण हरि ती। नारायणि नमितो मी।।१९।। शिवदूती स्वरूपी भयंकरी। विकट गर्जने ललकारी। दैत्यांचा तु संहार करी। नारायणि तुज नमन माझे।।२०।। विक्राळ मुख दाढा स्वरूपात। चामुंडा तु मुंडमाला विभूषित। चामुंडा मुंडमर्दिनी स्वरूपात। नारायणि तुज नमितो मी ।।२१।। लक्ष्मी लज्जा महाविद्ये। श्रद्धा पुष्टि धृवा स्वधे । महारात्री महाअविद्ये। नारायणि नमस्कार तुला ।।२२।। मेधा वरा सरस्वती। बाभ्रवी तामसी नियती। नारायणि ईशेती। नमस्कार करितो सद्भावे।। २३।। सर्वस्वरूपा सर्वेश्वरी । शक्तिसंपन्न दिव्य दुर्गेश्वरी। भयापासून रक्षा करी। नमस्कार करितो तुजलागी।।२४।। कात्यायनी तव नेत्र तीन। विभूषित सौम्य मुखवदन। रक्षण करी भयापासून। नमस्कार करितो तुजलागी ।।२५।। असूर संहारक त्रिशूल । ज्वाले भासे अती विक्राळ। भद्रकाली ती भया काल। तिला माझा नमस्कार ।। २६।। ध्वनीमात्रे व्यापी जगत्। दैत्याचे तेज नष्ट करीत। रक्षी घण्टा पापा

त्वरीत। माता रक्षी जैसी पुत्राते।।२७।। हाती खड्ग सुशोभित। असुर चर्बी रक्ते लेपीत। चंडिके रक्षुणी कर हित। नमस्कार करितो आम्ही।।२८।।

देवी तु प्रसन्न होऊनी रोगा नष्ट करीशी।
क्रोधे भरता सकल मन कामनांही नाशी ।
जो आला शरण तुला विपत्ती नसे त्यासी।
चरणी शरण आला तो देई शरण इतरासी।।२९।।
आपुल्याच स्वरूपाशी विभागी तु नाना रुपे ।
नाना रुपे प्रकटुनी दैत्याचा संहार केला कृपे।
धर्मद्रोहिंचा संहार करण्या प्रकटली स्वरूपे ।
ऐसी अन्य दुजी ना कोणी जगती ऊरली रूपे ।।३०।।
विद्या ज्ञान आदि वाक्य प्रकाशित करी परी।
शास्त्रं वा वेदामध्ये कुणाचे असे वर्णन तरी ।

तुला सोडून जगती या नसेच शक्ती दुसरी ।
अज्ञानमय विश्वासी फिरवी माय अंध:कारी ।।३१ ।।
जेथे राक्षस अनेक नि विषधारी सर्प वसतात ।
शत्रू नि लुटणारे असंख्य दावानल वसतात ।
तेथे नि सागरामधी तुम्ही सदैवची वसतात ।
तुम्ही राहून तेथे तरी रक्षा विश्वाची करितात ।।३२ ।।
विश्वेश्वरी तु विश्वाची पालनकर्ती विश्वरूपा ।
विश्वरुपा म्हणूनी धारण करीशी विश्वस्वरुपा ।
शिवाची वंदनीय तू लोक वंदिती शिरा।
जे वंदिती तुजला ते देती जगा आसरा ।।३३ ।।
प्रसन्न होई माते जैसी असुराचा वध करुनी ।
आली धावत रक्षण्या मही देवी रुपा धरुनी ।

करी नाश पापांचा आणिक उत्पाता लागुनी ।
महामारी आदि नाशी रक्षी उपद्रवा पासूनी।।३४।।

विश्वाची पिडा दुर करणारी। त्रैलोक्यवासिनी प्रसन्न हो त्वरी। आलो तुझ्या चरणावरी। आता वर दे आम्हातें।।३५।। देव्युवाच।।३६।। तुमच्या जे मनी वसे। तुम्ही मागा भरवसे। जे संसारा योग्य असे। त्या वरासी देईन।।३७।। देवा ऊचु:।।३८।। हे अखिल ब्रह्माडांची ईश्वरी। समस्त बाधांचे शमन करी। शत्रूंचे दमनही त्याचपरी। करीत राही गे जगदंबे ।। ३९।। देव्युवाच।।४०।। वैवस्वत नामे मन्वंतरात। शुंभनिशुभ आहेत जन्म घेत। होतील युग अठ्ठाविसाव्यात। महादैत्य दोन जाणे।। ४१ ।। त्यावेळी मी नंद गोपा घरी। अवतीर्ण यशोदेचे उदरी। विंध्याचली जाऊन सत्वरी। असूरांचा नाश करीन।।४२।। त्यानंतर पृथ्वीवर घेईन। अवतार आणि मारीन। वैप्रचित्त दानव जान। माझे भयंकर रूपात।। ४३।। त्या भयंकर राक्षसाचे। भक्षण करीन मी साचे। डाळिंब फुलापरी दाताचे। रंग दिसू लागतील।। ४४।। तेव्हा स्वर्ग लोकीचे देव। आणि मर्त्यलोकीचे मानव। करतील माझे स्तवन। रक्तदंतिका नामाने।।४५।। शत वर्षे पृथ्वीवर। पाऊस नाही पडणार। स्तवन करितील मुनीवर। अयोनिजा रूपे प्रकटेन मी।। ४६।। शतनेत्रांनी पाहीन। समस्त मुनी लागुन। शताक्षी नामे किर्तन। समस्त लोक करतील ।।४७।। त्यावेळी

माझ्यातुन उत्पन्न। शाकाने करीन भरण पोषण। जोपर्यंत वर्षा न होईन। रक्षण शाकच करतील।।४८।। ऐशा लिले पृथ्वीवर। शाकंभरी नामे अवतार। दुर्गम नामक असूर। वधीन मी यालोकी।।४९।। यास्तव नांव माझे। दुर्गा ऐसे पडेल साजे। दानव मर्दनाचे काजे । दुर्गादेवी मिरवेल।।५०।। परत नवरुपा धरील। भिमा नामे अवतरेल। हिमालयीचे दानव भक्षिल। स्तुती करतील मुनीजन।।५१।। माझे नांव भीमा असेल। अरुण नामक दैत्य अवतरेल। भयंकर उत्पात करील। या तिन्ही लोकी।।५२।। त्रैलोकाच्या हिताकारण। षड्पादी असंख्य बनून। महादैत्याचा वध करीन। भ्रमर रूपे तेधवा।।५३।। ते समयी चारही दिशेने। भ्रामरी नामे करितील स्तवने। दानवी बाधेसी तारणे। अवतार जगी घेईन ।।५४।। त्या त्यावेळी येऊन । शत्रुंचा संहार करीन। भक्तालागी रक्षीण। अवतार घेऊनी ।।५५।।ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये देवीस्तुतीनाम प्राकृत एकादशोऽध्याय: ।।**

# अध्याय बारावा

**प्रसंग : देवी चरित्राच्या पाठाचे महात्म्य**

**ध्यानम्**

**श्री-प्रभा विद्युत कांती त्रिनेत्रधरिणी दुर्गा शक्ति ।**
**चंद्रमुकुट शिरी सेवेसी कन्या अगणित असती ।**
**चक्र गदा तलवार ढाल बाण धनुष पाश हाती ।**
**सिंहावरी बैसूनी दुर्गा दावी भयंकर रूप अती।**

ॐ देव्युवाच ।।१ ।।
जो एकचित्त होऊन प्रतिदीन। करील माझे स्तुतीस्तवन। त्याची बाधा निवारीन। ऐका देव हो निश्चित।।२ ।। जे करतील पाठ विशेष। मधुकैटभ दानवाचा नाश। महिषासुर वध सावकाश। शुभनिशुंभ संहाराचा।।३ ।। अष्टमी-नवमी-चतुर्दशी। एकाग्रचित्ते पाठ ये दिवशी। करीती भक्ती भावानिशी। उत्तम महात्म्य श्रवण जे।। ४ ।। त्यांना पाप कोणतेही। शिवू न शके या मही। घरात न दरिद्रता कधीही। प्रेमी जना विरह न येचि ।।५ ।। शत्रु वा राजभय। चोर

वा अग्निभय। शस्त्रं वा जलभय। न उरे कदापिही ।।६।। माझे चरित्र सर्वांनी। ऐका एकाग्रचित्त होऊनी। पठण करावे नेमानी। हे परम कल्याणकारक।।७।। हे माहात्म्य पठणाने। महामारी सारखे दुखने। अधिभौतिकादि ताप जाने। उत्पात शांत होतील।। ८।। नित्य पाठ ज्या मंदिरी। विधिपुर्वक महात्म्याचे करी। त्यास्थानी मी वासकरी। सन्निध राहीन ठाईच।।९ ।। बलिदान पुजा महोत्सवात। वाचावे हे निजचरित। वा रहावे श्रवण करीत। विशेषत्वे जाना पै।। १० ।। ऐसे आचरिता चरिता। बलि पुजा होमा करिता। अति प्रसन्नतेने सेविता। विधीयुक्त वा मानसी।।११ ।। शारदीय नवरात्री महापुजेत। श्रवण करा माझे चरित। वा पठण करा श्रद्धेसहित। भक्तिपुर्वक आदरे।।१२ ।। प्रसादे होईल बाधामुक्त। पावेल धनधान्य सुत। संपन्नताही इहपरत्र। संदेह मनी न धरावा।।१३ ।। या चरित्रातील सुंदर कथेने। वा युद्ध पराक्रमाच्या श्रवणाने। मनुष्य निर्भय होईल जाने। भय नासेल निश्चये।।१४ ।। हे महात्म्य ऐकणाराचे। शत्रु नष्ट होतील साचे। कल्याण आणि आनंदाचे। प्राप्ती कुळ राहील।। १५ ।। सर्वत्र शांति कर्मात। वा वाईट स्वप्न देखे जेथ। भयंकर पिडा उपस्थित। तेथे चरित्र ऐकावे हे।। १६ ।। होईल विघ्न निवारण। भयंकर ग्रहपिडा हरण। स्वप्नातील विघ्न जान। होईल सुखात परिवर्तित।।१७ ।। बालकांसी शांतीकारक। संगठन कौशल्य वर्धक। मित्रांलागी मैत्रीदायक। महात्म्य हे जानावे।।१८ ।। या महात्म्याच्या पठनानं। दुराचारी होतील

बलहीनं। राक्षस भुत पिशाच जानं। सत्वर नाश पावतील ।।१९।। या महात्म्ये सामिप्य लाभुन। पशु पुष्प अर्घ्य धुप दीपानं। गंधादि उत्तम सामग्री करुन। पुजन यथासांग करावे ।।२०।। अभिषेक होमहवन प्रतिदिन। नैवेद्य नानाप्रकारे अर्पण। करावे ब्राह्मणांसी भोजन। संवत्सर एक पर्यंत।।२१।। करिता ऐसी आराधना। प्रसन्नता होई माझे मना। पापांचे करील शमना। आरोग्य प्रदान करील।।२२।। माझ्या अवताराच्या लीला। तारक प्राणी मात्राला। पठन करिता युद्धचरित्राला। दुष्ट दैत्याचा नाश होईल।।२३।। हे चरित्र ऐकल्याने। शत्रुभय नासे जाणे। तुम्ही आणि महर्षीने। स्तुती सर्व केल्यात।।२४।। ब्रह्माजींनी केल्या स्तुती। कल्याण बुद्धी प्रदाति। वनी आडमार्गी आडल्यावती। तारक त्या सर्वत्र ।।२५।। तारी निर्जन स्थळी चालताना। वा तारी चोराने लुटताना। सिंह हत्ती मागे लागताना। शत्रुहाती पकडले तरीही।।२६।। कोपलेल्या राजाच्या आदेशानी। नेता वध वा बंधन स्थानी। सागरी नांव डगमगे तुफानी। तेथेही तारी जननी।।२७।। युद्धात शस्त्रं प्रहाराने। जरी पिडा होई वेदनेने। किंवा व्यथित वेदनेने। बाधे बाधिला भयानक ।।२८।। जो चरित्राचे करी स्मरण। तो मुक्त होई संकटातुन। माझे प्रभावे करुन। सिंहादि जंतु नष्ट होती।।२९।। चोर जातील पळुन। शत्रुही जाईल हरुन । करिता चरित्राचे स्मरण। तारक होई

भवार्णवी ।।३०।। ऋषिरुवाच ।।३१।। अशाप्रकारे बोल बोलत ती। महापराक्रमी भगवती । पाहता पाहता चंडिका ती ।अंतर्धान पावली।।३२।। सर्व शत्रूंसी संहारिले ।देव सकल निर्भय झाले। यज्ञभागाशी स्विकारिले। झाले पदी विराजमान ।। ३३।। विध्वंस संसाराचा करणारे। महाभयंकर शत्रु सारे ।शुंभ निशुंभ देवीद्वारे। युद्धात झाले गतप्राण ।।३४।। असूर सर्व उर्वरीत। मार्गे निघती त्वरीत। पाताल लोकी जात । ते त्यांचे स्थानासी ।।३५।। ऐशा प्रकारे नृपवरा। भगवती अंबिका भूवरा। पुन:पुन: घेई अवतारा। जगत् रक्षणा कारणे।।३६।। तीच विश्वाला मोहित कर्ती। तीच विश्वाला जन्म देती। प्रार्थनेने संतुष्ट होती। प्रदान करी विज्ञान समृद्धी।। ३७।। महाप्रलयी स्वरूप महामारी। महाकाली धारण करणारी ।स्वयं अजन्मा असे जरी ।पुर्ण ब्रह्मांडे व्यापिली।।३८।। महाप्रलयी महामारी रुप धरोनी। अजन्मा परी सृष्टीत अवतरोनी। समयानुसार देवी सनातनी। प्राणीमात्रांचे करी रक्षण।। ३९।। मनुष्यां अभ्युदयाकारणे। गृहासि वसे लक्ष्मी रुपाने। दरिद्रतेच्या विनाशाकरणे। देई सदैव बरकत।। ४०।। पुष्प धुप गंधादिनी ।पुजन स्तुती केल्यानी। देई धन धार्मिक बुद्धी नि। देईल उत्तम गतिस।।४१।। ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये फलस्तुतीर्नाम प्राकृत द्वादशोऽध्याय: ।।**

# अध्याय तेरावा

**प्रसंग :सुरथ आणि वैश्याला देवीचे वरदान**

**ध्यानम्**

**उदयकाली कांती सूर्य मंडलाची ।**
**चार भुजा तीन नेत्र दिव्य शरीराची।**
**हाती पाश अंकुश अभय मुद्रा हिची ।**
**शिवा देवी करितो याचना तव कृपेची।।**

ॐ ऋषिरुवाच ।।१ ।।
नृपा याप्रकारे मी तुला। वर्णिले देवी महात्म्याला। जिने धारण केले जगताला। तिचा प्रभाव आहे असाच।।२ ।। तिच करी विद्या उत्पन्न। विष्णु माया स्वरुपालागुन। मोहित होती विवेकी जन। वैश्य तथा अन्य की।।३ ।। पुढेही राहतील अनन्य। यालोकी मोहित जन। महाराज जावे शरण। परमेश्वरीसी अविलंबे।। ४।। जो करील तिची

आराधना। त्याला देई भोग साधना। स्वर्ग तथा करी मोक्ष जाना। प्रदान करील माय ती।।५ ।। मार्कंण्डेय उवाच ।। ६ ।। ऐसे वचन मांगलिक। ऐके राजा सुरथाने देख। पालन उत्तम व्रत धारक। महर्षीशी वंदिले।।७ ।। ते मायाळू अत्यंत। राज्यापहरणाची खंत। अति खिन्नतेने वर्तत। सद्गदीत भावनेने।।८ ।। याकारणे ऐक महामुने। राजा तथा वैश्य विरक्तीने। जगदंबा दर्शन हेतुने। तपा बैसले नदीकाठी।। ९ ।। वैश्य उत्तम देवी सूक्ता भले। जप करीत तपस्ये बैसले। मृत्तिका मुर्ती बनवी लिले। दिव्य नदी तिरावर।।१० ।। पुष्प धुप हवनाद्वारे। आराधना करी निराहारे। चिंतन एकाग्रे करे। मनाने केला आरंभ ।।११ ।। शरीराचे रक्ताने प्रोक्षिती। तीन वर्षे बली देती। संयमपुर्वक आराधिती। ते दोघे सावकाश ।।१२ ।। त्यावर प्रसन्न झाली। चंडिका देवी भली। प्रत्यक्ष तेथे प्रकटली। बोले दर्शन देऊनी।। १३ ।। देव्युवाच ।।१४ ।। राजन् तथा कुलनंदनाशी। आनंदी ठेवणारा वैश्याशी। माग वर बोले प्रेमेशी। देवी प्रसन्न होऊनी।।१५ ।। मार्कण्डेय उवाच।। १६ ।। राज्य देई राजा बोलला। नष्ट करुनी सकल शत्रुला। पुढील जन्मा देई राज्याला। कदापि नष्ट न होणाऱ्या।। १७ ।। वैश्याचे चित्त संसारातुन। विरक्त झाले अति खिन्न। वर मागे उचीत जानुन। अहंता आसक्ति नाशाचा।।१८ ।। देव्युवाच।।१९ ।। ऐक नृपा वचन। थोडे दिवसात जान। तु शत्रुला मारुन। राज्य प्राप्ती करशील।।२० ।। तुझे राज्य येईल । ते स्थिर राहील।।२१ ।।

मृत्युच्या पश्चात वंशी। भगवान विवस्वताचे अंशी।।२२।। पृथ्वीवर सावर्णिक नामासि। विख्यात होऊनी राहशील ।।२३।। वैश्यवरा तु ज्या वरासी। ईच्छिले मजपाशी ।।२४।। देते मी तुजसी। मोक्षाचे ज्ञान मिळेल ।।२५।। मार्कण्डेय उवाच ।। २६।। अशाप्रकारे दोघांसी देवीने। मनोवांछित वरा दिले।।२७।। भक्तीपुर्वक गाईलेली। स्तुती अंबिकेने ऐकली। अंतर्धान पावती झाली। तात्काल क्षणार्धात।।२८।। वरा लाभुन क्षत्रिय। सुरथा सुर्यापासून। सावर्णि नामक जान। मनु जन्म घेतील।।२९।। क्लीं ॐ।।

**इति मार्कंडेयपुराणे सावर्णिके मन्वंतरे देवीमाहात्म्ये सुर वैश्ययोर्वरप्रदानं नाम प्राकृत त्रयोदशोऽध्यायः ।।**

# नवार्णविधि:

जपाला सुरुवात करताना हातात जल घेऊन खालील प्रकारे संकल्प करावा.

**संकल्प : ॐ अस्य श्रीनवार्ण मंत्रस्य ब्रह्मा विष्णु रुद्रा ऋषय:, गायत्री अनुष्ठुभ छंदांसि, श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वती देवता:, ऐं बीजम्, ह्रीं शक्ति:, क्लीं कीलकम् , श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वती प्रीत्यर्थे जपे विनियोग:** असे बोलुन हातातील जल ताम्हणात सोडावे.

नंतर पुढे लिहील्याप्रमाणे प्रत्येक देवता आणि अवयवाचा उच्चार करुन उजव्या हाताच्या बोटांनी शरीराच्या विविध भागांना किंवा अवयवांना स्पर्श करून त्या त्या ठिकाणी देवता स्थापित कराव्यात. जसे की शिर,मुख,हृदय...

**ऋष्यादिन्यास:**

**ब्रह्मा विष्णु रुद्र ऋषिभ्यो नम: - शिरसी** (मस्तकाला हाताने स्पर्श करावा.)

**गायत्री अनुष्ठुभ छंदेभ्यो नम: - मुखे** ( मुखाला हाताने स्पर्श करावा.)

**महाकाली महालक्ष्मी महासरस्वती देवताभ्यो नम: - हृदि** (हृदयाला हाताने स्पर्श करावा.)

**ऐं बीजाय नम: -गुह्ये** (शरीराच्या मागील भागास डाव्या हाताने स्पर्श करावा.)

**ह्रीं शक्तये नम: - पादयो:** (दोन्ही पायांना हाताने स्पर्श करावा.)

**क्लीं कीलकाय नम: - नाभौ** (नाभिला हाताने स्पर्श करावा.)

**" ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडाये विच्चे " करं संशोध्य** (हाताची शुद्धी करावी.)

अशाप्रकारे ऋषिन्यास पुर्ण झाल्यावर पुढील क्रमाने न्यास करावेत.

**करन्यास :**

**ॐ ऐं अंगुष्ठाभ्यां नम:** (दोन्ही हाताच्या तर्जनीने आंगठ्याला स्पर्श करावा.)

**ॐ ह्रीं तर्जनीभ्यां नम:** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने तर्जनीला स्पर्श करावा.)

**ॐ क्लीं मध्यमाभ्यां नम:** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने मध्यमेला स्पर्श करावा.)

**ॐ चामुंडायै अनामिकाभ्यां नम:** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने अनामिकेला स्पर्श करावा.)

**ॐ विच्चे कनिष्ठिकाभ्यां नम:** (दोन्ही हाताच्या आंगठ्याने कनिष्ठिकेला स्पर्श करावा.)

**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे करतल करपृष्ठाभ्यां नम:** (हातावर हाताने स्पर्श करावा.)

**हृदयादि न्यास :**

**ॐ ऐं हृदयाय नम:** (उजव्या हाताने हृदयाला स्पर्श करावा.)

**ॐ ह्री शिरसे स्वाहा** (उजव्या हाताने शिराला स्पर्श करावा.)

**ॐ क्लीं शिखायै वषट्** (उजव्या हाताने शेंडीला स्पर्श करावा.)

ॐ चामुंडायै कवचाय हुम् (डाव्या हाताने उजव्या व उजव्या हाताने डाव्या खांद्यास स्पर्श करावा.)
ॐ विच्चे कनिष्ठिकाभ्यां नम: (दोन्ही हाताच्या आंगठ्याने कनिष्ठिकेला स्पर्श करावा.)
ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे करतल करपृष्ठाभ्यां नम: (हातावर हाताने स्पर्श करावा.)

अक्षरन्यास:
ॐ ऐं नम: शिखायाम् (शेंडी)
ॐ ह्री नम: दक्षिण नेत्रे ( उजवा डोळा)
ॐ क्लीं नम: वामनेत्रे (डावा डोळा)
ॐ चां नम: दक्षिण कर्णे (उजवा कान)
ॐ मुं नम: वामकर्णे (डावा कान )
ॐ डां नम: दक्षिण नासापुटे (उजवी नाकपुडी )
ॐ यैं नम: वाम नासापुटे (डावी नाकपुडी )
ॐ विं नम: मुखे (तोंड)
ॐ च्चें नम: गुह्ये ( मागील गुह्यभागांस डाव्या हाताने स्पर्श करुन हात धुणे.)

**मुलेन अष्टवारं व्यापकं कुर्यात्** - **ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे** हा मंत्र म्हणत ८ वेळा दोन्ही हातांनी डोक्यापासुन पायापर्यंत स्पर्श करावा.

**दिङ्न्यास:**

**ॐ ऐं प्राच्यै नम:, ॐ ऐं आग्नेय्यै नम: , ॐ ह्रीं दक्षिणायै नम:, ॐ ह्रीं नैर्ऋत्ये नम:, ॐ क्लीं प्रतिच्यै नम:, ॐ क्लीं वायव्यै नम:, ॐ चामुंडायै उदीच्यै नम:, ॐ चामुंडायै ऐशान्यै नम:, ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे उर्ध्वायै नम:, ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे भूम्यै नम:** अशाप्रकारे दहा दिशांना न्यास विधीने देवता स्थापित कराव्यात.

**ध्यानम्**

खड्ग चक्र गदा बाण धनुष परिघ त्रिशूल धरुन।
भुशुंडी शीर शंख धारण माथी तीन नेत्र भूषन।।
अंगावरी दिव्याभूषन साजे कांती निलवरन ।
दश पाद दश वदन ब्रह्मा जिचे करी स्तवन ।।१।।
अक्षमाला परशु बाण वज्र पद्म धनुष धरुन ।
कुंडिका दंड शक्ति खड्ग ढाल शंख घंटा घेऊन।।
मधु पात्र शूल पाश चक्र कमल दिव्य आसन।
महिषासूरा येई मारुन महालक्ष्मीचे करा भजन ।।२।।

**घंटा शूल हल शंख मुसल चक्र धनुष बाण।**
**शारदीय चंद्रकांती शोभा दिसते अती महान।।**
**गौरी रुपे प्रकटुन देई आधार लोकां तीन।**
**शुंभ दैत्य नाश करी सरस्वतीचे करा भजन ।।३।।**

असे ध्यान करुन

“ **ऐं अक्षमालिकायै नमः** ” या मंत्राने जपमाळेची पुजा करावी.

नंतर माळेची प्रार्थना करावी:-

**ॐ मां माले महामाये सर्वशक्ति स्वरूपिनी । चतुर्वर्गः न्यतः तस्मान्मे सिद्धिदा भव ।।**
**ॐ अविघ्नं कुरु माले त्वं ग्रहणामि दक्षिणे करे । जपकाले च सिद्धध्यर्थं प्रसीद मम सिद्धये ।।**

**ॐ अक्षमाला अधिपतये सुसिद्धिं देहि देहि सर्व मंत्रार्थ साधिनि साधय साधय सर्वसिद्धिं परिकल्पय परिकल्पय मे स्वाहा ।**

या ध्यानानंतर “**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे** ” या मंत्राचा १०८ / १००८ वेळेस जप करावा. जप पुर्ण झाल्यानंतर

**गोपनीयातील गोपनीयाचे रक्षण। देवी सदैव करिशी जान।**
**मी केलेल्या जपा स्विकारुन। तवकृपेने होवो सिद्धी प्राप्त।।**

हा श्लोक म्हणून उजव्या हातातील जपमाळ देवीच्या डाव्या हाताला स्पर्श करावी.

संकल्प : प्रथम मध्यम चरित्राचे ऋषि ब्रह्मा विष्णू महेश , देवता महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती , छंद गायत्री अनुष्ठुभ, नंदा शाकंभरी शक्ती, रक्तदंतिका दुर्गा भ्रामरी बीज. अग्नि-वायु-सुर्य तत्व, ऋग्वेद आणि सामवेद ध्यान, सकल कामना सिद्धि अर्थाने श्री महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती प्रित्यर्थ जप करतो(ते). असे बोलून संकल्पाचे जल ताह्मणांत सोडावे. त्यानंतर पुढील श्लोकाने न्यास करावेत.

करन्यास: ॐ ह्रीं अंगुष्ठाभ्यां नम: । ॐ चं तर्जनीभ्यां नम: । ॐ डिं मध्यमाभ्यां नम: । ॐ कां अनामिकाभ्यां नम: । ॐ यैं कनिष्ठिकाभ्यां नम: । ॐ ह्रीं चण्डिकायै करतलकरपृष्ठाभ्यां नम:।

ह्रदयादिन्यास: खड्गीनी शुलीनी घोररूपीनी । गदा चक्र शंख धनुषधारिणी।
बाण भुशुण्डी परिघ या जनी । तुझे अस्त्रे अमोघ मही। ह्रदयाय नम:
देवी आमुचे शुलाने रक्षण करी। अंबिके आमुचे खड्गे रक्षण करी।
घण्टा ध्वनी तथा धनुष्य टंकारी। रक्षण करी ओ जगदंबिके।। शिरसे स्वाहा
पुर्व पश्चिम दक्षिण दिशांनी। रक्षी मजसी माय भवानी।
उत्तरेला त्रिशूल फिरवूनी । रक्षण करी ओ जगदंबिके।। शिखायै वषट्

तिन्ही लोके जे परम सुंदर। रूप विचरति अति भयंकर।
दोन्ही रूपांनी सत्वर। भूलोकीची रक्षा करी।। कवचाय हुम्
खड्गीनी शुलीनी घोररूपीनी । गदा चक्र शंख धनुषधारिणी।
बाण भुशुण्डी परिघ या जनी । तुझे अस्त्रे अमोघ मही। नेत्रत्रयाय वौषट्
सर्वस्वरूपा सर्वेश्वरी । शक्तिसंपन्न दिव्य दुर्गेश्वरी।
भयापासून रक्षा करी। नमस्कार करितो तुजलागी।। अस्त्राय फट्

(हे प्रचलित न्यास विधी आहेत. ज्यांना विस्तारित न्यास करायचे असतील त्यांनी इतर ग्रंथाचा आधार घेऊन सारस्वत-मातृगण-षड्देवी-ब्रह्मादि-महालक्ष्म्यादि -बीजमंत्र-विलोमबीज-मंत्रव्याप्ति आदि न्यास करावेत.)

## ध्यानम्

श्री-प्रभा विद्युत कांती त्रिनेत्रधारिणी दुर्गा शक्ति ।
चंद्रमुकुट शिरी सेवेसी कन्या अगणीत असती ।
चक्र गदा तलवार ढाल बाण धनुष पाश हाती ।
सिंहावरी बैसूनी दुर्गा दावी भयंकर रूप अती।

# तंत्रोक्त देवीसूक्तं

देवी माते तुला नमस्कार असो। महादेवी शिवाला नमस्कार असो। प्रकृति आणि भद्राला नमन असो। आम्ही नेमे जगदंबेला नमितो।।१।। देवी रौद्राला नमस्कार। नित्या गौरीस सतत नमस्कार। ज्योत्नामयी चंद्ररूपास नमस्कार। सुखस्वरुपास नमस्कार असो।।२।। शरणागताचे कल्याण कर्ती। वृद्धी तथा सिद्धी कर्ती। दानवा लक्ष्मी नैऋती। राजा लक्ष्मी शर्वानीला नमस्कार।।३।। संकटा पार कर्ती दुर्गा। सकल साराचे सार दुर्गा। सर्वाचेकारण ख्याति दुर्गा। कृष्णा आणि धूम्राला नमस्कार।।४।। सौम्य अत्यंत रौद्र रुपी दुर्गा। जगताची आधारभुत दुर्गा। कृतीदेवी माता जयदुर्गा। तिला वारंवार नमस्कार।।५।। देवीस सर्व प्राणीमात्रांत। विष्णुमाया नामे जानत । तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।६।। देवी सर्व प्राणीमात्रात। चेतना म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।७।। देवी सर्व प्राणीमात्रात। बुद्धी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला वारंवार नमस्कार असो।।८।। देवी सर्व प्राणीमात्रात। निद्रा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।९।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षुधा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।१०।। देवी सर्व प्राणीमात्रात। छाया म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।११।। देवी सर्व प्राणीमात्रात। शक्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला

वारंवार नमस्कार असो।।१२।। देवी सर्व प्राणीमात्रात। तृष्णा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१३।। देवी सर्व प्राणीमात्रात। क्षान्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१४।। देवी सर्व प्राणीमात्रात। जाति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१५।। देवी सर्व प्राणीमात्रात। लज्जा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१६।। देवी सर्व प्राणीमात्रात। शांती म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१७।। देवी सर्व प्राणीमात्रात। श्रद्धा म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१८।। देवी सर्व प्राणीमात्रात। कांति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।१९।। देवी सर्व प्राणीमात्रात। लक्ष्मी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार । तिला
वारंवार नमस्कार असो।।२०।। देवी सर्व प्राणीमात्रात। वृत्ती म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।२१।। देवी सर्व प्राणीमात्रात। स्मृती म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।२२।। देवी सर्व प्राणीमात्रात। दया म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।२३।। देवी सर्व प्राणीमात्रात। तुष्टी म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।२४।। देवी सर्व प्राणीमात्रात। मातृ म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला
वारंवार नमस्कार असो।।२५।। देवी सर्व प्राणीमात्रात। भ्रान्ति म्हणूनी जानत। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला

वारंवार नमस्कार असो।।२६।। इंद्रियांची अधिष्ठाती। प्राणीमात्रात सदा वसति। व्याप्त असे सर्वाभूती। तिला वारंवार नमस्कार असो।।२७।। चैतन्यरूपाने या जगती। या जगता भरुन उरे ती। तिला नमस्कार तिला नमस्कार। तिला वारंवार नमस्कार असो।।२८।।

**अभीष्ट प्राप्त होता देवे जिला स्तविली।**
**देवराज इंद्रे बहुतदिनी जिला सेवियेली ।**
**ती कल्याणी साधनभूत ईश्वरी आपुली ।**
**कल्याण मंगल करुनी आपत् नाशियेली ।।२९।।**
**उदंड दैत्याने त्रासिले सर्व देवगण अती ।**
**त्रासले ते देवगण मती परमेश्वरी नमिती ।**
**विनम्र भक्तीने जे पुरुष जगदंबा स्मरिती ।**
**सकल विपत्तीचा नाश जगदंबा करी ती ।।३० ।।**

# अथ प्राधानिक रहस्य

राजोवाच
चंडिका अवताराची कथा। निवेदिली आपण आता। या अवताराची प्रधान देवता। तिचे निरूपण करावे।। १ ।। द्विजश्रेष्ठा आलो शरण। मजसी करा कथन। कैसे करावे यथार्थ आराधन। विधीयुक्त उपचारे ।।२ ।। ऋषिरुवाच हे असे परम गोपनीय जान। कोणी सविस्तर न करी कथन। तु माझा भक्त असल्याकारण। टाळण्यासारखे काही नसे ।।३ ।। महालक्ष्मी जी त्रिगुणमयी परमेश्वरी। सकलांचे आदिकारण ईश्वरी। दृश्य आणि अदृश्य रुपेपरी। विश्वा व्यापुनी राहिली।।४ ।। चार हाती मातुलिंगं। गदा ढाल मस्तकी नागं। पानपात्र लिंग योनी अंगं। धारण तिने करियेले।।५ ।। तप्त कांचनापरी कांती। तसेच भूषन आभूषना ती। जिने केले शून्य जगताप्रती। परिपूर्ण देखा।।६ ।। परमेश्वरी महालक्ष्मीने । जगता शून्या देखूनी जाने। उपाधि केवल तमोगुणे। उत्कृष्ट रूपे केले धारण।।७ ।। नारी रूपे प्रकट झाली। कांती कृष्णरंगे रंगली। भव्य नयन मुखे शोभली। कटी अती पातळ।।८ ।। चतुर्भुजे ढाल

तलवार। मुंडके प्याल्याचा श्रृंगार। शिरी मुंडी वक्षस्थली शरीर। होती धारण केलेली।।९।। ऐसे स्वरुपे प्रकट झाली। स्त्री श्रेष्ठ तामसी ते वेळी। महालक्ष्मीसी वंदुनी बोलली। माझे नांव-कर्म सांगावे।।१०।। महालक्ष्मी सांगे तामसीला। प्रदान करिते तुज नामाला। आणिक सांगते कर्माला। जी आहेत तुजकारणे।।११।। महामाया महाकाली महामारी। क्षुधा तृष्णा एकविरा वरी। कालरात्री दुरत्यया नामे बरी। महालक्ष्मी सांगतसे।।१२।। कर्ममार्गी तुझे नांव घेईल। लोकांत चरितार्थ होईल। कर्मा जानुन पाठ करील। सुख भोगील या लोकी।।१३।। ऐसे बोलोनी महाकालीते। महालक्ष्मी धरी दुजा रूपाते। शुद्ध सात्विक स्वरुपाते। चंद्रासम गौरवर्णी।।१४।। अक्षमाला अंकुश अन। हाती वीणा पुस्तक धारण। महालक्ष्मी करी नाम प्रदान। त्याही प्रकट स्वरूपास।।१५।। महाविद्या महावाणी भारती। वाक् आर्या ब्राह्मी सरस्वती। कामधेनु वेदगर्भा धीश्वरी इति। तुझे नामे असतील।।१६।। महालक्ष्मी बोले तदनंतर। महाकाली महासरस्वती सत्वर। तुम्ही तुमचे गुणानुसार। पुरुषा उत्पन्न करावे।।१७।। ऐसे त्यांसी आज्ञापुन। एक नरनारी करी उत्पन्न। बैसती हिरण्यगर्भासमान। ते दाम्पत्यं तेधवा।।१८।। महालक्ष्मी देई पुरुषासी। ब्रह्मण विरंची धात:नामासि। श्री-पद्मा-कमला–लक्ष्मीसी। नामे तेवी पुकारिले ।।१९।। महाकाली महासरस्वतीनेही। जोड्या केल्या उत्पन्न पाही। त्यांसी दिधले नामा तेही। सांगतो मी अवधारा।।२०।। कंठे नीलचिन्ह लाल भुजाला।

श्वेत शरीर मुकुटी चंद्राला। मस्तकी धरिल्या पुरुषाला। गौरवर्णी स्त्री निर्मीली ।।२१।। ते पुरुष रुद्र शंकर स्थानु। नामे प्रसिद्ध कपर्दी त्रिलोचनु। स्त्रिया त्रयी विद्या कामधेनु। भाषा अक्षरा स्वरा पै।।२२।। महासरस्वतीची निर्मीती झाली। गौरवर्णी स्त्री पुरुषा भली। ते दोघे ज्या नामे मिरवली। सांगतो ती अवधारा।।२३।। विष्णु कृष्ण हृषिकेश। वासुदेव जनार्दन पुरुष। उमा गौरी सती स्त्रीस। चंडी सुंदरी सुभगा शिवा।।२४।। याप्रकारे तिनही युवती। प्राप्त करती पुरुषाप्रती। ज्ञानी जना हे समजण्या मती। अज्ञान्यासी रहस्य नकळेचि।।२५।। त्रयविद्यारुपा सरस्वतीशी। अर्पी पत्नी ब्रह्मांशी। वरदायिनी गौरी रुद्रासी। वासुदेवासी लक्ष्मी।।२६।। येणे रिती ब्रह्मा सरस्वती। ब्रह्मांड निर्माण करिती। रुद्र गौरी सांगाती। भेदन करिती तयाचे।।२७।। त्यावेळी महत्तत्व ब्रह्मांडातुन। कार्यसमुह पंचमहाभूत जान। समस्त स्थावर जंगम रूपान। उत्पत्ती झाली जगाची।।२८।। विष्णू लक्ष्मी उभयतांनी। जगाचे पालन पोषणी। प्रलयकाली गौरी महेश्वरानी। कार्य केले सुनिश्चित।।२९।। महालक्ष्मी सर्वसत्वाची अधीश्वरी। तीच निराकार तथा साकारी ।नानाप्रकारे नामधारण करी ।सर्व सत्वमयी महाराज ।।३०।। सगुणवाचक सत्य ज्ञान। चित्त माया नामांतरान ।आदि अथवा प्रत्यक्ष प्रमाण ।वर्णन न होऊ शके।।३१।।ॐ।।

**इति प्राधानिकं रहस्यं संपूर्णम्।**

# अथ वैकृतिकं रहस्यम्

ऋषिरुवाच

पुर्वी त्रिगुणमयी सत्वप्रधान। महालक्ष्मीचे तामसीआदि भेद तीन। शर्वा चंडि दुर्गा भद्रा भगवती जान। अनेक नामे वर्तल्या।।१ ।। महाकाली विष्णुची तमोगुणी। योगनिद्रा ज्ञात असे जनी। मधु कैटभाच्या नाशा लागुनी । ब्रह्मा प्रार्थीती महाकाली ।।२ ।। मुख शिर भुजा पाय प्रत्येकी। दश संख्या अवयव विवेकी। कृष्णवर्ण विशाल तीस नयनकी। ओळी दिसती सुरेख ।।३ ।। तिच्या दाढा दात चमकती। तिचे रुप भयंकर अति। तसेच सौभाग्य रुप कांती। महती संपत्ती अधिष्ठान।।४।। खड्ग बाण गदा शुल चक्राते। शंख भुशुंडी परिघ धनुष धरीते। रक्ताने माखलेल्या मुंडक्याते। असे धारण केलेले ।।५ ।। ही महाकाली विष्णूची माया। आराधना करता चराचरी या। समस्त जगत् उपासका या । आधीन करीतसे।। ६ ।। संपुर्ण देवांच्या अंगातुन। जाहले जिचे निर्माण। महिषासूर मर्दना लागून। त्रिगुणमयी शक्ती महालक्ष्मी।।७।। भुजा श्याम गौर मुख कोमल। स्तनमंडल श्वेत कटी-चरण लाल। जंघा

पिंडरीचा वर्ण निल। अजय शौर्याभिमाने मिरवे ती ।।८।। कटी अग्रभागे बहुरंगी वस्त्रं। अंगराग आभूषन सुंदर विचित्र ।जरी माला वस्त्रं विचित्र। नटली सुशोभित सौभाग्याने।।९ ।। सहस्त्रं भुजा परी अष्टादश पुजने ।दक्षिण हस्तक्रमे अस्त्रं घेई जाने। अध बाजु वाम धरी क्रमाने। त्याचे वर्णना जानावे। १० ।। अक्षमाला कमल बाण। खड्ग वज्र गदा चक्र जान। त्रिशुल परशु शंख घंटा अन। पाश धरिले असे हाती।।११ ।। शक्ति दंड ढाल धनुष। पानपात्र कमंडलु आयुध विशेष। कमलासने विराजे यथावकाश। देवी अशी अद्भूत।।१२ ।। सर्वदेवमयी ती सर्वा ईश्वरी। जो महालक्ष्मीची पुजा करी। तो देवता आणि लोकावरी। स्वामी बनून राहील।।१३ ।। एकमात्र आश्रित सत्वगुणानं। प्रकटली पार्वती शरीरातुन। शुंभाचा संहार करुन। सरस्वती नामे जानिली।।१४।। अष्टभुजे अष्ट क्रमान। बाण मुसल शूल चक्र अन। शंख घंटा हल धनुष धारण। या स्वरुपे केले असती ।।१५।। देवी सरस्वती या संसारी। निशुंभ मर्दुनी शुंभा संहारी। भक्तिपुर्वक पुजीता जरी। करी सर्वज्ञता प्रदान।।१६।। महाकालीदि स्वरूप तीन। या प्रकारे वर्णिले जान। पुढे प्रत्येकीची विस्तारुन। उपासना ऐका एकचित्ते ।।१७।। करु जाता पुजा महालक्ष्मीची। दक्षिणे महाकाली वामे सरस्वतीची। पृष्ठभागे उभय देवतांची। यथोपचारे करावी ।।१८।। महालक्ष्मी मागे ब्रह्मा सरस्वती। दक्षिणेसी रुद्र गौरीती । वामे विष्णु लक्ष्मी ख्याती। पुढे त्रय देवींसी पुजावे।।१९।। मध्ये अष्टादश

भुजा। वामे दशमुखा पुजा। दक्षिणे पुजा अष्टभुजा। महालक्ष्मी महति वाढवावी।।२०।। अष्टादश भुजा देवीचे। वा पुजन दशमुखीचे। किंवा देवी अष्टभुजाचे। करी पुजन मानव।।२१।। करा अरिष्ट निवारणी। दक्षिणे कल्की पुजुनी। वामे मृत्युला स्थापुनी। पुजन करावे भक्तिने।।२२।। अष्टभुजेची पुजा करता। दक्षिणे रुद्र वामे विघ्नहर्ता। नवशक्ती पुजा समस्ता।"**नमो देव्यै...**" या मंत्रांनी ।।२३।। तिन्ही अवतारां पुजु जाता। तिनही चरित्र स्तोत्र मंत्रा। ध्यावे साग्र समस्ता। महिषासुर मर्दिनी विशेष।।२४।। महालक्ष्मी महाकाली महासरस्वती। पुण्य पापांची अधीश्वरी ती। महेश्वरी सर्व लोका ती। विशेषरुपे पुजनीय।।२५।। ज्याने पुजिले महालक्ष्मीसी। देवी महिषासुर मर्दिनीसी। तोच स्वामी संसारासी। चंडिका पुजावी जगतोद्धारिणी।।२६।। अर्घ्य आदि अलंकारांनी। गंध पुष्प अक्षतांनी। धुप दीप नाना नैवेद्यांनी। होते देवी पुजन।।२७।। बली मांस मदिरा पुजनास। प्रणाम आचमन जलास। चंदन सुगंधीत द्रव्यास। ध्यावे देवी पुजेसी।।२८।। कापूर तांबुल सामग्री घ्यावे। भक्तिभावे देवीस समर्पावे। वामभागे शिरा पुजावे। महादैत्य महिषासुराच्या।।२९।। देव्या दक्षिणे पुजावे सिंहे। षड् ऐश्वर्ययुक्त पाहे। धर्माचे प्रतिक आहे। धारण केले चराचरा।।३०।। करावे एकाग्र मानसी। चिंतने करावे स्तुतीसी। हात जोडुनी त्रय

चरित्रासी । भक्तीने स्तवन करावे ।।३१ ।। कोणा वाटे स्तुती करावी । त्याने मध्यम चरित्राची करावी। प्रथम उत्तर चरित्र न बरवी। अर्धे चरित्र वर्ज्य जाना।।३२।। जो अर्धा करील पाठ । तो विफल होईल पाठ । समाप्त झाल्यावर पाठ। प्रदक्षिणा करूनी वंदावे।।३३।। क्षमा याचना वारंवार। करावी देवीसी अपरंपार। सप्तशती प्रत्येक श्लोकावर । तिळ खिरेची आहुती द्यावी।।३४।। हवन सप्तशतीतील स्तोत्रांचे। चंडिकेलागी पवित्र हविष्याचे। पुन:पुन: पुजन महालक्ष्मीचे। नाम मंत्राने करावे।।३५।। इंद्रिया संयमी विनीत भावे । सर्वेश्वरीसी नमन करावे। अंत:करणी चंडिके स्थापावे। रहावे चिंतनी निरंतर ।।३६।। अशाप्रकारे मनुष्य प्रतिदीन। भक्तिने करी परमेश्वरीचे पुजन। मनोवांछित फळा पावेल। जाईल अंती देवीचरणी ।।३७।। जो कोणी मनुष्यप्राणी । देवी चरणा न भजी जानी। त्याचे पुण्य जाय जळोनी। देवीच्या अवकृपेने।।३८।। सर्व लोकांनी महीवरी । पुजन अर्चने चंडीकेश्वरी। प्रसन्न करवावी महेश्वरी। सुख सौख्ये नांदाल ।।३९।।

**इंति वैकृतिक रहस्यं संपूर्णम् ।**

# अथ मूर्तिसहस्यम्

ऋषिरुवाच

नंदा नावाची देवी प्रकटेल। नंदकुळी उत्पन्न होईल। भक्ति स्तुतीने तिला स्तवतील। त्रिलोक देईल उपासका।।१ ।। कनकासमान उत्तम कांती । सुंदर वस्त्रं धारण करी ती। सुवर्णासम प्रभा फाकती। धारणे आभूषन सुवर्णाचे।।२ ।। चारही हाती कमल धरी। अंकुश पाश शंख सुंदरी। इंदिरा कमला लक्ष्मी श्री । रुक्मांबुजासनादि नामे बोलतसे।।३ ।। प्रथम वर्णिली रक्तदंतिका। तिच्या मुळ स्वरूपा ऐका। सर्व भय दुर करी जी कां। पुर्वील कथानुसंधाने।। ४ ।। लाल वस्त्रं धारण करी। रक्तआभूषन लाल शरीरी। शस्त्र अस्त्रं नेत्र वरी। केसही लाल भीषण।। ५ ।। तीक्ष्ण नख रक्त दात उद्दाम। कारणे तिचे रक्तदंतिका नाम। पतीसी जैसी पत्नी लावी प्रेम। भक्तावरी माता करी।।६ ।। देवी मातेचा आकार। असे विशाल भूधराकार। स्तन सुमेरु पर्वताकार। स्थुल सुंदर मनोहर।।७ ।। कठोर परी कमनीय।

समुद्रापरी सर्वा आनंदीय। कामना पुर्ती मनोनीय। स्तनपान करी लेकुराते।।८।। चतुर्हस्ते खड्ग पाश मुसल। आणिक धारण करी खल। हीच रक्तचामुंडा उज्वल। योगेश्वरी असे पै ।।९।। ही व्याप्त सर्व चराचरात। जो कोणी भक्तीने पुजीत। तो ही व्याप्त होई जगात। देवीकृपे होतसे।।१०।। प्रतिदीन स्तवन रक्त दंतिकेचे। करिता प्रेमपुर्वक रक्षिते। पतिव्रता जैसी राखिते। प्रिय पती धर्माते।।११।। निलकांती शरीर शाकंभरीचे। नेत्र निलकमलापरी साचे। नाभी विभूषीत उदराचे। स्वरुपे प्रकट दिसे ती।।१२।। अत्यंत कठोर उभय स्तन। उंच गोल स्थूल चहूकडून। कमलावर विराजमान। परमेश्वरी झालिसे ।।१३।। हाती मुष्टी भरून बाण। कमल शाकसमुह प्रकाशमान। धनुष करुनी धारण। दिसे स्वरुप लीलये।।१४।। शाकसमुही मनोवांछित रस। मृत्युभया नष्ट करण्यास। फुल पान मूळ फळांस। दुर्गा शाकंभरी संपन्न।।१५।। शोकरहित दुष्टाचे दमन करी। पाप विपत्तीचे शमन करी। उमा गौरी सती चंडी भूवरी। तीच कालिका पार्वतीही।।१६।। शाकंभरीचे स्तुती ध्यान। जो करी जप पुजा वंदन। त्याला मिळे अन्न पान। अमृतरूप अक्षय फळं।।१७।। भिमादेवीचाही वर्ण निळा। दात दाढा चमकती सकळां। भव्य नेत्र रुप स्त्रीकळां। स्तन गोल आणि स्थुल।।१८।। हाती चंद्रहास मस्तक। खड्ग डमरू पात्रं नामक। एकविरा कालरात्री उक्त। प्रसिद्ध या नामे।।१९।। भ्रामरीची विचित्र कांती। तेजोमंडलाने दिसत होती। विचित्र आभूषने

भूषिती। अति सौंदर्यवर्धक ।।२०।। चित्रभ्रमरपाणी आणि । महामारी आदि नामानी। महिमा गान गाऊनी । चंडिका जगन्माता कथियेली।।२१।। किर्तन करिता कामधेनु समान। कामना पुर्ण करी जान। हे रहस्य गोपनीय जानून। अन्य कोणा न सांगावे।।२२।। महिमा दिव्य मुर्तींचा। मनोवांछित लाभण्याचा। पुर्ण प्रयत्न करा साचा। निरंतर देवी जपाने।।२३।। सप्तशतीच्या मंत्र पाठाने। ब्रह्म हत्यादि पातका जाने। सप्तजन्म पाप उपार्जिताने। किल्मिष नष्ट होतील ।।२४।। यालागी पुर्ण प्रयत्नाते। गुपितातील अत्यंत गुपिताते। ध्यान मनोवांछित फलाते। देणारे होईल ।।२५।।

**इति मूर्तिरहस्यं संपूर्णम् ।**

# क्षमा प्रार्थनाष्टक

माझ्याकडून माते रात्रंदिवस। घडलेल्या सहस्त्रं अपराधास।
कृपापुर्वक क्षमा करा दासास। मला आपला समजुनी। ।।१ ।।
आवाहन मी नाही जानत। विसर्जन करणे न जानत।
ना पुजा करण्याची पद्धत। जानत नाही क्षमा करा।।२ ।।
हे सुरेश्वरी मी केले मंत्रहीन। पुजन क्रियाहीन भक्तीहीन।
ते सर्व आपल्या कृपेनं। पुर्ण सफल व्हावे।।३ ।।
शतशत अपराध तुझ्याचरणी। जो उच्चारिल "जगदंब" म्हणूनी।
तो गती पावेल तरुनी। ब्रह्मालाही ते दुर्लभ।।४ ।।
जगदंबे मी अपराधी आहे। तुझ्याचरणी आलो आहे।
यावेळी दयेस पात्र आहे। तु ईच्छिशील तसे कर।।५ ।।

अज्ञानाने वा विस्मरणाने। वा मला भ्रांती झाल्याने।
न्युनाधिक केले असल्याने। क्षमा कर हो प्रसन्न।।६।।
सच्चिदानंदा परमेश्वरी। जगन्माता कामेश्वरी।
प्रेमे पुजा स्विकारी। माझ्यावरी हो प्रसन्न।।७।।
गोपनीयातील गोपनीयाचे रक्षण। देवी सदैव करिशी जान।
मी केलेल्या जपा स्विकारुन। तवकृपेने होवो सिद्धी प्राप्त।।८।।
।। श्री दुर्गार्पणमस्तु ।।